म   ा. सं. ठाणे.
चरित्र
३९४

# भीष्म चरित्र

व. दि. कुलकर्णी

REFBK 0015593
REFBK-0015593

# लीळाचरित्र

[ एक अभ्यास ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...७१९८८ — दि: चरित्र
क्रमांक ...१३८७ ... नोंद दि: १५८५८८

व. दि. कुलकर्णी

मराठी-विभाग-प्रमुख
पारले महाविद्यालय, मुंबई—५७

REFBK-0015593

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५९९३

मूल्य ४-०० रुपये

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली एप्रिल : १९६७

© सौ. सुमित्रा कुलकर्णी

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
३८१ क शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी : मुंबई ४

गुरुवर्य कृ. वि. तथा आबासाहेब कुलकर्णी

यांच्या परमपूज्य चरणी

भक्तिभावपूर्वक अर्पण

# प्राचीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास : एक निवेदन[1]

ग्रं. क्र. १५९९३

प्राचीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास दिवसेंदिवस कमी प्रमाणात होत आहे, आणि जो होत आहे तो मोठ्या गोडीने आणि कळकळीने होतो, असेही सामान्यतः दिसून येत नाही. संस्कृतचा अभ्यास खुंटलेला, भारतीय तत्त्वज्ञानाची रुची बहुतांशी नष्ट झालेली, देवभक्तीचा झपाट्याने क्षय होत चाललेला, जीवनाचे उद्दिष्ट पारमार्थिक न राहिलेले, साहित्याचेही उद्दिष्ट त्यामुळे ऐहिकच बनलेले, जुन्या साहित्यशास्त्राकडे आणि जुन्या भाषेकडे दृष्टी उपेक्षेचीच... यामुळे मूलतःच प्राचीन वाङ्मयाकडे वळण्याची प्रवृत्ती एकंदरीत कमीच.

वाङ्मयीन अभ्यासाच्या आणि आनंदाच्या अपेक्षेने या वाङ्मयाकडे वळावे, तर त्याच्या वाटा व्हाव्या तशा, मोकळ्या झालेल्या नाहीत. आजवरील प्राचीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास पाहता तेथे कवीचे लौकिक आणि आध्यात्मिक चरित्र, ग्रंथलेखनाचा काल, ग्रंथनिर्मिताचा इतिहास, ग्रंथाचा विषयदृष्ट्या परिचय, त्यातील तत्त्वज्ञानाचे विवरण, धर्मपंथांची माहिती, क्वचित धार्मिक परिणामांची ऐतिहासिक चिकित्सा, असेच बहुंशाने चित्र दिसते. त्यात मतमतांतरेच फार! वाङ्मयीन सौंदर्याचा विचार या गदारोळात क्षीणपणे उमटलेला, कोठेतरी जणू अंग चोरून बसलेला, पुरवणीवजा मागून जोडलेला, विषयदृष्ट्या अवलोकिलेला आणि काव्याच्या सांकेतिक कल्पनांनीं नटलेला, असाच असल्याचा प्रायः आढळून येतो. चार-दोन महत्त्वपूर्ण अपवाद डोळ्यांपुढे येतात; पण तेही प्रयत्न त्रोटक

---

१. पंचेचाळिसावे मराठी साहित्य सम्मेलन, मडगाव, १९६५, मध्ये हे टिपण चर्चेसाठी सादर केले होते. ‘मुंबई मराठी प्राध्यापक–मंडळा’तही ह्या टिपणाचे वाचन झालेले आहे.

आणि अंशात्मक परीक्षणस्वरूपाचे असेच आहेत. प्राचीन मराठी वाङ्मयचा वाङ्मयीन दृष्टिकोणातून समग्र इतिहास लिहिण्याचे अद्याप राहूनच गेले आहे. असा इतिहास लिहिण्याची आता फार निकड आहे.

याचा अर्थ, आजवरील विद्वान आणि अधिकारी संशोधकांनी आणि अभ्यासकांनी या विषयी जे संशोधन आणि जो अभ्यास केला आहे, त्याचे महत्त्व कमी झाले आहे, असा नाही. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या आकलनाच्या आणि थोड्याफार आस्वादाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या पूर्वज्ञानासाठी लागणारी साधने या पूर्वसूरींनी मोठ्या कष्टाने, निरलसतेने आणि प्रामाणिकपणे निर्माण केली आहेत, त्याबद्दल आपण त्यांचे सदैव ऋणीच राहू. पण आज तेथेच थांबून चालणार नाही.

प्राचीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास करताना, 'ललित' आणि 'ललितेतर' असा भेद करून ललित वाङ्मयाचा अभ्यास, वाङ्ममयाच्या अभ्यासकांस अभिप्रेत असावा. ज्या ग्रंथात तत्त्वविवेचन केवळ तर्कनिष्ठ पद्धतीने केलेले असते, (आणि प्राचीन मराठीत अशा ग्रंथांचा विषय अध्यात्म हाच बहुधा असल्याने) ते ग्रंथ, प्रत्यक्षपणे वाङ्मयाभ्यासकांसाठी नसून, तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांसाठीच असतात, असे मानणे अधिक सयुक्तिक ठरणार नाही का?

ललित वाङ्मयाचा अभ्यास वाङ्मयीन प्रवृत्ती आणि प्रकार यांच्या संदर्भात केल्यास ते अधिक उचित ठरेल. प्राचीन मराठी ललितवाङ्मयाचे या दृष्टीने, स्थूलमानाने, पुढीलप्रमाणे वर्गीकरण होऊ शकेल :—

१. सूत्र व भाष्य वाङ्मय.
२. आर्ष व विदग्ध महाकाव्य.
३. चरित्र व आख्यान काव्य.
४. स्फुट काव्य.
(यातच 'उपासना–काव्य,' 'उपदेशात्मक काव्य' यांचा समावेश व्हावा.)

येथे गद्य–पद्य असे वर्गीकरण करण्याची आवश्यकता नाही.

या अशा अभ्यासाने बाराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत, म्हणजे सहाशे–साडेसहाशे वर्षांच्या कालखंडांत हे

वाङ्मयप्रकार कसकसे बदलत गेले, याचे सुंदर आलेख काढता येतील, आणि एका दृष्टिक्षेपांत, सामग्र्याने प्राचीन मराठी वाङ्मयाच्या वाटा आणि वळणे पाहणे शक्य होईल. विशिष्ट कालखंडाचा, म्हणजे, विशिष्ट देशकालपरिस्थिती, कविमनोवृत्ती, त्याचा कुलज्ञातिविशेष, त्याचा धर्मपंथ आणि त्याचे उपासनादैवत, तसेच तत्कालीन वाङ्मयीन अभिरुची यांचा, आवश्यक तो उपयोग करून घेऊन अंतिम मूल्यमापन मात्र वाङ्मयीन मूल्याधारेच होऊ शकेल. पंथाभिमान, देवताभिमान इत्यादींचे धुके रसिक दृष्टीपुढे पसरणार नाही. यामुळे **हा अभ्यास धर्मसंप्रदायांचा न होता तो वाङ्मयीन संप्रदायांचा व प्रकारांचा होईल.**

प्राचीन मराठी वाङ्मयीन कृतींचा अभ्यास वाङ्मयीन प्रवृत्ति-प्रकार या दृष्टीने केल्यास त्या त्या वाङ्मयातील गुण-दोषांची कारणमीमांसा व्यापक दृष्टीने आणि अधिक समंजसपणे करता येईल. अनुकरणप्रियता, पुनरुक्ती, पाल्हाळ, सांकेतिकता, तांत्रिकता इत्यादींची, तसेच काही वाङ्मयप्रकारांच्या उत्कर्षापकर्षांची आणि काहींच्या नवनवीन रूपदर्शनाची उपपत्ती अनाग्रही आणि निर्मम वृत्तीने लावता येईल.

आणखी एक विचार करावा लागेल. प्राचीन मराठी वाङ्मय लिखितरूपात जनसामान्यापर्यंत किती पोहोचत होते? हे वाङ्मय प्राधान्याने 'श्रव्य' होते. प्रवचन-कीर्तन, भारूड-भजन या आणि यांसारख्या माध्यमांतूनच ते प्रसारित होत होते. म्हणजे प्राचीन मराठी वाङ्मयाचा आस्वाद हा केवळ त्या 'संहिते'च्या वाचनाचा आस्वाद नव्हता; तर पुराणिक, हरदास किंवा गायक यांच्या कौशल्याने संस्कारित झालेल्या श्रव्यकाव्याचा तो आस्वाद होता. याचा परिणाम शब्दकळा आणि रचनाबंध यांवर झाला असल्यास तोही पाहणे आवश्यक ठरेल. कदाचित 'कीर्तनाश्रयी वाङ्मय' असा वेगळा वाङ्मयप्रकार मानावा लागण्याचीही शक्यता जाणवेल.

वेगवेगळ्या कवींच्या रचनासामर्थ्याचा विशिष्ट वाङ्मयप्रकाराच्या अनुबंधात तुलनेने अभ्यास झाल्याने, वाङ्मयीन दृष्ट्या युगप्रवर्तक कवी वेगळेपणाने चटकन उठून दिसतील, कांहींची लब्धप्रतिष्ठा धोक्यात येईल तर, काही उपेक्षितांना मान-महत्त्व लाभेल. वाङ्मयीन मूल्य असो वा नसो, केवळ नव्याने हाती लागले म्हणून वाटेल त्या हस्तलिखिताला मुद्रण-संस्काराच्या बळावर वाङ्मयीन श्रेय मिळणार नाही. संशोधनदृष्टी आणि वृत्ती अधिक वाङ्मयीन आणि अंतर्मुख बनेल.

तसेच अगदी नवीन वाटणाऱ्या काव्यप्रकारांची मुळे पूर्वीच कोठेतरी रुजलेली आढळून वाङ्मयीन परंपरेचे सुंदर सूत्र पाहावयास मिळणे संभाव्य आहे. प्रत्येक वाङ्मयकृतीला तिची योग्य ती दर्शनभूमी (proper frame), योग्य तो तारतम्य-विचार (proper perspective) लाभेल. कदाचित महाभारताच्या 'एकसंध महाकाव्य' म्हणून अभ्यास करण्याचे जसे प्रयत्न झाले, तसे 'ज्ञानेश्वरी'-च्याही बाबत होणे अशक्य ठरणार नाही. बहुधा शेवटी असेच आढळण्याची शक्यता आहे की, प्राचीन मराठी वाङ्मयात तीनच प्रमुख संप्रदाय आहेत. (१) Expositional School (२) Classical School आणि (३) Romantic School परतत्त्व-स्पर्शापासून ते मैनेच्या मंजुळ बोलापर्यंतचे मराठी साहित्य अधिक हृद्य आणि कसदार वाटण्याचाही संभव आहे.

प्राचीन मराठी वाङ्मयाचे असे सम्यक चित्र न्याहाळताना वाङ्मयीन अभिरुचीचे आणि भाषाशैलीचे कितीतरी विभ्रम नजरेत भरतात; आणि त्यांच्या उपयोजनेमागील हेतू सहजतेने व्यक्त होतात. तसेच अवश्य तेव्हा अन्य संबंधित भारतीय भाषांतील वाङ्मयाशी त्यांची तुलना करणे सोपे जाते. वाङ्मयातून राजकीय आणि सामाजिक संदर्भ टिपून काढणे, परप्रांतीय आणि परधर्मीय कवींच्या ग्रंथनिर्मितीचा अलगपणे परामर्श घेणे, किंवा मराठी कवयित्री आणि त्यांची साहित्यसेवा असा जणू तोडून वेगळा विचार करणे...इत्यादी अभ्यास-पद्धतींना विशिष्ट मर्यादेपलीकडे काही अर्थ उरणार नाही; वाङ्मयीन समीक्षेत त्यांना गौण स्थानच लाभेल.

थोडक्यात म्हणजे, वाङ्मयाचे वाङ्मयीन म्हणून असणारे सौंदर्य आणि मूल्य यांचे यथायोग्य दर्शन व्हावे यासाठी आजवरचा सारा अभ्यास हाताशी घेऊन पण अखेर वाङ्मयीन मूल्ये डोळ्यांपुढे ठेवून, रसिक हृदयाने प्राचीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास यापुढे होणे अत्यंत आवश्यक आहे.

या विचाराच्या संदर्भात प्रस्तुत निबंधासंबंधी दोन शब्द लिहिणे आवश्यक वाटते.

आजवर लीळाचरित्राचा अभ्यास जो झाला तो प्राधान्याने श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचा शोध घेण्याच्या दृष्टीनेच झाला. त्याचबरोबर लीळाचरित्रातून प्रतिबिंबित झालेली यादवकालीन समाजस्थिती, चालीरीती, धर्माचार इत्यादींचाही तपशील संकलित करण्याकडे अभ्यासकांनी

आवर्जून लक्ष दिले आहे. (या दृष्टीने 'एकांक' आणि 'पूर्वार्ध' याचा बराच साक्षेपी अभ्यास झाल्याचे दिसून येते.) तसेच शब्दसंपत्ती, वाक्प्रचार आणि म्हणी यांची 'एकांक' आणि 'दृष्टान्तपाठ' या पुरती का होईना, पण तोंड-ओळख करून देण्यात आलेली आहे. यादवकालीन मराठी भाषेचा आणि व्याकरणाचा शास्त्रीय दृष्टीने अभ्यास मात्र स्वतंत्रपणे झालेला आहे. लीळाचरित्राच्या रचनेचा इतिहास, माइंभटाचे चरित्र इत्यादींची सूक्ष्म छाननीही करण्यात आलेली आहे. पण तरीही हे जाणवते की महानुभावीय 'वाङ्मया'चा व्हावा तसा आणि तितका वाङ्मयचिकित्सात्मक अभ्यास अद्याप व्हावयास भरपूर अवसर आहे. मुंबई विद्यापीठाच्या एम्. ए.च्या विद्यार्थ्यांना हा ग्रंथ शिकविताना ही जाणीव मला तीव्रतेने होत होती. त्यातूनच या निबंधाची निर्मिती झाली आहे.

'लीळाचरित्र' म्हणजे महानुभाव धर्मपंथाच्या तत्त्वज्ञानाची आणि आचार-सूत्रांची जन्मभूमी होय. महानुभावीय गद्य-साहित्य-मंदिराचा अढळ पायाही 'लीळाचरित्रा'नेच घातला आहे; किंबहुना मराठीतले पहिले ललित आणि ललितेतर गद्यशैलीचे प्रभावी नमुने बहुसंख्येने पाहावयास मिळतात तेही याच ग्रंथात! वस्तुतः 'लीळाचरित्र' या ग्रंथाची धार्मिक आणि वाङ्मयीन महती स्वतःसिद्ध आहे.

प्रस्तुत निबंधात लीळाचरित्राची वाङ्मयीन दृष्ट्या परीक्षा केलेली आहे आणि त्या निमित्ताने आद्य मराठी गद्यशैलीचा आणि वाक्यरचनेचाही अभ्यास करण्यात आला आहे. एखाद्या अर्वाचीन चरित्रग्रंथाशी लीळाचरित्राची रचना-दृष्ट्या अथवा वाङ्मयीन स्वरूपदृष्ट्या तुलना संभवनीय आहे का, ह्याचीही चिकित्सा येथे केलेली दिसून येईल. मात्र लीळाचरित्राचा सर्वांगीण अभ्यास येथे अपेक्षित नाही.

वस्तुतः 'लीळा चरित्रा'च्या उपलब्ध हस्तलिखित पोथ्यांवरून एक अधिकृत अशी संहिता तयार करून समग्र लीळाचरित्राचा भाषिक, व्याकरणिक, सामाजिक, राजकीय, भौगोलिक, धार्मिक, ऐतिहासिक या दृष्टींनी शास्त्रशुद्ध आणि साक्षेपी अभ्यास व्हावयास हवा आहे; आणि मराठीतील पहिला गद्यग्रंथ म्हणून त्याचे वाङ्मयीन स्वरूपाचे विस्ताराने परिशीलन करणे तर अगदी अगत्याचे आहे. या दिशेने काही पावले टाकण्याचा मी यथाशक्ती येथे प्रयत्न केला आहे; तो मराठीच्या अभ्यासकांना अनुचित वाटणार नाही, ही आशा!

पारले महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. द. गो. शिवदे आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे प्रमुख कार्यवाह श्री. वा. वि. भट यांनी वेळोवेळी दुर्लभ ग्रंथ उपलब्ध करून दिले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. व्हीनस प्रकाशन, पुणे, या संस्थेचे मालक श्री स. कृ. पाध्ये आणि मौज मुद्रणालय संस्थेचे श्री. वि. पु. भागवत यांच्या सहकार्याने प्रस्तुत लेखन यथायोग्य स्वरूपात प्रकाशात येत आहे; त्या उभयतांचे आभार मानणे माझे कर्तव्य आहे.

पारले महाविद्यालय
मुंबई ५७

व. दि. कुलकर्णी

१. प्रस्तुत निबंधातील पहिल्या दोन प्रकरणांचे वाचन पुणे येथील 'केळकर मंडळा'त दि० १२–१–१९६५ रोजी झाले. हीच प्रकरणे नंतर मुंबई मराठी ग्रंथ-संग्रहालयाच्या संशोधन समितीपुढे वाचण्यात येऊन, संशोधन-पत्रिकेच्या 'जुलै १९६५' आणि 'आक्टोबर १९६५' या अंकात प्रकाशित झाली.

२. कै. ह. ना. नेने यांची 'लीळाचरित्रा'ची मुद्रित प्रत येथे 'संहिता' म्हणून स्वीकारलेली आहे.

३. शुद्धलेखन मराठी साहित्य महामंडळाच्या नियमांनुसार केले आहे.

## अनुक्रमणिका


पृष्ठे

एक निवेदन पाच

प्रकरण–पहिले १

'लीळाचरित्र'–'स्मरणभक्ती'चा एक 'आदर्श'

प्रकरण–दुसरे १३

'त्रिखंडात्मक लीळाचरित्राचे त्रिविध स्वरूप'

प्रकरण–तिसरे २९

'लीळाचरित्राचे वाङ्मयीन स्वरूप

प्रकरण–चवथे ६१

'लीळाचरित्र–वाक्यविचार आणि भाषाशैली

प्रकरण–पाचवे ७९

'उपसंहार'

परिशिष्ट ८५

संदर्भ ग्रंथ ८७

प्रकरण पहिले

# 'लीळाचरित्र' : 'स्मरणभक्ती'चा एक आदर्श

- ली० च० लेखनामागील प्रेरणा आणि त्याचे प्रयोजन.
- चांगदेवभटाची हकिकत.
- नागदेवाचार्यांची 'साधनविरही'ची अवस्था.
- 'लीळा' म्हणजे काय?
- 'स्मरण' म्हणजे काय? 'स्मरणा'चे प्रकार.
- लीळाचरित्र–एक-'वरद' ग्रंथ.
- म्हाइंभटाची स्मरणभक्ती.
- म्हाइंभटाचे सत्याचे शोधन.
- 'लीळां'ची निवड नाही. का?
- आठवणींच्या मुळाशी 'सगुणपूजे'चे तत्त्व.
- आठवणीकारांचा नामोल्लेख नाही. का?
- श्रीचक्रधरांची गुरुभक्ती.
- लीळाचरित्र—महानुभावांची 'श्रुति-स्मृति-गंगा'.

# ‘लीळाचरित्र’ : ‘स्मरणभक्ती’चा एक आदर्श

‘लीळाचरित्र’ हा ग्रंथ कोणत्या निमित्ताने लिहिला गेला, तो लिहिताना म्हाइंभटाची भूमिका कोणती होती, त्या भूमिकेनुसार लीळाचरित्र कसकसे सिद्ध होत गेले, त्यात येणारा तपशील कोणास व का महत्त्वाचा वाटला, सत्यान्वेषणाची नको इतकी बारीक दृष्टी लीळाचरित्र–लेखनात का ठेवली गेली, या आणि यांसारख्या काही प्रश्नांची कारणे शोधण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

‘लीळाचरित्र’ हा मराठीतील पहिला चरित्रग्रंथ होय. या चरित्रग्रंथाचे स्वरूप नेमके काय आहे, हे पाहणे मोठे उद्‌बोधक ठरेल. त्यासाठी ह्या लेखनामागील प्रेरणा आणि प्रयोजन कोणती आहेत ते समजून घेणे आवश्यक आहे. लीळाचरित्र म्हणजे महानुभाव पंथाचे आद्यप्रवर्तक श्रीचक्रधर यांचे जीवनचित्र होय. श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाची, त्यांच्या अध्ययनाची, गुरुपरंपरेची, पंथस्थापनेची शिष्यपरिवाराची, तत्त्वज्ञानाची किंवा एकूण जीवनकार्याची अभ्यासपूर्वक, विषयवार, प्रकरणशः, सुव्यवस्थित रचना करून ग्रांथिक पद्धतीने लिहिलेले असे हे चरित्र नाही; तसेच श्रीचक्रधराचे माहात्म्य सिद्ध करून दाखविणे हाही या चरित्रलेखनाचा हेतू नाही; ‘काव्यं यशसे’ या उक्तीमध्येही हे प्रयोजन सापडणारे नाही. एखाद्या प्रिय व्यक्तीचा कायमचा वियोग व्हावा आणि ते दुःख असह्य व्हावे, अशा वेळी त्या प्रिय व्यक्तीच्या आठवणींनीच मनाला थोडासा का होईना पण विरंगुळा लाभावा, तसेच येथे घडले आहे. श्रीचक्रधरांचे ‘उत्तरापंथें गमन’ झाल्यावर श्रीचक्रधरांच्याच आदेशाप्रमाणे, नागदेवाचार्य शिष्यपरिवारासह ऋद्धिपूर येथे श्रीगोविंदप्रभू

यांच्याकडे आले. पण येथे येण्याआधी व आल्यावरही, श्रीगोविंदप्रभूंच्या सान्निध्यात असूनसुद्धा नागदेवाचार्यांना श्रीचक्रधरांच्या वियोगाचे दुःख विसरता येईना. 'स्मृतिस्थळा' तील प्रारंभीच्या सहा-सात लीळा ह्या वियोगदुःखावेगाचे परिणामकारक चित्र उभे करतात. भक्तीच्या लक्षणात 'तन्विस्मरणे परमव्याकुलता' हे एक महत्त्वाचे लक्षण सांगितलेले आहे. ज्याला हे अनिर्वचनीय असे परमेश्वराचे प्रेम लाभले त्याची 'तदेवावलोकयति, तदेव श्रुणोति, तदेव चिन्तयति' अशी अवस्था होते. 'लीळाचरित्र' म्हणजे नवविधा भक्तींतील ही 'स्मरणभक्ती' होय. या स्मरणभक्तीच्या पोटीच श्रीचक्रधरांच्या लीळा गोळा करण्याची कल्पना जन्माला आली.

लीळाचरित्राच्या 'पूर्वार्धा'मध्ये चांगदेवभटासंबंधी एक हकिकत आहे. हा चांगदेवभट घर सोडून श्रीचक्रधरांबरोबर राहिला. पुष्कळ दिवस झाले, तरी तो घरी गेला नाही. त्याची 'माता खंती करीत' होती. तेव्हा गावीचे महाजन आले व श्रीचक्रधरांच्या सम्मतीने चांगदेवभटाला गावी घेऊन गेले. तो निघाला तेव्हा श्रीचक्रधरांनी त्याला सांगितले की,

**बटिका : दीसामध्यें हें वेळा : दहावीस : आठवीजे :**
**वेळा दहावीस नाही : तरि : सात पांच : आठवीजे :**
**सात पांच नाही तरि दोन च्यारि वेळा : आठवीजे :**
**दोन च्यारि वेळा नाही तरि एकु तरि वेळ : आठवीजे :**
**एक दोन वेळ तरि दोनि एकु वेळ : आठवीजे :**
**परि दिवसू वंध्यू जावों नेदीजे : आठवीजे :**

या लीळेवरून हे दिसून येते की, श्रीचक्रधरांच्या वियोगात दुःखपरिहारार्थ त्यांच्या लीळांचे स्मरण करण्याचा आदेश स्वतः श्रीचक्रधरांनीच त्यांच्या शिष्यांना दिलेला आहे. पुढे भटोबासांनीही आपल्या शिष्यांना 'लीळास्मरणानुवाद' उपदेशिल्याचे पाहावयास मिळते. (स्मृतिस्थळ–३९)

'दृष्टान्तपाठा'त, म्हणजे पर्यायाने लीळाचरित्रातच विरहिणीचे तीन दृष्टान्त आले आहेत. परमेश्वराच्या विरहाचे दुःख करणाऱ्या भक्तांचे 'साधन विरही,' 'कोमळ विरही' आणि 'जरठ विरही' असे तीन प्रकार त्यांत वर्णिले आहेत. त्यांपैकी नागदेवाचार्यांची अवस्था पुष्कळशी 'साधन विरही'ची होती, असे

म्हणता येईल. '**परमेश्वरु वियोगें विरहिया पुरुषासि आणिकें काइसेनही सुखासि न ए : प्रसाद : वासनिक : भीक्षु : शास्त्र तेणें सुखासि ए : आणिकें काइसेनही न ए॥**' 'साधन विरहिणीच्या दृष्टान्ताचे हे दार्ष्टांतिक पाहता 'स्थान,' 'प्रसाद,' 'वासनिक,' 'भिक्षू,' 'शास्त्र' हे परमेश्वराचे संबंधी पदार्थ आहेत, त्यांच्या दर्शनाने किंवा आठवणीने ईश्वरविरही व्यक्तीस सुख प्राप्त होते, हे स्पष्ट होते. 'श्रीचक्रधरू' असे केवळ नामस्मरण केल्यानेही महदाइसास थोर सुख झाल्याचे स्मृतिस्थळात पाहावयास मिळते.

महानुभावीय हे श्रीचक्रधरांना 'द्वारावतीचे चांगदेव राऊळ' यांचे अवतार म्हणजे श्रीकृष्णाचे प्रत्यक्षावतार असे मानतात; 'गर्भ,' 'पतित' आणि 'दवडणे' या तीन अवतारप्रकारांपैकी श्रीचक्रधर हे 'पतितावतार' होत; कारण भरवसच्या प्रधानपुत्राच्या–हरपाळदेवाच्या–मृत म्हणजे 'पतित' शरीरात द्वारावतीच्या चांगदेव राऊळांनी प्रवेश केल्याने हा अवतार झाला आहे.

(परमेश्वरावताराने चेतनाबरोबर ज्या सहेतुक क्रीडा केल्या, त्यांना 'लीळा' असे म्हणतात; तर त्याने जडाबरोबर केलेल्या सहेतुक क्रीडांना 'चेष्टा' असे म्हणतात.[1] 'लीळाचरित्र' मधील 'लीळा' ह्या शब्दाच्या अर्थात 'चेष्टा' या शब्दाचाही अर्थ समाविष्ट झालेला आहे. परमेश्वरावताराने केलेली क्रीडा म्हणजे 'लीळा' असा येथे एकंदरीने अर्थ घेतल्यास चालेल; किंबहुना 'लीळा' म्हणजे या क्रीडेच्या 'आठवणी' असाही लक्षणेने अर्थ घेता येईल. 'लीळाचरित्र' म्हणजे श्रीचक्रधराचे 'लीळारूप' (=लीळास्मरणरूप) असे चरित्र होय.)

'स्मरण' म्हणजे काय, हे स्पष्ट करणारी एक स्मृती या संदर्भात मोठी अभ्यसनीय आहे. "**एक वेळ पंडीतबासी केसोबासी मुख्य सीक्षी प्रस्नु केला : हो भटो तुम्हीं काइ स्मरा : भटोबासीं म्हणितलें : मी गोसावीयांचा त्रीकाळ पूजा–अवसर आठवी**" : त्यावर केसोबांनी भटोबासांना स्मरणाचे वचन विचारले, ते त्यांना आठवेना. तेव्हा महदाइसाने ते 'स्मरणाचें वचन' म्हटले. '**नाम : लीळा : मूर्ति : चेष्टा : स्मरण : आनुस्मरण : सकृत् स्मरण**', हे ते वचन होय.

---

१ *महानुभावांचा आचारधर्म*—डॉ. कोलते. पृ. २९९

यांपैकी 'नाम : लीळा : मूर्ति : चेष्टा' या चतुर्विध स्मरणाला महत्त्व आहे. श्रीचक्रधरस्वामींना 'देखिले तैसे आठविणे' म्हणजे 'दृष्ट' स्मरणविधी होय; आणि 'सन्निधानपर' ज्ञानिया-भक्तांनी श्रीमूर्तीचे लिहून ठेवलेले वर्णन वाचून किंवा ऐकून त्या मूर्तीचे तसे स्मरण करणे म्हणजे 'श्रुत' स्मरणविधी होय. महानुभावीय 'असतीपरी'त, म्हणजे आचारधर्मात 'विकारविकल्पशून्य' होऊन, 'स्वभावांना' मात्रा देऊन, व 'निरालंबी' म्हणजे 'अनासक्त' बनून अनुसरलेल्या पुरुषाने देवता (=परमेश्वर) स्मरण करीत जन्म क्षेपावा, असे म्हटले आहे[1] मूर्तिस्मरण, नामस्मरण, लीळा-चेष्टा-स्मरण, फार काय, स्थान-प्रसाद-भिक्षु व वासनिक यांचे सेवादास्यरूप स्मरण अष्टौप्रहर करावे, निदान चार प्रहरांचे 'अनुस्मरण' करावे, तेही शक्य नसेल तर दोन प्रहरांचे 'सकृत् स्मरण' तरी करावे, असा आदेश आहे. तेव्हा 'लीळाचरित्र' म्हणजे वरील 'स्मरणाच्या वचनानुसार श्रीचक्रधरांच्या सांगता येतील तितक्या क्षणांच्या लीळांचे स्मरण होय.

'लीळाचरित्रा'त परमेश्वराच्या सर्व संबंधी पदार्थांचे म्हणजे प्रसादांचेही स्मरण येते. नख–दाढ–केशादी मूर्तिनिष्ठ पदार्थ, अंगी–टोपरे आदी कार्पासवस्त्रे, चरण गादी आदी चर्मवस्तू, वाकी–साखळी आदी धातुवस्तू, फणी–करंडादी हस्तिदंती वस्तू, पाट–उंबरवटादी काष्ठवस्तू, जाळी–सोपानादी पाषाणवस्तू, ओटे–गोटे, स्थाने, अन्न–उपाहार इत्यादी साऱ्यांचा, या प्रसादपदार्थांत समावेश होतो.[2] या प्रसाद–पदार्थांचे स्मरणाने तत्संबद्ध परमेश्वरलीळा आठवून सुख होते. लीळाचरित्रात, पंथीयेतरांना जो अनावश्यक तपशील वाटतो, तो पंथीयांना आवश्यक तर वाटतोच, पण परमवंदनीय वाटतो, तो यामुळेच.

स्थानप्रसादादी जड संबंधी पदार्थांहून संबंधी चेतनपदार्थ अधिक वंदनीय होत. वासनिक, भिक्षू, ज्ञानिये, बोधवंत, वेधवंत यांचा या संबंधी चेतनपदार्थांत समावेश होतो. यांचे स्मरण म्हणजे श्रीचक्रधरांचे शास्त्रस्मरणच होय. 'लीळाचरित्र' हा स्मरणभक्तीचा आदर्श ग्रंथावतार होय, तो यामुळेच. 'श्रीगुरुचरित्र' हा ग्रंथ साधा मानला न जाता तो दैवीशक्तीने भारलेला, सिद्धमंत्ररूप व महाप्रासादिक असा 'वरद ग्रंथ' जसा दत्तोपासकांना वाटतो, तसा 'लीळाचरित्र'

---

१ *महानुभवांचा आचारधर्म*—डॉ. वि. भि. कोळते, पृ. २९१ ते २९३.

२ कित्ता. पृ. ३११.

हा ग्रंथही महानुभावीयांना आपला वरद ग्रंथ वाटतो. या स्मरणभक्तीची फलश्रुती '**जाणीव : सीहाणीव : चातुर्यें : कुसळता सांति : क्षेमा**' यांचा लाभ, ही आहे.

परमेश्वराच्या चतुर्विध स्मरणांपैकी 'दृष्ट' आणि 'श्रुत' स्मरणांना लीळाचरित्रात प्राधान्य लाभले आहे आणि ते स्वाभाविक आहे. परमेश्वराच्या नख-केशादी देहावयवांच्या, किंवा वस्त्रालंकारादी संबंधी वस्तूंच्या श्रद्धापूर्वक जपणुकीने होणाऱ्या सौख्याहून ह्या वस्तूंचे स्वामी म्हणजे साक्षात् श्रीचक्रधर, हे बसतात कसे, उभे राहतात कसे, अंगणी वेढे घेतात कसे, बोलतात कसे, हसतात कसे, खेळतात कसे, खातात कसे, विहरतात कसे, ही त्यांची क्षणाक्षणाची लीलाप्रवृत्ती मनश्चक्षूंनी न्याहाळीत राहाण्याचे सौख्य अधिक श्रेष्ठ नाही का? लीळाचरित्र-लेखन हे यामुळेच ईश्वरदास्याचे एक श्रेष्ठ साधन होय. लीळाचरित्र म्हणजे परमेश्वराच्या 'संबंधी' अशा चराचर वस्तुजाताच्या स्मरण-पुष्पांनी केलेली परमेश्वराची मानसपूजा होय. 'रत्नमाळास्तोत्र' वाचून होताच नागदेवाचार्य केसोबासांना म्हणाले, "**भलें केलें केसवदेया : गोसावियांचीया अमोघ लीळा बांधलीया : तुवां वाक् पुष्पीं ईश्वरार्चन केलें :**" (स्मृति. १४) लीळाचरित्रकारांनी मानसपूजेचे सुख स्वतः अनुभविले आणि 'मार्गियां'ना ते अनुभविण्याची उत्तम सोय करून ठेविली. म्हाइंभटाची ही 'स्मरणभक्ती' इतरांना 'श्रवणभक्ती' आणि 'कीर्तनभक्ती' यांचे सुख देण्याचे साधन ठरली.

संबंधित व्यक्तींना भेटून लीळा गोळा करण्याची पराकाष्ठा माइंभटांनी केली. ह्या आठवणी गोळा करणे म्हणजे माइंभटांनी स्वतः ईश्वरदास्याचा आनंद भोगणेच होय. ह्या ईश्वरदास्यापुढे त्यांना शरीरकष्टाची तमा नव्हती. '**म्हाइंभट अटनवीशेषें खेइभटांचेया गावां गेले : ... ... खेइंभट कृषीकर्म करीति : आणि माइंभट तयां मागां मागां गोसावियांचीया लीळा पुसति : खेइंभट सांघति : त्या म्हाइंभट नमस्करूनि घेति :**' पण नमस्करून घेतल्या म्हणून ह्या लीळा, जशाच्या तशाच स्वीकारण्यात मात्र आलेल्या नाहीत.

'**मग म्हाइंभटीं भटोबासांपुढां अवघें सांघीतलें : गोसावीयांचीया लीळा शोधूनि आणिलीया : तिया संवादिलिया : होये तें भटोबास**

मानिति : नव्हे तेथ म्हणति : हे श्रीमुखीचे शब्द नव्हेति : हे होती :' मराठीतल्या पहिल्याच चरित्रग्रंथनिर्मितीत, सत्यान्वेषक दृष्टीला इतके महत्त्व दिलेले पाहून, खरोखरच आश्चर्य वाटते. पण ही सत्याची इतकी पराकाष्ठेची जपणूक जी केली जाते, तिच्यामागेही परमेश्वर-पूजनाचाच विधि-नियम आहे. पूजाद्रव्य निर्मळ असावे; मंत्रोच्चार शुद्ध असावेत; मंत्रोच्चारदोष घडला तर पाप लागते; हे जसे, तसेच 'माझ्या परमेश्वराचे, हे जे मी मनोमन ध्यान करतो आहे; स्मरण-पूजन करीत आहे, त्यात अणुमात्रही विकृती किंवा अशुद्धी नसावी; माझ्या परमेश्वराचे, असत्य चित्रण 'किंवा स्मरण' हे पाप आहे;' हीच या मागील भूमिका आहे; आणि यामुळे लीळांच्या बाबत 'ज्याचीये अनुभवीचीया त्या त्यातेचि पुसावीया' असे नागदेवाचार्यांनी म्हाइंभटांना सांगितले, व ते म्हाइंभटांनी प्रत्यक्षात आणले. कठोर धार्मिक व्रताप्रमाणे ही सत्यनिष्ठा पाळली गेली आहे. म्हणून या परमेश्वराच्या लीळाचित्रणात असत्य रेखा किंवा रंग कोठेही उमटलेला नाही.

श्रीमुखींच्या शब्दांचे रक्षण किती पराकोटीला जाऊन करण्यात येई, त्याचे एक उदाहरण—'सर्वज्ञें म्हणीतलें : हें कोणे गा : केलें :' हा एक पाठ; तर 'हें कोणें केलें : देमती : ऐसें :' हा दुसरा. अर्थदृष्ट्या किंवा भावार्थदृष्ट्याही ज्यात काहीही फरक पडत नाही असे वरीलप्रमाणे भिन्न पाठ 'वासना,' 'एकी वासना,' "दूसरी वासना,' शोधू' असे स्पष्टोल्लेख करून 'लीळाचरित्रा'च्या संहितेत नोंदविले गेले आहेत. यात लीळा कथन करणाऱ्या व्यक्तीशी म्हाइंभट प्रामाणिक राहिले आहेत आणि परमेश्वराच्या श्वास-निःश्वासाचीही नोंद करण्यात, पर्यायानेही त्यांच्या हातून प्रतारणा होऊ शकली नाही. भिक्षान्न मागून आणल्यावर ती झोळी श्रीचक्रधर दृष्टपूत' करीत असत व मग तो 'प्रसाद' सर्वजण घेत; तसेच म्हाइंभटाने आणलेले 'आठवणीं'चे हे भिक्षान्न नागादेवाचार्यांनी 'दृष्टपूत' करून मग पंथीयांना 'प्रसाद' म्हणून दिले आहे. ही 'scrupulous authenticity' विस्मयकारक आहे.

परमेश्वराचे म्हणजे श्रीचक्रधराचे, जे जे लीळास्वरूप समजेल, ते ते नमस्करून घ्यावयाचे, अशी ठाम श्रद्धा असल्यानंतर मग लीळांची निवड करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही; भक्ताच्या मनात लीळांच्याबाबत सामान्य-असामान्य असा भेदच संभवत नाही. हा भेद त्रयस्थ वाचकाच्या मनात निश्चितच

निर्माण होणारा आहे. त्याला या पाठभेदाचे मोठे महत्त्व आणि विशेष औचित्य न वाटणे अगदी स्वाभाविक आहे. अतिसामान्य तपशिलाची नोंद वगळली असती, तर त्याला हवे होते. पण म्हाइंभट आणि नागदेवाचार्य यांची भूमिका ध्यानी घेता, लीळाचरित्राचे आजचे स्वरूप जे आहे, ते तसेच होणे अपरिहार्य होते, हे आपोआपच कळून येईल. डॉ. जॉन्सनचे चरित्र लिहिणाऱ्या बॉस्वेलने 'Even an idle talk of a good man ought to be regarded. The most superfluous things, he saith, are always of some value' अशा एका जुन्या वचनाचा आधार आपल्या डॉ. जॉन्सनच्या चरित्रग्रंथाच्या प्रस्तावनेत आत्मसमर्थनार्थ नमूद केलेला आहे. डॉ. जॉन्सनकडे आणि त्याच्या हकिकतीकडे पाहताना बॉस्वेलच्या दृष्टीत इतका Superstitious reverence येऊ शकतो, तर म्हाइंभट आणि नागदेवाचार्य ह्या केवळ ईश्वरदासांच्या दृष्टीत भक्तीची एकांतिकता आली, तर त्यात नवल ते कोणते? 'श्रीचक्रधरांचे आठवावे रूप' किंवा 'श्रीचक्रधरांचे कैसे चालणे,' 'श्रीचक्रधरांचे कैसे बोलणे' हे मनातल्या मनात आठवावे आणि सुखरूप व्हावे, हीच म्हाइंभटाची व नागदेवाचार्यांची वृत्ती होती. 'लीळाचरित्र' म्हणजे केवळ परमेश्वराची नामभक्ती नाही, तर ते परमेश्वराच्या मानवी अवतारातील प्रत्येक क्षणाच्या लीळेचे भक्तिभावाने केलेले स्मरण आहे.

श्री. स. वि. बापट यांनी संपादित केलेल्या 'लोकमान्यांच्या आठवणी व आख्यायिका' या ग्रंथाच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत तात्यासाहेब केळकरांनी म्हटले आहे की, 'मोठ्याच्या लहानसहान गोष्टीही आदरणीय ठरतात. कारण त्यांच्यामुळे थोर विभूतींचे स्मरणप्रसंग वाढतात. हे स्मरण नित्य, निदान जितका अधिक वेळ घडेल तितके घडावे, असे वाटणे स्वाभाविक आहे...यामुळे या हकिकती किंवा ही वाक्ये विशिष्ट विभूतिपूजनाला स्मृतीचे अधिक सगुण अधिष्ठान मिळवून देतात,...आपणांस कोणाचेही स्मरण होते, ते तत्संबंधी सगुण रूपाच्या कोणत्यातरी एक किंवा अनेक अंगांनीच होते. निर्गुण अशी आठवण होऊच शकत नाही.'' यामुळे आठवणींच्या ग्रंथांच्या मुळाशी 'सगुणपूजेचे तत्त्वच' असल्याचे तात्यासाहेबांना दिसून येते. ते म्हणतात, ''देवपूजेतील सामग्री सामान्य किंमतीचीच असते; परंतु देवपूजेची भावना उत्पन्न करून देणारे अभिषेकपात्र चार आण्यांचे असले, तरी आंघोळीचे पाणी तापविण्याच्या

पन्नास रुपये किंमतीच्या बंबापेक्षा ते अधिक पवित्र व जपून ठेवावेसे वाटते... खऱ्या संस्मरणीय आणि तेजस्वी अशा दहा-पाच हकिकती इतर सामान्य अशा शेकडो हकिकतींना आपणांबरोबर तारून नेतात." तात्यासाहेबांची ही मीमांसा अग्राह्य होण्यासारखी नाही. लीळाचरित्ररचनेच्या बाबत तर ही मीमांसा पूर्णपणे लागू पडतेच! म्हणून लीळाचरित्रात आढळून येणारा प्रमाणाबाहेरील तपशील का आला, त्याचे आता वेगळे स्पष्टीकरण करावयास नको.

म्हाइंभटांनी या लीळा अनेक व्यक्तींकडून जमा केल्या व त्यांचे लेखन केले. कोणी कोणत्या लीळा सांगितल्या, ते स्वतंत्रपणे नमूद केलेले नाही; तशी आवश्यकता नव्हती. अर्वाचीन आठवणीसंग्रहाकडे पाहता आठवणींतून चरित्रव्यक्तीचे नुसते चित्र न दिसता, त्याजबरोबर चित्र काढणाराचेही मनःस्वरूप दृग्गोचर होते. याचे कारण 'आठवणी' सांगणारे कोणीतरी मित्र, आप्त, सहाध्यायी, सहकारी, परिचित, अनुयायी इत्यादींपैकी असतात. त्यात चरित्रव्यक्ती आणि आठवणीकार यांच्यांतील नात्याची विविधता, कमीअधिक जवळीक पाहाणेही मनोरंजक असते, बोधप्रद असते. आठवणी कथन करणारी व्यक्ती ही मोठी प्रतिष्ठित आणि सुप्रसिद्ध असली तर तिच्या मतांना वेगळे महत्त्व आपोआपच प्राप्त होते; यामुळे अर्वाचीन आठवणीबाबत 'काय' म्हटले आहे, याच्याबरोबर 'कोणी' म्हटले आहे, यालाही तितकेच महत्त्व येते. शिवाय एकाच प्रसंगाचे किंवा घटनेचे चित्रण वेगवेगळ्या व्यक्तींनी आपापल्या आठवणीतून केले असेल आणि त्यात त्यांच्या दृष्टिकोणात भेद पडत असेल, तर मूळ सत्य पारखून पाहाण्यासही त्यामुळे मदत होते, आणि आठवणीकारांच्या मनोवृत्तीवरही प्रकाश पडतो. अर्वाचीन आठवणी या एकाच रंगाने रंगलेल्या नसतात. व्यक्तिपरत्वे त्यांना स्वतंत्र रंगच्छटा प्राप्त होतात. लीळाचरित्रात चरित्रविषय–व्यक्तीशी आठवणीकारांचे नाते असे बरोबरीचे, मोकळेपणाचे नाही; ते अनेकविधही नाही, 'परमेश्वर आणि भक्त' हे नाते, आणि त्याच्याच काही ठळक, काही सूक्ष्म, अशा भावच्छटा लीळाचरित्रात उमटलेल्या आहेत. परमेश्वराची पूजा बांधताना स्वतःच्या नामाची उपाधी किंवा स्वतःचा अहंकार लुप्त होणेच इष्ट आहे. यामुळे एकेका आठवणीकाराच्या आठवणींचा एकेक गट, असे गट पाडून आठवणी देणे, ही कल्पनाच येथे अप्रस्तुत होय.

ह्या आठवणी, म्हणजे ह्या लीळा, चरित्रलेखनाचे साधन म्हणून किंवा मुळात लिहिलेल्या एखाद्या चरित्राला पूरक म्हणूनही संग्रहित केलेल्या नाहीत. ह्या लीळा म्हणजेच चरित्र! 'लीळा' हेच साध्य होय. यामुळे जणू वेगवेगळ्या मुलाखती घेऊन, त्यांतील सत्यासत्य पारखून त्यांचे स्वतः पुनर्लेखन करून, कालक्रमानुसार त्या लावून, त्यांतून सलगपणे चरित्र-चित्रपट उलगडत जावा, असे या लीळाचरित्राचे स्वरूप झालेले आहे. ह्या केवळ आठवणी नाहीत, तर त्यांनी मिळून झालेले आठवणीरूप सलग चरित्र होय.

श्रीचक्रधरस्वामी हा लीळाचरित्राचा विषय आहे. जीवांचे उद्धरण करण्याच्या हेतूने त्यांनी अवतार घेतल्याने त्यांना 'जीवोद्धारव्यसनी अवतार' असेच म्हणतात. श्रीचक्रधर हे 'पर' आणि 'अवर' या दोन्ही विद्या जाणणारे असे 'उभयदृश्यावतारी' होते. अधिकारी व्यक्तींना शोधणे, योग्यतेनुसार त्यांना ज्ञान किंवा प्रेम देणे : जे अनधिकारी असतील त्यांच्याकडून पापकृत्ये करवून, त्यांचा पापमळ धुवून काढून त्यांना अधिकारी बनविणे, अन्य देवतांच्या कचाट्यातून त्यांना सोडविणे हेच या अवताराचे जीवितकार्य होते. स्वतः चक्रधर हे श्रीगोविंदप्रभूचे आदर्श भक्त होते. '**श्रीप्रभु : साक्षात करचरणवंत ब्रह्म : श्रीप्रभूची सेवा ते अदृष्टसेवा**' असे श्रीचक्रधरांनी आपल्या गुरूसंबंधी उद्‌गार काढले आहेत. '**श्रीप्रभूचे रज कैसे : हे ब्रह्मादीकां दुर्लभ कीः**' अशी त्यांची श्रीप्रभूंवरील भक्ती होती. श्रीप्रभू जेथे राज्य करीत, तेथे श्रीचक्रधर स्वतःची पूजा करून घेत नसत; उलट स्वतःच श्रीप्रभूंची पूजा करीत असत. परमेश्वरपुराला (ऋद्धिपुराला) जाताना दुरून 'शाळेचा कळस' देखताच ते जयजयकार करीत. आपल्या आचरणाने भक्तीचा उत्तम आदर्श स्वतः श्रीचक्रधरांनीच आपल्या शिष्यांना जणू घालून दिला होता. श्रीचक्रधरांची गुरुनिष्ठा, त्यांचे ईश्वरावतारित्व, त्यांची उद्धरणप्रवृत्ती आणि कृती, त्यांची हास्य–विनोद–क्रीडा, स्वच्छंदपणे होणारी भ्रमंती, शिष्यजनपरिवार आणि चमत्कार, त्यांनी केलेले स्वतंत्र शास्त्रनिर्वचन, त्यांची मुक्तमनस्कता यांचीच प्रसंगचित्रे लीळाचरित्रातून जागोजाग विखुरलेली अम्हेत; म्हणजेच असे की, या लीळांतून केवळ अवतारी पुरुषांची अवतारचित्रे नाहीत, तर त्यांच्या अवतारकृत्याची निदर्शक अशी ही चित्रे आहेत. यामुळेच 'लीळाचरित्र' हे महानुभावीयांची 'श्रुती' म्हणून सन्मानिले जाते. यातूनच श्रीचक्रधरांची

'सिद्धान्तसूत्रे' प्रकट झाली, जीवोद्धरणाचे ज्ञान 'दृष्टान्त'रूपाने व्यक्त झाले.

'लीळाचरित्र' हे तत्कालीन म्हणजे यादवकालीन महाराष्ट्राचे धार्मिक किंवा राजकीय चरित्र नव्हे, कारण श्रीचक्रधर हे स्वकालीन राजकारण किंवा धर्मकारण यांच्याशी एकजीव झालेले नव्हते. ते कोणत्याच राजकीय किंवा धार्मिक चौकटीत न बसणारे, स्वतःच्याच पंथाने जाणारे एक स्वतंत्र, स्वयंप्रकाशी, सर्वज्ञ 'गोसावी' होते. जनलीळा कौतुकाने पाहात आणि काही स्वतःच्या अवतार-लीळा करीत विहरण करणाऱ्या एका ईश्वरावतारी पुरुषाच्या, लौकिकातील अलौकिक आयुष्याचे, प्रामाणिक व सत्यरूप असे चित्रण म्हणजे हे लीळाचरित्र होय. श्रीचक्रधरांची ती वाङ्मयी मूर्ती आहे. म्हाइंभट व नागदेवाचार्य यांच्या स्मरणभक्तीची कधीही न आटणारी ही गंगा आहे. या 'स्मृति–श्रुति–गंगे'त स्नान केल्याने पंथीय पुरुष धन्य होतात.

लीळाचरित्र म्हणजे शब्दरूप 'आदर्शा'त क्षणोक्षणी प्रतिबिंबित झालेली, महानुभावीयांची, श्रीचक्रधरसंबंधीची, 'स्मरणभक्ती' होय !

प्रकरण दुसरे

# त्रिखंडात्मक लीळाचरित्राचे त्रिविध स्वरूप

## प्रास्ताविक

- श्रीचक्रधरांच्या आयुष्याचे कालखंड
- लीळांची बांधणी – ' संकलन–संपादन – निवेदनात्मक '

## ' एकांक '

- ' एकांक 'ची सर्वाधिक आस्वाद्यता–कारणमीमांसा
- श्रीचक्रधरांचे बदलते, वाढते व्यक्तिमत्त्व – त्यांच्यातील मानवी आणि अतिमानवी अंशांचे मनोहर दर्शन – महानुभावित्वाच्या विविध पैलूंची झलक – कालदृष्ट्या दूरता, यामुळे येणारी साकल्यात्मक दृष्टी – आपोआपच झालेली लीळांची निवड – श्रीचक्रधरांच्या आत्मकथनामुळे आलेला जिव्हाळा – कथानकाची गोडी–
- ' एकांक ' म्हणजे ' अवतारी पुरुषा 'तल्या ' माणसा 'चे सुरम्य चित्रण.

## पूर्वार्ध

- दैनंदिनीतल्या नोंदीच जणू – शिष्यांसमवेत नित्य पदयात्रा – श्रीचक्रधरांची वेधशक्ती, त्यांच्या अनुयायांची वाढ – नागदेवाचार्यांना बोध.

## उत्तरार्ध

- दक्षिण गोदातटाकी भ्रमंती – शिष्यमंडळ स्थिरावले – श्रीचक्रधरांचा धर्मनिरूपणावर भर – ' उत्तरार्ध ' म्हणजे जणू एक ' बृहद्-दृष्टान्तपाठ 'च – शिष्या-शिष्यांमध्ये हास्यविनोद-सूक्ष्म असूया इ० – श्रीचक्रधरांची निर्याणप्रवृत्ती – नागदेवाचार्य ' पहिले आचार्य '–उपसंहार.

# त्रिखंडात्मक लीळाचरित्राचे त्रिविध स्वरूप

## *श्रीचक्रधरांच्या आयुष्याचे कालखंड आणि लीळांचे संख्या-स्वरूप*

श्रीचक्रधरांच्या आयुष्याचे पांच कालखंड डॉ. कोलते मानतात. (१) अवतार-स्वीकार (२) शक्तिस्वीकार (३) नागांबिकेला प्रेमदान (४) नागदेवाचार्यांचे अनुसरण आणि (५) प्रयाण...श्री. य. खु. देशपांडे यांनी 'अवतार-स्वीकार' आणि 'शक्तिस्वीकार' या दोन्हींचा मिळून एकच 'कालखंड' मानला आहे व त्यास ते 'राजधर्म-काळ' असे नाव देतात. श्री. य. खु. देशपांडे यांच्या मते मग श्रीचक्रधरांच्या आयुष्याचे चारच कालखंड होतात. स्वतः 'लीळाचरित्र' कारांनी चार किंवा पाच असे भाग न करता, 'पूर्वार्ध' आणि 'उत्तरार्ध' असे दोनच भाग प्रारंभी कल्पून त्याप्रमाणे श्रीचक्रधरांच्या लीळांचे संकलन-संपादन केले. पैठण येथे संन्यास स्वीकार करून जीवोद्धरणासाठी श्रीचक्रधर भ्रमणास निघाले, तेथपासून ते खडकुली येथे श्रीनागदेवाचार्य यांना दीक्षा देईपर्यंतचा कालखंड म्हणजे 'पूर्वार्ध' होय; आणि येथून पुढे श्रीचक्रधरांचे उत्तरापंथे गमन होईपर्यंतचा काल म्हणजे 'उत्तरार्ध' होय. 'पूर्वार्धकाळ अवघा वर्षे ४ आन मास दीढ' आणि 'उत्तरार्ध अवघा वर्षे ४'; मिळून आठ वर्षे आणि दीड महिना एवढ्याच कालावधीत श्रीचक्रधरांनी जीवोद्धरणाचे कार्य केले, 'लीळाचरित्र' म्हणजे या शेवटच्या आठ वर्षांतील श्रीचक्रधरांच्या आयुष्यक्रमाची नोंद होय. श्रीचक्रधरांचे आयुष्य शंभराहून अधिक वर्षांचे आहे; तेव्हा 'पूर्वार्ध' जेथून सुरू होतो, त्या आधीच्या सुमारे ९०-१०० वर्षांच्या आयुष्याचा तपशील म्हाइंभटांना मिळू शकला नाही. या काळात

श्रीचक्रधरांची 'एकाकी' भ्रमंती चालू होती. शिष्यपरिवार जमल्यानंतर प्रसंगपरत्वे, प्रवृत्ती झाली, तर स्वतः श्रीचक्रधरांनी पूर्वायुष्यासंबंधी, पुढे कधी कचित् जे काही उद्गार काढले व ज्यांचा 'पूर्वार्ध' व 'उत्तरार्ध' यांमध्ये आधीच समावेश करण्यात आला होता, ते प्रसंग आणि ते उद्गार वेगळे काढून त्यांचा 'एकांक' या नावाने वेगळा "खंड" करण्यात आला असावा आणि मग रीतसर 'एकांक' 'पूर्वार्ध' आणि 'उत्तरार्ध' असे कालक्रमानुसार त्रिखंडात्मक असे आजचे लीळाचरित्र सिद्ध झाले असावे. म्हणजे श. १०७५ ते ११८५ हा कालखंड 'एकांका'चा; श. ११८५ ते ११८९ हा 'पूर्वार्धा'चा आणि श. ११८९ ते ११९४ हा 'उत्तरार्धा'चा होय. (श्री. य. खु. देशपांडे यांनी मानलेल्या जन्मनिर्याणशकान्वये).

या त्रिखंडात्मक 'लीळाचरित्रा'त मिळून सुमारे दहाशे पन्नास लीळांचा समावेश झालेला आहे. यांपैकी 'एकांका'मध्ये केवळ पंचाहत्तर-शहात्तर लीळा आहेत; कारण या काळातील श्रीचक्रधरांचा आयुष्यक्रम न्याहाळण्यास कोणीच शिष्य त्यांच्याबरोबर नव्हता; 'पूर्वार्धा'मध्ये भरपूर तपशील येतो; श्रीचक्रधरांची भ्रमंती शिष्यपरिवारासह झालेली, त्यामुळे त्यांच्या उपलब्ध आठवणी सांगणाऱ्या या कालखंडातील व्यक्ती किंवा शिष्य म्हाइंभटांना होते. स्वतः म्हाइंभट किंवा नागदेवाचार्य यांना, या कालखंडात, श्रीचक्रधरांचे सन्निधान अत्यल्प लाभलेले आहे; भटोबास सहा-सात वेळांच श्रीचक्रधरांना भेटल्याचे दिसते. 'उत्तरार्धा'मध्ये मात्र, नागदेवाचार्य (मधला ऋद्धिपूर येथील त्यांचा सहा महिन्यांचा वास्तव्याचा काळ वगळला तर) श्रीचक्रधरांच्या निर्याणापर्यंत सतत त्यांच्या सान्निध्यात होते. यामुळे 'उत्तरार्धा'मध्ये अगदी बारीकसारीक तपशीलही विस्ताराने आलेला आहे. 'एकांक' म्हणजे स्वतः श्रीचक्रधरांनी सांगितलेल्या स्वतःच्या कांही आठवणींचे 'संकलन' आहे; 'पूर्वार्ध' म्हणजे अनेकांच्या आठवणींचे म्हाइंभटांनी केलेले 'संकलन-संपादन' आहे, तर 'उत्तरार्ध' म्हणजे स्वतः नागदेवाचार्यांनी केलेले 'निवेदन' आहे. त्रिखंडात्मक लीळाचरित्राच्या रचनेचे अशा तऱ्हेने 'संकलन-संपादन-निवेदनात्मक' असे त्रिविध स्वरूप आहे. मात्र या एकूण निर्मितीचे श्रेय म्हाइंभटाकडेच जाते. म्हाइंभटांनी परिश्रमपूर्वक श्रीचक्रधरांच्या या आत्मकथनाला, नागदेवाचार्यांच्या

निवेदनाला' आणि इतरेजनांच्या कथनाला जर 'ग्रंथ' रूप दिले नसते, तर हे सारे हवेत विरून गेले असते. आठवणी ह्या अगदी 'volatile' आणि 'evanescent' असतात; त्या त्या पिढीकडून त्या जर काढून घेतल्या नाहीत आणि 'सुरक्षित' ठेवल्या नाहीत, तर त्या कालोदधीत कायमच्या गडप होऊन जातात. तात्यासाहेब केळकरांच्या भाषेत बोलायचे तर 'आठवणी' ह्या छायाचित्रासारख्या असतात; जनतेजवळ negatives असतात; संपादकाने त्यांची 'prints' काढून घ्यावयाची असतात.' म्हाइंभटांनी हे कार्य अत्यंत सचोटीने, दक्षतेने, साक्षेपाने, निरलसतेने, केवळ भक्तिप्रेमापोटी केले.[२]

## 'एकांक'

'लीळाचरित्रा'च्या तीन खंडांपैकी 'एकांक' हा सर्वांत अधिक आस्वाद्य वाटतो. येथे जणू आपोआपच, अपरिहार्यपणे लीळांची निवड झाल्यासारखेच झाले आहे. कारण शिष्यांनी पृच्छा केल्यावरून, औत्सुक्य दाखविल्यावरून किंवा जुनी एकादी समान घटना घडल्याची आठवण होऊन श्रीचक्रधरांनी आपल्या पूर्वायुष्यातील काही महत्त्वाच्या व ठळक प्रसंगांच्या सांगितलेल्या आठवणीच फक्त 'एकांका' मध्ये आलेल्या आहेत, हे मागे सांगितलेच. शिवाय 'एकांका' मध्ये आलेले श्रीचक्रधरांचे आयुष्य हे मोठे वैचित्र्यपूर्ण आणि विविधतेने नटलेले आहे. श्रीचक्रधरांच्या येथील आयुष्यात एकसारखी, अचानकपणे, मोठी विलक्षण अशी स्थित्यंतरे घडत गेली आहेत. त्यांच्या अवतारस्वीकाराच्या प्रसंगापासूनच त्यांच्या अलौकिकत्वाला प्रारंभ होतो; पण त्या आधीची पूर्व-पीठिकाही आवश्यक तेवढ्या तपशिलाने 'एकांका' मध्ये आलेली आहे.

---

१ मात्र प्रत्यक्ष लीळाचरित्रात हे निवेदन नागदेवाचार्यांच्या तोंडी प्रथमपुरुषी असे आलेले नाही.

२ म्हाइंभटानंतर, इतक्या मोठ्या प्रमाणावर, इतके मोलाचे आणि इतक्या उत्कट भावनेने कार्य करणारे, म्हणजे 'लोकमान्यांच्या आठवणी व आख्यायिका' याचे संपादन करणारे श्री. स. वि. बापट हेच होत. त्यांना 'अर्वाचीन म्हाइंभट' म्हणावयास हरकत नाही. मराठी वाङ्मयात 'आठवणीकार' म्हणून 'म्हाइंभट आणि बापट' हीच दोन नावे सतत डोळ्यांसमोर राहतील. रमाबाई रानडे आणि लक्ष्मीबाई टिळक यांच्या ग्रंथांचे स्वरूप चरित्र-आत्मचरित्रात्मकच पुष्कळसे आहे.

श्रीचांगदेव राऊळांना व्याघ्रवेषाने श्रीदत्तात्रेयांनी केलेला अनुग्रह, व श्रीगोविंदप्रभूंना श्रीचांगदेवाकडून मिळालेला अनुग्रह ह्या प्रसंगनिवेदनाने श्रीचक्रधरांची गुरुपरंपरा स्पष्ट होते. प्रारंभीच या लीळा आल्याने, श्रीचक्रधरांचा गृहस्थाश्रम पाहताना एक वेगळी मौज वाटते. त्यांचे ते 'जू' हारविणे, कमळाइसाने 'अलंकारु' न देणे, मग रुसून 'उपरीयेवरि पहुडु स्वीकरणे' आणि अखेर वडिलांनी त्यांना 'उपंगळिए घेऊनि' उठविणे—या लहानशा प्रसंगचित्रणाची गोडी अवीट वाटते. श्रीचक्रधरांची ही कृती मानवी वाटते; यात आपल्या भावनांच्या समस्पंदनाला वाव आहे. अवतारी पुरुषाच्या सामान्य गृहस्थसदृश लीळा पाहण्यात जो एक मजेदार आनंद वाटतो, तो 'एकांका'-मध्ये सतत अनुभवास येतो. आईवडिलांना रामयात्रेचे निमित्त सांगून, फसवून दर मुक्कामी एकेक नोकरास रजा देत देत श्रीचक्रधरांनी रिधपूर गाठल्याची हकिकत; मध्येच बारा वर्षे विंध्यपर्वती विरक्तस्थितीत केलेली भ्रमंती आणि पुन्हा हंसांबाशी केलेला विवाह; अवधूतदर्शन होताच 'आतां एथौनि ऐसीयां होइजैल' म्हणून प्रपंचाचा केलेला त्याग, गोवाऱ्यांच्या मुलांसह रानभेरीचा खेळ, ब्राह्मणाच्या गायी राखणे, चोर म्हणून स्वतःला कैद होणे, त्रिगारीसाठी त्यांना पकडून नेणे, लग्नघरी उभय पक्षांचे वऱ्हाडी म्हणून सन्मान लाभणे, उकिरड्यातच झोपणे, गोपाळांचा दहीभात वाटून खाणे; या लीळांतून दिसून येणारे चक्रधर आपल्यातील आहेत, असे वाटता वाटता एकदम आपणापेक्षा कितीतरी वेगळे वाटू लागतात. गोसावीयांची महात्मता आणि वेधशक्ती यांचाही प्रत्यय लीळांतून येतोच. त्यांच्या ठिकाणची काळवंचना करण्याची किंवा मृतास सजीव करण्याची शक्ती, उन्मत्त रानमहिष, व्याघ्रपिले किंवा झुंजणारे सर्प यांना लीलया दूर सारण्याचे त्यांचे सामर्थ्य, शरण आलेल्या सशास 'महात्मा' म्हणून गौरविणे यात दिसून येणारे श्रीचक्रधर सामान्य मानवी पातळीवरील नाहीत. ('एकांका'मधील श्रीचक्रधरांचे चरित्र सामान्यातून असामान्यात, मानवत्वातून देवत्वात, आणि पुन्हा देवत्वातून मानवत्वात केव्हा आणि कसे बदलते, ते आधी ध्यानीच येत नाही. हा फेरबदल मोठा लक्षणीय आहे, चित्तवेधक आहे; प्रत्येक लीळेत श्रीचक्रधरांच्या महानुभावित्वाचा कोणता ना कोणता तरी पैलू चमकताना आढळतो. 'एकांक' हा खंड यामुळेच मोठा वाचनीय झाला आहे.)

'एकांका'मध्ये श्रीचक्रधर कोणाचे तरी पुत्र, कोणाचे पती, कोणाचे मित्र, कोणाचे मित्र, कोणाचे खेळगडी, कोणाचे सेवक, कोणाचे कैदी, कोणाचे विमोचक, अशा वेगवेगळ्या नात्यांनी आपल्या डोळ्यांसमोर उभे राहातात. ह्या अवतारी पुरुषातला 'माणूस' आपण पाहातो, आणि या माणसातला 'अवतारी पुरुष' ही आपणांस दिसू शकतो. 'भरवस'चा प्रधानपुत्र हरपाळदेव कसकसा बदलत गेला आणि अखेरीस संन्यासी महात्मा झाला, 'हरपाळदेवाचे प्रतिष्ठानीचे चांगदेव राऊळ' कसे झाले, याचा निवडक लीळांच्या आधारे अगदी नेमका, अतिशय चित्तवेधक आणि गतिमान असा चित्रपट 'एकांक'च्या रूपाने आपण पाहत असतो. यामुळे 'एकांक' अगदी चटकदार आणि परिणामकारक झाला आहे.

'पूर्वार्धा'मध्ये श्रीचक्रधर जे दिसतात, ते एकदम पूर्णतः 'परमेश्वरावतार' म्हणूनच. त्यात साध्या माणसाचे रुसवे फुगवे, हर्ष-खेद नाहीतच. एक 'सिद्ध पुरुष' म्हणूनच लोक त्यांच्याकडे पाहातात. स्वतः श्रीचक्रधरांच्या उक्तीतूनही ते प्रकट होते. यामुळे 'एकांका'मधील श्रीचक्रधरांच्या आचरणातील मानवअंश, मानव आणि देव या दोन कोटींमध्ये त्यांची होणारी येरझार, 'अंध्रदेशी एकी गावीं आंगणीं बाजसूपवतीए वरि निजैली तेलीणि तिएसवे पहुड स्वीकरणे' असला गजबजून सोडणारा लोकविलक्षण आचार यांचा आढळ 'पूर्वार्ध'मध्ये घडत नाही; (शंभर वर्षांतील आयुष्याची हकिकत सत्तर-पंचाहत्तर लीळांतून प्रकट झाल्याने 'एकांका'मधील लीळा कसदार आणि गतिशील झाल्या आहेत; शिवाय त्यांना कालदृष्ट्या एक प्रकारचे दूरतेचे सौंदर्यही लाभले आहे.) वर्तमानातल्या निकटवर्ती तपशिलाने 'पूर्वार्ध' आणि 'उत्तरार्ध' यांतील कितीतरी जागा अडविली आहे. त्यामुळे एकाहून एक सरस अशा लीळांची ती रत्नमाला होऊ शकत नाही; 'एकांका'ला मात्र ह्या 'रत्नमाले'चा दर्जा प्राप्त झाला आहे.

'एकांक' आणि 'एकांकेतर लीळाचरित्र' यांत आणखी एक भेद आस्वाददृष्ट्या जाणवतो. 'एकांका'मध्ये प्रत्यक्षपणे आणि पूर्णपणे केवळ श्रीचक्रधरांच्या बदलत्या-वाढत्या व्यक्तित्वाचा, त्यांच्या मनोभावांचा, त्यातील लौकिकालौकिक रंगच्छटांचा मनोरम विलास पाहावयास मिळतो. 'पूर्वार्ध–उत्तरार्ध'मध्ये श्रीचक्रधरांच्या भेटीस आलेल्या, त्यांना अनुसरलेल्या त्यांच्या शिष्यांचे मनोभाव,

त्यांच्यांतील वैचित्र्य आणि विविधता यांनाच प्राधान्य आले आहे. 'पूर्वार्ध-उत्तरार्ध'मधील आठवणी ह्या शिष्यांच्या श्रीचक्रधरविषयक आठवणी आहेत; त्यामुळे नाही म्हटले तरी शिष्यांच्या किंवा संबंधित व्यक्तींच्या व्यक्तित्वाच्या मर्यादा त्यावर पडल्या आहेत आणि मूळ कथाविषयभूत व्यक्तीचे म्हणजे श्रीचक्रधरांचें दर्शन, जे घडते ते थोडेफार 'अप्रत्यक्ष' असेच घडते. 'एकांका' मधील आठवणी स्वतः श्रीचक्रधरांनी स्वतःसंबंधीच सांगितल्या आहेत; त्यामुळे त्यांना कसलीच बाहेरून मर्यादा पडलेली नाही. 'एकांक' वाचीत असताना आपण 'श्रीचक्रधर' या व्यक्तीमध्ये, त्यांच्या चमकदार विविधरंगी (Colourful) व्यक्तित्वामध्ये रंगून जातो. 'पूर्वार्ध-उत्तरार्ध'मध्ये मात्र त्यांच्या जीवोद्धरणकार्याकडे, पर्यायाने त्यांच्या शिष्यजनांच्या आचारविचारांकडे, मनोदर्शनाकडे आपले लक्ष अधिक जाते. 'एकांका' नंतर श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्वात आता कसलाच फेरबदल व्हावयाचा नसतो, इतकी त्याला स्थिरता लाभलेली आहे, त्यांचा जीवनहेतूही निश्चित झालेला आहे; यामुळे 'पूर्वार्ध-उत्तरार्ध'मधील श्रीचक्रधरांचे आयुष्य एका सरळ रेषेत गेल्यासारखे दिसते. 'एकांक' आणि 'एकांकेतर लीळाचरित्र' यांतील श्रीचक्रधरजीवनदर्शनातील हा भेद आस्वादकाला जाणवतो. महानुभाव पंथीयांच्या दृष्टीने ह्या भेदाला अस्तित्वच नाही, हे वेगळे.

## *पूर्वार्ध*

'एकांका'ला एक कथानक आहे, आणि या कथानकाची गोडी हेच 'एकांका'चे खरे आकर्षण आहे. नव्वद शंभर वर्षांची ती 'कहाणी' आहे; तर 'पूर्वार्ध–उत्तरार्ध' ही सात-आठ वर्षांची 'दैनंदिनी' आहे. या दैनंदिनीत अगदी न चुकता श्रीचक्रधरांच्या प्रत्येक दिवसाची नोंद आलेली नाही. (तशी प्रतिदिनीची लीळा मिळाली असती तर म्हाइंभटाकडून तिचा भक्तिभावाने स्वीकार झालाच असता.) या काळात श्रीचक्रधर एकटे कधीच राहिलेले दिसत नाहीत. या स्थळाहून त्या स्थळी त्यांचे विहरण चालू असे; कधी 'चरणचारी उभे,' तर कधी 'आसन,' 'वसती' किंवा 'अवस्थान' होत असे. आसन कधी 'वृक्षातळी, कांटियेवरि,' 'पटिसाळेवरि,' 'देऊळीच्या सोंडियेवरि' किंवा 'ओटियेवरि' होई; 'मठ, गुंफा, देऊळीं' 'जैनमंदिरीं,' वसती होई.

कधी ‘गगनाची वास पाहात’ असलेले, तर कधी अंगणी वेढे करणारे’ तर कधी शिष्यांच्या ‘खांदियावरि श्रीकरू’ ठेवून ‘बीजे करीत असलेले’ श्रीचक्रधर या लीळांतून दृग्गोचर होतात... गावीचे महाजन–भक्तजन–भेटतात, ‘दरिसन’ घेतात, चरणां लागतात, दंडवत घालतात, ‘नगर–श्रींगार’ करतात, रंगमालिका काढतात, उपाहारा बोलावितात... प्रवृत्ती असेल तर श्रीचक्रधर जातात, नाहीतर पुढच्या मुक्कामी उपाहार घेऊन येण्यास सांगतात. कधी शिष्यांना भिक्षान्न आणावयास लावतात, व ते दृष्टपूत करून प्रसाददान म्हणून देतात. ‘दधीभातू पाणीभातु–आलें, तूप–दिढरे, गुळमेली,’ हे विशेषतः नित्याचे अन्न. ‘आरोगण’ होताच, ‘गुळळा’ करून वीडा ओळगविला जाई; प्रसाद म्हणून ‘तांबूल’ घेण्यासाठी शिष्य उत्कंठित होत, अशी दिनचर्या चाले. ‘पस्यात् पाहारी’ किंवा ‘उदियेवरी’ उठून, परिश्रय सारून, दंतधावन होई; ‘प्रातःपूजा’ होई. मग थोडे विहरण; नंतर चरणक्षाळण; प्रवृत्तिविशेषे मर्दना–मादन होत असे. पुडु–वाटुव्यातून फोडी काढून ओळगविणे तर नित्याचेच असे. ‘पूर्वार्धा’ मध्ये ही दिनचर्या सारखी पाहावयास मिळते.

पहाटे, संध्याकाळी किंवा चांदण्यात, प्रवृत्ती होईल तसे श्रीचक्रधर ग्रामांतरास निघत; हास्यविनोद करीत, गप्पा मारीत ‘अटन’ चालू असे. जाता जाता कोठे जमीन साफ करणे, खड्डा भरुन काढणे, गुंफा उभी करणे, सांडोवा टाकणे, ही कामेही शिष्यांकडून ते करवून घेत. एरंडाचे रानाला ‘आंबेवन’ म्हण, ‘गादव भुंकिन्नले तो पंचमवेद’ असे संबोध, झाडावरील आंबट आंब्यांना ‘संसारमोचकू’ असे मिस्किलविशेषण लाव, जोग्याचा वेष घेऊन ‘मन भुली’ हे गाणेच गा, गुराख्याची नक्कलच कर, सारंगपंडिताची मुलगी धानाइसा हिला साळैची गोष्टच सांग, कुणाचा ग्रह फेड, ज्वर उतर, ह्याला स्थित्यानंद दे, त्याला विद्यानंद दे, जागोजाग पूजा–मंगलार्तीचा स्वीकार कर, अशी ही भ्रमंती चालू असे. आकाशात शुक्राची चांदणी उगवली, बाइसाने ‘हे नक्षत्र कोणते ?’ म्हणून विचारताच शुक्रकथाच सांग, मंदिरातील ‘पेखणे’ पहा, त्यात चुकी काढ, वेरूळच्या लेण्यातील ‘छायापुरुखु’ची माहितीच दे, ‘त्रिंबकेश्वर–विज्ञानेश्वर’ यांना वीडा दे, परपंथीय महात्म्याचा मान ठेव, अनंतव्रत–उपवास यातील मूळ धर्मतत्त्वच विशद कर, उंबराचे फळ सहज हातीघेऊन ‘ब्रह्मगोळकु ऐसा असे’ असा प्रत्यक्ष दृष्टान्तपाठ दे, शिमगा आला शिमगा कर, दिवाळी

आली दिवाळी कर–असे हे भ्रमण होत होते. लहान–मोठा, राव–रंक, शत्रु–मित्र, भुते–खेते, पशु–पक्षी जे कोणी येईल, त्याशी क्रीडा करीत हा स्वैरविहार घडत होता.

शिष्यांसमवेत श्रीचक्रधरांनी केलेली ही 'पद्यात्रा' काव्य–शास्त्र–विनोदाने एक आनंदयात्राच जणू झाली होती. हे भ्रमणमंडळ महाराष्ट्र-भूमंडळीच वावरत होते. प्रतिष्ठान, एळापूर (वेरूळ), श्रीनगर (सिन्नर), त्र्यंबक, पुणतांबे, भडगांव, ऋद्धिपूर, हिरवळी (जालना), डोंबेग्राम (बीड जिल्हा) खडकुली असे 'ग्रामात् ग्राम' हे अटनविशेष चालू होते. शिष्य मिळत होते; काही अनुसरत होते, तर काही, काही काल राहून परत जात होते. श्रीचक्रधरांनी कोणाला 'या' म्हटले नाही, कोणाला 'जा' म्हटले नाही, अडविले नाही, मत्सरी महंतांनी विषप्रयोग केला, त्याचा दोष मानला नाही, स्वानंदसाम्राज्यात गुंग होऊन श्रीचक्रधरांचा स्वच्छंदविहार चालू होता. त्यांना देवगिरीच्या राज्यक्रांतीचे भान होते; पण तिच्याशी कसलेच कर्तव्य नव्हते. त्यांच्या शिष्याशिष्यांत थोडा हेवामत्सर होता, स्पर्धा होती; पण श्रीचक्रधरांनी त्याला कसलेच महत्त्व दिले नाही, उलट 'साधे' सारख्या (म्हणजे एल्हाइसेसारख्या) भोळ्या-भाबड्या शिष्येने केलेल्या वेड्यावाकुड्या पूजेने–त्यामागील तिच्या अपूर्व भावभक्तीने—त्यांना अनुपम आनंदच होई. कोणाचा काय अधिकार आहे, हे जाणून त्यांना ती ती कामे ते सांगत; बाइसाकडे मठाची–गुंफेची–सारी व्यवस्था पाहण्याचे काम असे; श्रीचक्रधरांची ही पहिली शिष्या. सहज जाता जाता ते भक्ताची कसोटी पाहत, त्यांची कर्मे क्षाळून त्यांना थोडेफार 'अधिकारी' बनवीत; त्यांची मनोगते आधीच ओळखून त्यांना सुख देत; प्रसंगविशेषी निर्वचन करीत.

/संन्यासदीक्षा घेऊन, दीनोद्धरणाच्या हेतूने लोकात आलेल्या श्रीचक्रधरांचा प्रारंभीचा काळ म्हणजे 'पूर्वार्ध–काळ' होय.) या काळात महाराष्ट्रमंडळांत एक 'शिष्यांची मांदी' त्यांना लाभलेली दिसते. गावीचे काही विद्यावंत महाजन आणि सामान्यजन यांना त्यांच्या वेधशक्तीचा अनुभव आलेला दिसतो; त्यामुळे श्रीचक्रधरांचे अनुयायी वाढत चाललेले दिसतात. यात काहींनी आपली पूर्वीची धर्मतत्त्वे किंवा पंथ बदललेले दिसतात. कोठे जुन्या गुरूंची प्रतिष्ठा ढासळलेलीही आढळते. दादोस यानी स्वतः श्रीचक्रधरांचे शिष्यत्व पत्करले, तरी आपली

१५९९३

शिष्यमालिका–नागदेवाचार्य व त्यांची भावंडे–यांना ते श्रीचक्रधरांची पूजा करण्याची मनाई करू लागले. तत्कालीन हटयोगी किमयागार यांचाही श्रीचक्रधरांशी संबंध आलेला दिसतो. श्रीचक्रधर यांनी कोणालाही विरोध केल्याचे, किंवा कोणाशी मुद्दाम स्वतः होऊन वाग्युद्ध केल्याचे आढळून येत नाही. तरीपण श्रीचक्रधरांचा हा जो संचार गोदातटाकी झाला, त्याने त्या त्या क्षेत्री एक नवा धर्मप्रवाह सुरू केला. त्याला होणारा विरोधही त्यांच्यावर झालेल्या विषप्रयोगातून उघडकीस आला. 'पूर्वार्ध' मधील 'लीळां'तून हा जो विरोध दिसून येतो, तो धर्माच्या किंवा तत्त्वज्ञानाच्या तात्त्विक भूमिकेतून निर्माण झालेला दिसत नाही. तो वैयक्तिक असूयेतून जन्माला आल्याचे जाणवते. या विरोधाचे सातत्य किंवा संघटित रूप पाहावयास मिळत नाही. 'पूर्वार्धा'मध्ये श्रीचक्रधरांचा अद्याप वेगळा विशिष्ट असा पंथ झालेला, आणि त्या पंथाचे एक स्वतंत्र तत्त्वज्ञान सिद्ध झालेले प्रत्ययास येत नाही./ हे मात्र प्रभावाने जाणवते की, श्रीचक्रधर क्षेत्रोक्षेत्री बहुजनांच्या आदराचा, भक्तीचा विषय होत आहेत, आणि त्यांना श्रीचक्रधरांचा वेध लागत आहे; श्रीचक्रधरांच्या वेधशक्तीपुढे तत्कालीन अन्यपंथीय मठाधिपती योगी-जोगी हे निष्प्रभ ठरत आहेत. महानुभाव पंथ सिद्ध झाला नसला तरी श्रीचक्रधरांचे विभूतिमत्त्व सिद्ध झाले होते. 'ऋद्धिपूर' आणि 'प्रतिष्ठान' या दोन केंद्रांच्या ठिकाणीच केवळ ही विभूती स्थिरपणे कार्य करीत होती, असे नाही; तर या दोन केंद्रांतील महाराष्ट्रभूमीत पदसंचार करून, महाराष्ट्रातील धर्मभावनेला वा धर्मबुद्धीला एक वेगळे अधिष्ठान देऊ पहात होती. 'पूर्वार्धा'च्या अगदी अखेरीस नागदेवाचार्यांची जी हकिकत आली आहे, ती या दृष्टीने फार महत्त्वाची आहे.

आपले गुरू दादोस आणि ऋद्धिपुरचे गोविंदप्रभू यांच्या ठायी नागदेवांना मुळात सारखीच प्रतीती येत होती; पण हे माहीत असूनही त्यावर न रागावता श्रीचक्रधरांनी शांतपणे, '**श्रीप्रभु तें निर्मुक्तवस्तु : श्रीप्रभु तें निर्गुणब्रह्म : श्रीप्रभु ते आत्माराम**' असे नागदेवांना सांगून श्रीप्रभू हे 'जीवमोकलिते' आहेत हे विवरून दाखविले, आणि यावर एक रात्र नागदेवांना विचार करू दिला; पुन्हा दुसरे दिवशी सकाळी बोलावून, 'काही आवांकीया (विचार) मीळत असे?' असा त्यांना प्रश्न केला आणि आदल्या'

रात्री केलेले 'ईश्वर विभागु निरूपण' पुन्हा केले. 'तेणे भटोबासि बोधु जाला.' हे पंथपरिवर्तन असे शांतपणे पण निश्चयेकरून चालले होते. 'पूर्वार्धा'मध्ये या परिवर्तनाची बैठक पक्की झाली, तिचे बळ गव्हागव्हाने वाढत चालले; एक अनुयायीमंडळ स्थिरावले; शिष्याच्या शोधात हिंडणाऱ्या गुरूला आपला शिष्य सापडला. नामदेवाचार्य यांनी केलेल्या श्रीचक्रधरांच्या अनुसरणाने एक नवे पर्व सुरू झाले आणि श्रीचक्रधरांच्या आयुष्याच्या उत्तरार्धाला खऱ्या अर्थाने येथून पुढे प्रारंभ झाला.

## उत्तरार्ध

श्रीचक्रधरांचा उत्तरार्ध-काळ हा अवघ्या चार वर्षांचा आहे. ह्या कालावधीत खडकाळी, पैठण, छिन्नपापी, ढोरेश्वर, डोमेग्राम, भिंगार, प्रवरासंगम, नेऊरगाव, बेलापूर अशा गावी (दक्षिण गोदातटाकी) त्यांची भ्रमंती झाली, येरझारा झाल्या. यावेळी ही भ्रमंती पुष्कळच मर्यादित झालेली दिसते. महिना-दोन महिने, तर कधी सबंध उन्हाळा-हिवाळा-पावसाळाभर त्यांचे एकेका क्षेत्री अवस्थान होत होते. त्यांचे ईश्वरावतारित्व सिद्ध झाले होते, शिष्यमंडळात स्थिरता आली होती; आणि आता श्रीचक्रधरांना निरूपणाची प्रवृत्ती अनावर होत होती, इतकी की, अशी प्रवृत्ती झाली आणि भटोबास कोठे बाहेर गेले असले तर ते बेचैन होत; मठात आतबाहेर येरझारा घालीत, उंचमढी जाऊन एक पाय 'उंबरेयावरि एक उंबरेयातु' असे ते भटोबासाची वाट पाहत उभे राहत; 'वानराः अझुइं काइ पां नैए:,' असे सारखे पुटपुटत, आणि पुन्हा त्यांच्या येरझारा, थांबणे, वाट पाहणे सुरू होई. श्रीरामकृष्ण परमहंसांचे विवेकानंदाच्या ठायी असेच होत असे. '**वाइ : एथ प्रवृत्ति जाली : तरि : स्तंभा एकातें नीमीत्य करूनि नीरूपीजैल :**' असे उद्गार त्यांनी बाईसापुढे काढले आहेत. 'लीळाचरित्रा'चा 'उत्तरार्ध' अशा निरूपणाने भरून गेलेला आहे. अर्जुन-गीता किंवा उद्धव-गीता जशी, तशी 'उत्तरार्ध' ही 'भटोबास-गीता' होय—म्हणजे श्रीचक्रधरांनी भटोबासांना सांगितलेल्या धर्मसूत्रांचा संग्रह होय. (सबंधच्या सबंध 'लीळा-चरित्रा'ला महानुभावीयांचा 'श्रुति'-ग्रंथ म्हणण्यापेक्षा 'उत्तरार्धा'ला श्रुतिग्रंथ म्हणणे अधिक सयुक्तिक होईल. 'एकांक' आणि 'पूर्वार्ध' यांचे स्वरूप केवळ आठवणी या अर्थाने 'स्मृती'चे आहे.)

'उत्तरार्धा'त श्रीचक्रधरांची 'नित्यदिनी–लीळा', पूजा विहरणादी किंवा चमत्कार–स्थित्यानंददानादी साऱ्या 'पूर्वार्धा'तील गोष्टी यथाक्रम चालू आहेत; पण त्यांना आता महत्त्व किंवा स्वतंत्र असे वैशिष्ट्य उरलेले नाही. त्यांचा सारा भर धर्मनिरूपणावर आहे, हेच प्रकर्षाने जाणवते. हे धर्मनिरूपण कधी अचानक प्रवृत्ती झाली म्हणून आपण होऊन केलेले असते. उदा०–"**बाई, देवो कैसा**" असा स्वतःच प्रश्न करून "**देवो पाखाणाचा नव्हे : देवो काष्टाचा नव्हे : देवो मातीएचा चीत्रींचा नव्हे : देवो पटींचा नव्हे : वासना भेदें देवो धातुचा नव्हे :**" असे ते अनावर बोलत सुटतात व पुढे आणखी स्पष्टीकरण करतात.

तर कधी एखाद्या प्रसंगातून धर्मनिरूपण झटकन् उद्‌भवलेले असते. महदाइसा मठ सारवीत होती, तो श्रीचक्रधरांच्या हातची सुपारी गडगडत गेली, ती महदाइसेने तेथूनच श्रीचक्रधरांच्याकडे फेकली आणि मग तिच्या ध्यानात आले की 'आपण उठून ती त्यांच्या हाती द्यावयास हवी होती.' या विचाराने एकदम तिला ग्रासले. ती दुःख करू लागली. त्यावर '**सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ : केलिए कीएसि अनुताप पुरश्चरण.**'

कधी कधी विशेष काही घडले नसताना, काही थोडा आधार लाभून श्रीचक्रधरांना निरूपणाची प्रवृत्ती झाल्याचीही उदाहरणे 'उत्तरार्धा'मध्ये मिळतात. मातीकाम चालू होते; लखुबाइसा मातीचे गोळे करून देत होती व भटोबास ते वाहून नेत होते. त्यांतला एक पिंड घेऊन सर्वज्ञ म्हणाले, "**वानरेया, हा पेंडु वीकारें घेतला गा : ऐसेही एकु सूक्ष्म वीकार असेत गा:...जे आपुले आपलेया उपलक्षेति ना :**"

**सबंध 'उत्तरार्ध'च जणू एक 'बृहद्-दृष्टान्त-पाठ' वाटतो.** केसोबासांनी संकलित केलेल्या 'दृष्टान्तपाठात' एकशे चौदाच दृष्टान्त आलेले आहेत; त्यांतील सुमारे ३०–३५ 'दृष्टान्तां'चा 'लीळासंबंध' सांपडतो आणि त्यांतील पंचवीसपर्यंत लीळा एकट्या 'उत्तरार्धा'तील आहेत, पण ज्यांचे स्वरूप दृष्टान्तासारखे आहे, अशा कितीतरी आणखी लीळा आपणांस 'उत्तरार्धा'मध्ये मिळू शकतात; त्यामध्ये येणारी सूत्रे सूत्रपाटात घेतली असतील किंवा नसतील. श्रीचक्रधर जे धर्मनिरूपण करीत गेले, ते कोणत्याही एखाद्या जुन्या धर्मग्रंथाच्या आधारे, भाष्यरूपाने नव्हे; तर त्यांच्या चालत्या धर्मपीठात किंवा जंगम विद्यापीठात

प्रसंगपरत्वे, काही निमित्ताने जो शास्त्रविनोद त्यांनी केला, त्यांतूनच त्यांची तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांची सूत्रे उत्स्फूर्तपणे प्रकट झाली. त्यामुळे त्यामागे जिवंतपणा, उत्स्फूर्तता आणि प्रत्ययकारिता आहे: ते रूढ स्वरूपाचे तांत्रिक किंवा सांकेतिक नाही. दैनंदिन अनुभवांतून ते स्फुरलेले असल्यामुळे ते प्रत्यक्षपणे (directly) मनावर ठसते. याचे वानगीदाखल एक उदाहरण पुढीलप्रमाणे: 'श्रीचक्रधर भटोबासास निरूपण करीत होते. त्याच वेळी बाईसाने भटोबासास लोणारतीर्थाहून घागर भरून पाणी आणावयास सांगितले. भटोबास गेले खरे, पण 'हेच काम आणखी थोड्या वेळाने, (निरूपण संपल्यावर) सांगितले असते तर काय बिघडले असते?' असे 'पोटी' म्हणत गेले. त्यांनी पाणी भरून घेतले व ते परत निघाले; त्यांना पश्चात्ताप झाला. 'हे पाणी बाईसाने स्वतःच्या आंघोळीसाठी काही आणावयास लावले नाही. गोसावियांच्यासाठीच ते मी आणीत आहे,' हे त्यांच्या मनात आले. ह्या विचाराने ते परत फिरले आणि श्रीचक्रधरांच्या पाया पडले. तेव्हा '**सर्वज्ञें म्हणीतलें : वानरेया ! तुम्ही जें होऊनि गेलेति तें नव्हे : आलेति तें होए:**' आणि मग त्यांनी भटोबासास 'दासीचा दृष्टान्त' सांगितला.

उत्तरार्धामध्ये शिष्याशिष्यांतील असूया–स्पर्धा प्रारंभी थोडी दिसून येते; पण पुढे ती पार संपली आहे. शिष्य आपापसांत थट्टाविनोद करताना दिसून येतात. त्यांचे सुखद सहजीवन चालू होते, 'साधे' जेवत होती. भटोबास भाजीतील वांग्याचा देठ हाती घेऊन "**एल्हो एल्हो:' कैसें ऊंदराचे पूंस : पूरण ऐसें : सीजलें :**" असे म्हणतात. मग वांग्याची फोड हातात घेऊन '**एल्हो, एल्हो : कैसी उंदराची डोई : पूरण ऐसी सीजली असे :**' असे पुन्हा साधेला चिडवितात. भटोबासावर श्रीचक्रधरांचे फारफार प्रेम होते. श्रीचक्रधरांना पूजा करून घेण्याची आणि निरूपणाची प्रवृत्ती 'उत्तरार्धा'मध्ये वारंवार आणि वेळी–अवेळी होत असल्याचेही दिसते. अशा या भ्रमंतीत, आपल्या एकनिष्ठ शिष्यांच्या संगतीत, निर्याण करण्यापूर्वी, निमित्तानिमित्ताने श्रीचक्रधर, श्वासोच्छ्वास ज्या स्वाभाविकपणे होतात, त्या स्वाभाविकतेने जे उद्गारले त्याचा महानुभावीय तत्त्वप्रबंध झाला. '**उत्तरार्धा'तील श्रीचक्रधरांच्या प्रत्यक्ष 'लीळा (=कृती, आचार) ह्याच वास्तव दृष्टान्त होत.**

पण याशिवायही कितीतरी अवांतर कथा, आख्यायिका, संसारचित्रे आणि

अनुभव श्रीचक्रधरांनी कथन केले आहेत, आणि आचारधर्म व तत्त्वज्ञान विशद केलीं आहेत. अशा लीळांचे स्वतंत्र संकलन करणे मोठे उपयुक्त ठरेल. ज्ञानांकुश नावाच्या महात्म्याची कथा, (उ०–४८३), लवणरावोचे आख्यान (उ०–४१३), नागदेव 'सीवेचा गुंडा' (उ०–४८९), शूद्रसुखानुवाद–मोळिकारसुखानुवाद (उ०–४०४, ४०५), चक्रवाकां अनुवादे गुरुसीख्या अज्ञान, (उ०–४०९) लाडू आणि लाडवाची स्त्री–कथा (उ०–४११) यांसारख्या लीळा उघड उघड दृष्टान्तरूप आहेत.

'उत्तरार्धा'च्या शेवटी शेवटी म्हणजे 'निर्याणप्रवृत्ती' स्वीकारण्याचा काल जसजसा जवळ येत चालला, तसतशी श्रीचक्रधरांची ही निरूपणप्रवृत्ती फारच वाढलेली दिसते; तिला विलक्षण वेग येतो. (ज्ञानेश्वरीचा अठरावा अध्याय असाच विलक्षण वेगळा, एका ओघात, आणि विस्ताराने लिहिलेला दिसतो.) लीळांमागून लीळा हे निरूपणच नोंदविणाऱ्या आढळतात. **'हें : सकळ सीद्धांताचा मतितार्थ जाणे :'**, **'एथ एकी ब्रह्मविद्या असे : ते पुसिजे : चर्चिजे :'** असे म्हणून श्रीचक्रधर शास्त्रसिद्धान्तानुवाद करीत जातात. **'यांतें तुम्ही आठवा : तेहवळि हे तुम्हांपासि असे :'** असे आपल्या शिष्यांना आश्वासन देऊन आपले 'धर्मवार्ताप्रसंगें सर्वत्र अवस्थान' राहील हेही श्रीचक्रधरांनी स्पष्ट केले आहे. त्यांची मूर्ती निघून गेली तरी शास्त्ररूपाने ते सर्वत्र राहणार होते; 'आम्हीं आपुलेया गोसावीयांसि शास्त्रें वोळखौनि'; अशी भावना भटोबासांनी श्रीचक्रधरांपुढे व्यक्त केली, आणि त्यावर **'शास्त्र भक्ताचां ठाइं असें कीं : भक्त आपणपें देवो न म्हणवी कीं गा :'** या वचनाने तिची सत्यता पटवून दिली.

आपले शास्त्र सुरक्षितपणे ठेवण्यास श्रीचक्रधरांनी नागदेवाचार्य ह्या शिष्याची निवड केली; आणि त्याला 'आपणया समान' केला, 'सीवेचा गुंडा' हा दृष्टान्त देऊन नागदेवाचार्यांचा हा विशेष अधिकार श्रीचक्रधरांनी इतर शिष्यांच्या मनावर ठसविला आहे. **'कव्हणी एकु सीवें गुंडा घाली : तेयासि सेणमाती माखिली असे : तयावरि सुनीं डुकरें मुतीति : तयावरि इळे कुऱ्हाडि लाविति : वरि वाहाणवनीं उभे ठाकती : पाए पुसीती : कव्हणीं तथा एकादा एकु : तेयासि तेल सेंदुर लावी : वरि पालापाणी घाली : मग तेयाचेया आंगा : देवतपण ए : मग तो जगाचे चीतिले**

**मनोर्थ पूरवी : तथा लोकांचे चीतिले मनोर्थ पूरवी : मग गाडा घोडेनेसीं तेथ जात्रा ए : तैसा हा एथचिया जवळिका आन जाला असे :**' नागदेव हा आता पहिला 'पुरकर नागदेवो' राहिला नसून तो 'आचार्य' झाला आहे. श्रीचक्रधरांनी भटोबासांना सांगितलेच की, 'आतां एथौनि तुम्हांसि आचार्यां होआवें लागैल,' आणि त्यांना 'पुढारू' दिला. नागदेवाचार्यांवर सर्व शिष्यांनी विशिष्ट बुद्धी सांडून परमप्रीती करावी, आणि त्यांना 'पुसावे', असा आदेशही त्यांनी शिष्यांना दिला आहे. भटोबास श्रीचक्रधरांना अनुसरिले होते. 'अनुसरण' म्हणजे 'एथिचेया होइजे : एथौनि म्हणीतलें तें कीजे', भटोबासांना 'प्राणियांतें अनिष्टापासौनि काढुनि इष्टी लावण्याचा' अधिकार देऊन मगच श्रीचक्रधर 'उत्तरापंथे गमन' करते झाले, आणि इकडे 'बापूडें वानरें आतां एणेंवीण एकलें' झाले व 'असंन्निधानी सर्वज्ञे म्हणीतले' ते करीत राहिले. 'षड्विध दुख जो करिल तेयासि गोसावी भेटि देतील :' या वचनावर विसंबून काळ कंठू लागले. लीळाचरित्राचे हे शेवटचे वाक्य आहे; त्यातच 'लीळाचरित्रा'च्या रचनेमागील प्रेरणा आणि त्याचे प्रयोजन अगदी स्पष्ट होते.

(लीळाचरित्रा'च्या 'एकांक', 'पूर्वार्ध' आणि 'उत्तरार्ध' या तीन खंडांतील श्रीचक्रधरांच्या आयुष्यक्रमाचा, आचारधर्माचा आणि जीवनहेतूचा मागोवा येथवर घेण्यात आला.) 'एकांका'च्या शेवटी अवतारातील जी मानवी छटा होती, तिचा लोप होऊन ईश्वरावतारित्वाचा श्रीचक्रधरांनी पूर्णतः स्वीकार केला, आणि जीवोद्धरणाच्या कार्यास प्रारंभ केला. 'पूर्वार्धा'च्या अखेरीस आपले शास्त्र पूर्णांशाने ग्रहण करण्यास योग्य अशा अधिकारी शिष्याचा शोध श्रीचक्रधरांनी केला आणि 'उत्तरार्धा'मध्ये ह्या शिष्याच्या ठायी–म्हणजे नागदेवाचार्यांच्या ठायी–आपली ब्रह्मविद्या ठेऊन श्रीचक्रधरांनी निर्याण केले. 'सन्निधानी जीवांचे उद्धरण करून असन्निधानी त्यांच्या उद्धरणाची व्यवस्था करणे', हे श्रीचक्रधर या अवताराचे कार्य होते. 'लीळाचरित्रा'च्या या त्रिखंडात्मक विभागणीतून या अवताराच्या तीन अवस्था अगदी रेखीवपणे स्पष्ट झाल्या आहेत.('लीळाचरित्र' हा महानुभावीयांचा मूळ आधारग्रंथ आहे; त्यांच्या तत्त्वज्ञानात्मक–वाङ्मयाची अक्षय्य खाण आहे. साधनग्रंथ म्हणून त्याचे मोल अपरिमित आहे.) या लीळांच्या पुष्पराशीतून महानुभावीय तत्त्वज्ञानातील

'आचारमालिका' 'विचारमालिका'दी गुंफण्यासाठी कितीतरी पुष्पे निवडण्यात आली, हे खरे; पण लीळाचरित्राचे स्वरूप तेवढ्यापुरते मर्यादित नाही, हे स्पष्ट आहे. लीळाचरित्र ही श्रीचक्रधरांची, म्हणजे श्रीपरमेश्वराची स्मृतिपुष्पांनी केलेली पूजा आहे. ही पूजापुष्पे सदैव टवटवीत राहणारी आहेत; निर्माल्य होण्याचे त्यांना भय नाही.

प्रकरण तिसरे

# लीळाचरित्राचे वाङ्मयीन स्वरूप

**लेखक म्हाइंभटाची प्रकृती**

(The tone of the writer)

- गुरुस्मरणात लय पावलेला एकनिष्ठ भक्त—
- स्वतःचे क्षेपण नाही—पंथीय अभिनिवेश नाही—साधेपणा, सहजता, कळकळ यांत सौंदर्य—ली० च० एक सहज घडलेली वाङ्मयकृती.
- **ली० च० ची रचना**—बिंदूबिंदूंनी तयार होणाऱ्या रंगावलीप्रमाणे—

**ली० च० मधील विविध वाङ्मयरूपे—**

- (१) वृत्तलेखन (२) प्रसंग-चित्रण. (३) कथाकथन. (४) तत्त्वनिरूपण.
- म्हाइंभटाची वर्णनशैली.
- संवादपद्धती.

# लीळाचरित्राचे वाङ्मयीन स्वरूप

## १. 'लेखक' म्हाइंभटाची प्रकृती

'Sincerity is the finest gift in literature and the most uncommon.'

—Sir Edmond Gosse

'Sincerity is the only standard.'

एखादा भक्त आपल्या देवतेची षोडशोपचारे पूजा करीत असावा, त्या पूजाविधीतच तो रंगून जावा, त्याला दुसऱ्या कशाचेही भान नसावे; पूजा हेच त्याचे साधन आणि पूजा हेच त्याचे साध्य असावे, पूजेच्याच आनंदात त्याने स्वतःस हरवून बसावे, तसे म्हाइंभटाचे लीळाचरित्राचे ग्रथन करताना झाले असावे. लीळास्मरण हेच साध्य आणि साधन! त्याला याविना अन्य काही साधावयाचे नव्हते की सिद्धही करावयाचे नव्हते. श्रीचक्रधरांचे माहात्म्य सिद्ध करण्याचा तर प्रश्नच नव्हता, कारण म्हाइंभटाच्या दृष्टीने ही गोष्ट मुळी सिद्धच होती. श्रीचक्रधर हे श्रीकृष्णावतार आहेत, यासंबंधी म्हाइंभटाच्या मनात तिळमात्रही शंका नव्हती.

तसेच आपल्या पंथाचा पुरस्कार किंवा प्रचार करण्याचा हेतूही म्हाइंभटाच्या ठिकाणी नव्हता. कारण 'महानुभाव पंथ' अशी काही वेगळी जाणीव त्याकाळी निर्माण झालीच नव्हती. लोक श्रीचक्रधरांना अनुसरत होते. प्रत्यक्ष श्रीचक्रधरांची मूर्ती आणि वाणी यांवेगळे असे दैवत किंवा तत्त्वज्ञान निर्माण झाले नव्हते. जे काही होते किंवा हवे होते, ते श्रीचक्रधरांचे संनिधान

आणि असन्निधानी स्मरण! त्या सन्निधानसौख्यात अथवा असन्निधानीच्या स्मरणानंदात जन्म क्षेपणे, एवढाच श्रीचक्रधरशिष्यांचा जीवितहेतू होता. यामुळे लीळाचरित्रात कोठेही पंथीय अभिनिवेश किंवा स्वतःच्या दैवताच्या श्रेष्ठत्वाचा आग्रह धरलेला आढळत नाही. आत्मगौरवाचा, परनिंदेचा, स्वसमर्थनाचा किंवा प्रचाराचा कसलाच वास या निर्मितीला लागलेला नाही. (आत्मानंदात लीन झालेल्या एका भक्ताची ही कृती निर्मळ, अंतर्बाह्य शुद्ध आहे.) म्हाइंभटाच्या व्यक्तिमत्त्वाची वेगळी अशी पुसट भावच्छटाही या लीळांवर पडलेली नाही. म्हाइंभट वाचकांशी कसलीच जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत नाही. त्याच्या दृष्टीने लीळाचरित्राचा असा 'वेगळा कोणी वाचक'च नाही; जणू वाचक म्हणून कोणी 'स्वतःबाहेर'चा असू शकतो याचे त्याला भानही नाही. तो जवळीक साधतो ती श्रीचक्रधरांच्या लीळांच्या सत्यत्वाशी आणि त्यांतून उपभोगितो 'स्वान्तःसुख'! जे आहे ते, आहे तसे, आहे त्या स्वरूपात आणि तेवढेच—तितकेच टिपणे; जे टिपणे ते श्रद्धेने टिपणे; टिपलेले दिसावे पण टिपणाराचे हात दिसू नयेत, अशा निर्ममतेने आणि सहजतेने टिपणे—असे सारे येथे घडले आहे. 'पाहाणाऱ्याने चित्रविषय पाहावा, चित्रसौंदर्यात रमावे, चित्रकार कोण? याची चौकशी त्याला हवीच कशाला?' असे अजिंठ्याची चित्रसृष्टी जसे सांगते, तसेच येथे आहे. आणि जे चित्रिले आहे ते अशा प्रमावीपणे की श्रीचक्रधरांच्या जीवनाचे सारे तपशील प्रत्यक्ष स्पंदन पावत आहेत, त्यांच्या जीवनाचे ठोके ऐकू येत आहेत, असा प्रत्यय पदोपदी यावा!

लीळाचरित्रलेखनाचे सौंदर्य त्याच्या साधेपणात आहे. बायबलसंबंधी असे म्हणतात की, Bible is a simple story dealing with high subject..the subject does not lose anything because of simple language" लीळाचरित्रासंबंधी आपणांस असे म्हणता येईल. वस्तुतः श्रीचक्रधरांचे महानुभावित्व, त्यांचे आचारधर्म आणि तत्त्वज्ञान अगदी साध्या शब्दात मांडणे ही गोष्ट अवघड आहे; पण ही अवघड गोष्ट लीळाचरित्रामध्ये इतक्या सहजपणे साध्य झालेली आपणांस पाहावयास मिळते, की त्याचे आश्चर्य वाटते. पांढऱ्या स्वच्छ, निर्मळ काचेतून सूर्यप्रकाश जसा आपले तेज यत्किंचितही न गमावता सहजतेने, अविकृतपणे आपणापर्यंत

येऊन पोहोचतो, तसेच कसलाही अडथळा न होता, श्रीचक्रधरांचे महानुभावित्व आपल्या सर्व रंगच्छटांनिशी या शब्दांतून, जसेच्या तसे, आपल्या मनःसृष्टीत प्रवेश करते.

लीळाचरित्र ही सहजगत्या घडलेली वाङ्मयकृती आहे. तत्कालीन मराठी कवींच्याप्रमाणे म्हाइंभटांना आपण काही 'साहित्यकृती' निर्माण करीत आहो अशी जाणीव नाही. लेखनावर तो संस्कार करतो ते कलादृष्ट्या परिष्करणाचे नसून 'प्रत्यक्ष' (Fact) जे आहे, ते बिनचूक नोंदले जावे एवढ्यासाठी, आणि एवढ्यापुरतेच! 'श्रीचक्रधर' हाच एकमेव विषय असल्यामुळे लीळाचरित्रात मूलतःच एकसंधता आहे, आणि लीळांची मांडणी कालक्रमानुसार केल्याने रचनेला एक सरळ प्रवाहित्व लाभले आहे. काही भावपूर्ण प्रसंगांतून व्यक्तिदर्शन आणि कधी व्यक्तिमत्त्वातून प्रसंगनिर्मिती अशा तऱ्हेने बरेचसे चरित्र-चित्रण होत गेल्याने या 'लीळाचरित्रा'ला काही ठिकाणी 'ललित' गुणही लाभलेले दिसतात. मराठीतला पहिला, विविधभावात्मक असा 'ललित गद्यावतार' लीळाचरित्रातूनच पाहावयास सापडतो!

## २. *लीळा आणि लीळांची विविध वाङ्मयीन रूपे*

लीळाचरित्राची बांधणी आठवणींनी झाली आहे. बिंदू–बिंदूंनी किंवा ठिपक्या–ठिपक्यांनी जशी एखादी रंगावली तयार होत जावी व अखेर पुरी व्हावी, तसे येथे कालक्रमानुसार येणाऱ्या आठवणींनी श्रीचक्रधरांचे जीवनचित्र पुरे झाले आहे. यांतील प्रत्येक बिंदू सजीव आहे, स्वतःपुरता पूर्ण आहे, सुटेपणाने तो आस्वाद्य आहे आणि पूर्वापरसंदर्भदृष्ट्या महत्त्वाचा आहे. चरित्रविषयभूत व्यक्तीच्या महानुभवित्वाच्या संदर्भात सामान्य हकिकतींनाही वेगळीच गोडी लाभते, कारण हा तपशील अगदी ताजा (fresh) आणि जिव्हाळ्याचा (intimate) असतो; त्यात एक तऱ्हेची जिवंतपणाची चमक (living glimpse) असते. यामुळे लीळाचरित्र कोठेही उघडून पाहिले, तरी तेथे एखादे स्वयंपूर्ण असे 'भावचित्र' नजरेस पडते[1] यातील

---

१ 'केवळ वृत्तांतात्मक नोंदी' यांचा अपवाद येथे स्वीकारावा. त्यांचा स्वतंत्र विचार पृ. ३४, ३५ वर केला आहे.

एकेक आठवण (लीळा) श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाचा एखादा पैलू आपल्या नजरेस आणून देतो. (Any incident opens a character–) येथे तर एक-दोन नव्हे, तर जवळजवळ हजार भरतील इतक्या आठवणींनी श्रीचक्रधरांचे व्यक्तिमत्त्व प्रकट झाले आहे. सहस्र स्मरणज्योतींच्या रत्नदीपाने श्रीगोसावियांना म्हाइंभटांनी ओवाळले आहे; या स्मृतिज्योती इवल्या-इवल्याशा आहेत; (प्रदीर्घ प्रसंग संख्येने कमीच) पण त्यांतून श्रीचक्रधरांच्या आत्मज्योतीचा विलास अखंडपणे होत असलेला दिसून येतो.

लीळाचरित्रातील लीळांचे वाङ्मयीन रूपांच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे वर्गीकरण करणे शक्य आहे.

(क) वृत्तलेखनात्मक.
(ख) प्रसंगचित्रणात्मक.
(ग) कथाकथनात्मक.
(घ) तत्त्वनिरूपणात्मक.

अभ्यासाच्या दृष्टीने याचा पृथक्पणे विचार करणे सोयीचे होईल.

प्रथम 'वृत्तलेखनात्मक' लीळा पाहू.

## (क) *वृत्तलेखन–विविध प्रकार*—

लीळाचरित्रातील 'लीळा' म्हणजे घडलेल्या छोट्या छोट्या घटनांच्या हकिकती होत. त्यांचे वाङ्मयीन स्वरूप मूलतः 'वृत्तकथना'चे (Reportage चे) आहे. पण त्यात वृत्तकथनाचे एखादे विशिष्ट असे तंत्र जाणीवपूर्वक स्वीकारल्याचे दिसून येत नाही. 'सरळ निवेदन' (Direct narration) हेच तंत्र. फक्त पथ्ये ही की कसलाही तपशील वगळायचा नाही, कालक्रम सोडायचा नाही; कल्पनेने काही नवे घालायचे नाही किंवा जे आहे ते फुगवून–खुलवून सांगायचे नाही; यामुळे लीळाचरित्रातील वृत्तकथन त्या त्या प्रसंगानुसार कसे रूप घेते ते पाहाण्यासारखे आहे.

केवळ स्थलकालाची नोंद करणाऱ्या, अक्षरशः 'दोन शब्दां'च्या अशा लीळा लीळाचरित्रात आहेत, आणि कांही लीळा अशा आहेत की, संदर्भ तोडून अलगपणे जर त्यांचे वाचन केले तर त्या वैशिष्ट्यहीन आणि निरर्थकही वाटतात.

मात्र संदर्भ धरून वाचताना, वृत्तकथनाच्या एकंदर अखंड प्रवाहामुळे, त्या आपापल्या ठिकाणी स्वाभाविकपणे आल्याचे दिसून येते; त्या आपल्या मागच्या–पुढच्या लीळांना जोडून देण्याचेही कार्य पुष्कळदा करतात, आणि मग त्यांना समग्र लीळाचरित्रात एक 'अर्थ' प्राप्त होतो. उदाहरणे पाहू.

*१. केवळ स्थलकालाची नोंद :—*

(१) **वामोरिए वस्तिः ॥ २३९ ॥** (उत्तरार्ध)
(२) **बांगडीए मढीं वस्ति ॥ २४५ ॥** ( ,, )
(३) **चांपडगांवि आडसा भेटि ॥ ४५८ ॥** ( ,, )
(४) **गोसावी मढ पींपरीएसि बीजें केलें : मढीं दीसवीसः अवस्थानः ॥ २१४ ॥** ( ,, )
(५) **सर्वज्ञें म्हणीतलेंः भावो तरि पैंधेयाचाः ॥ ४१५ ॥** ( ,, )
(६) **सर्वज्ञें म्हणीतलें : वानरेयाः तुम्हीं सरोळेयासि जा : म्हाइंभटा बोलाउनि घेउनि या : तैसेचि भट सराळेया गेले : ॥ ४८१ ॥** ( ,, )

या लीळांमध्ये श्रीचक्रधरांच्या प्रवासमार्गाची नोंद आहेः कोठे केवळ गावाचे नाव, तर कोठे तेथील वसतीचे नाव, भेटलेल्या व्यक्तीचे नाव, एखाद्याचा विशेष गुण, अथवा त्याला दिलेला निरोप असे काहीतरी असते व तेवढी नोंद होताक्षणीच ती लीळा 'आटोपते'. अशा लीळा 'उत्तरार्धा'त कितीतरी आहेत. (ली० २३०, २३१, २३७, २३८, २४१, २४२, २४३, २४४, २५३, ४२५ ते ४२९, ४६६, ४६८, ४६९, ४७०, ४७३, ४७४, ४७५, ४९२, ४९३, इ०) 'पूर्वार्ध' खं० १, २, ३ मध्ये अशा नोंदीवजा लीळा भरपूर आहेत. 'एकांक'मध्ये मात्र अशा लीळेचे एकही उदाहरण मिळणार नाही.

*२. केवळ वृत्तकथन, (अर्थपूर्ण अनुभव नसलेले)*

उदाहरणार्थ 'उत्तरार्ध ली० ३७१' पाहावी.

*सूर्ये पर्वीं सारंगपंडितीं पोळीसीं भेटिः* ॥ **बीजें केलेयावरि प्राग खांडीचिए पोळीसि भेटि दीधली : जी जी : गोसावी केव्हेळि बीजें केलें : हें आतांचि आले : सारंगपंडितीं म्हणीतलें : जी जीः**

**आवारासि बीजें करावें : तवं मी पवं साधुनि एत असे : मागुतें आले तवं भेटि नव्हेंचि : एक म्हणति : हें संनिधानपरः ॥ ३७१ ॥**

येथे केवळ नोंद नाही, तर वृत्त आहे. पण त्यामुळे श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वातील एखादी विशेष छटा अधिक समजते असे काही नाही. एक हकिकत नोंदविल्याचे श्रेय भक्तिपूर्ण हृदयाला मिळू शकते, एवढेच. ‘उत्तरार्ध’ मध्ये अशा प्रकारच्या लीळांची संख्या अत्यल्प नाही. ली० १६६, १६८, २२२, ३५१, ३६९, ३७४, ४०२, ३९८, ४१५, ४४७, ४६४ इ०...‘पूर्वार्ध’ मध्येही अशा लीळा येतात; ‘एकांक’मध्ये अपवादात्मकच एखाद्दुसरी अशी लीळा आढळते. या साऱ्या लीळा लांबीने अगदी आखूड आहेत. ससंदर्भ वाचल्यास या लीळांना कांहीसा अर्थ लाभू शकतो.

या अशा ‘केवळ वृत्तनोंदी’ आणि ‘केवळ वैशिष्ट्यहीन वृत्तकथन’ करणाऱ्या लीळा वगळल्या तर ज्या लीळा राहातात त्यांना मात्र काही ना काही वाङ्मयीन वैशिष्ट्य लाभलेले आहे. कोठे सुंदर प्रसंगचित्रण असेल, तर कोठे नाट्यपूर्ण संवाद असेल; मनमोकळा हास्यविनोद असेल, तर कोठे गंभीर तत्त्वनिरूपण असेल; कोठे एखाद्या निसर्गघटिकेचे क्षणचित्र असेल, तर कोठे विलक्षण वास्तववादी संसारचित्र असेल; कोठे श्रीचक्रधरांच्या दैवी व्यक्तिमत्त्वाचा पैलू चमकून जात असेल, तर कोठे पराभूत मत्सरी विरोधकांची वृत्ती प्रकटेल...काही ना काही ‘संस्मरणीय’, ‘लक्षणीय’ ‘चित्तवेधक’ असे त्यात असेल; आणि या अशा स्फुट त्रोटक लीळांवर श्रीचक्रधरांच्या विभूतिमत्त्वाचा प्रकाश अखंडपणे आतूनच पडत असल्याने त्या लीलांना एका तऱ्हेने ‘स्वयंप्रकाशित्व’ ही प्राप्त झाल्याचे दिसेल. लीळाचरित्राला जे ललित रूप येऊ लागते ते अशा लीळांच्यामुळे. या अशा लीळाच संख्येने सर्वांत अधिक आहेत. एखादा वैशिष्ट्यपूर्ण अनुभव चित्रित करणाऱ्या या लीळांचे वाङ्मयीन स्वरूप मात्र तत्त्वतः वृत्तकथनाचेच आहे.

### ३. *वृत्तकथन (अर्थपूर्ण अनुभवाची चमक असलेले)*

***मार्गीं साधातें वाहाणा लेववणें ॥:*** **सर्वज्ञें म्हणीतलें : साधे हो : वाहाणा कां फेडिलिया : घेया ना : जी जी : गोसावीयां वरि रज जाइल : सर्वज्ञें म्हणीतल : मार्गीं तैसें कांहीं नाहीं :**

**वाहाणा लेवों एति : ना जी : गोसावीयावरि रज जाहल : मग गोसावी पूढां वीजें केलें : सर्वज्ञें म्हणीतलें : आतां लेया : हो कां जी : मग लेइली : ॥ २०७ ॥** (उत्तरार्ध)

ही एक लहानशी हकिकत आहे; पण तेवढ्यातून परमेश्वर आणि भक्त यांच्यांतील परमादर आणि परम वात्सल्य हे भाव व्यक्त होतात. 'उत्तरार्ध' मध्ये अशा लीलांची संख्या पुष्कळच आहे. उदा०–ली० २०२, १९७, १९० १८७ १८१, १६७, १४९, इ०...'पूर्वार्ध'मध्येही या लीळा बऱ्याच प्रमाणात आढळतात; मात्र 'एकांक'मध्ये तीन-चार अशा मोजक्याच मिळतात.

(ख) *प्रसंगचित्रण–विविध प्रकार*

लीळांच्यामधून मनोहर, दृष्टिवेधक अशी प्रसंगचित्रणेही येतात. आणि तीच त्या लीळांची वेधक वैशिष्ट्ये बनतात. अशा प्रसंगचित्रणांची काही रुपविलसते पाहू—

१. *प्रसंगचित्रण:—(दृष्टिगोचरता)*

**'*आउ नृत्यकरणीं रात्रि करणें ॥* गोसावीयांसि भीतरला वोटेयावरि आसन : मग आउसातें म्हणीतलें : नाएका : तुम्हीं : एथ विवस्त्रां होउनि नृत्य करावें : हें काइजी : जगन्नाथा : ऐसें काइसेन होववैल : जी : सर्वज्ञे म्हणीतलें : तरि हें घागरि घेइल : ना : जी : जगन्नाथा घागरि नको घेवो : मी नृत्य करीन : म्हणौनि : आउसीं म्हणीतलें : जी जी : तरि गोसावी रात्रि करावी : गोसावी नेत्रांवरि श्रीकर धरिलें : आवघेया भक्तां करवि देवविलें : रात्रि करा गा : म्हणीतलें : आणि तीं विवस्त्रें जालीं : नाचों लागलीं : आणि गोसावी श्रीकरीचिया आंगुळिया फांकिति : आणि : अवलोकिति : जी जी : स्वामी जगन्नाथा : रात्रि पातळ जाली : दाट कीजो जी : मागुतें गोसावी रात्रि दाट करिति : मागुतीं पातळ करिति : मागुतें आउसें म्हणति : गोसावी मग पूरें करविलें: ॥ ४३५ ॥** (उत्तरार्ध)

प्रसंग दृष्टिगोचर करणारी अशी हुबेहूब शब्दचित्रे काढण्यात या गद्याचा हातखंडा आहे. काही बिंदू आणि रेखा यांनी हे चित्र रेखाटले जाते, पण तेवढ्यानेच सारा अवकाश भरला जातो; चित्र सजीव आणि गतिमान बनते.

त्यातून व्यक्तीचे मनोभाव अभिव्यञ्जित होतात. आउसाचा लज्जासंकोच आणि त्यावर मात करणारा तिचा भक्तिभाव, म्हणजे या प्रसंगचित्राच्या तळची भावना आहे. अशा विपुल शब्दचित्रांनी लीळाचरित्र चित्तवेधक, नावीन्यपूर्ण, सदैव ताजे-टवटवीत आणि चैतन्यमय झाले आहे.

२. *प्रसंगचित्रण – (श्रवणगोचरता)*

**“ तवं श्रीप्रभु वीजें केलें : ईश्वरीये (=ऐश्वर्य) प्रकाशीलें : म्हणौनि : चाटेयाची मोगरी सुन बडवीती होती ते श्रीकरीं घेउनि गोसावीयायाचीया पुष्ठि वीभागावरि : वूद्‌वुद् करीत्ति : तिन घाये दीधले : आणि : बाइसें बोबाइली : वडिलें बाबेनि धाकुटा वावा मारिला :... सर्वज्ञें म्हणीतलें : श्रीकरू दुखविती जी : पुरों दीजो जी :...आणि : श्रीप्रभु मोगरी सांडीली : मेला जाए म्हणे : म्हणौनि हास्य केलें : रामदेवमुनि : येया आतां माझा होए : मारूं दीधले म्हणे : मग भैरवा वीजें केलें :’**

हे शब्दचित्र म्हणजे खरोखरी एक सुंदर ‘**ध्वनिचित्र**’ म्हणजे ‘ध्वनींचे चित्र’ आहे. येथे कानाला डोळे फुटू लागतात आणि त्यांना दिसू लागते. पाहाता पाहाता श्रीप्रभूची अवलियावृत्ती आणि श्रीचक्रधरांची त्यांच्या ठिकाणची भक्तिमानताही दृग्गोचर होऊ लागते.

३. *प्रसंगचित्रण (दृष्टि–श्रवण–गोचरता)*

*अदंडीनाथाची हकिकत* (पूर्वार्ध–खंड १, पृ. ३३) :—अदंडीनाथांनी क्षपणिकाला वाग्युद्धात जिंकिले. तेव्हा क्षपणिक त्यांना म्हणाले की, **“ आतां तुम्हीं आम्हीं सामर्थ्यें भांडों : हो कां : आमची अमृत कूपीं स्वर्गीचें अमृत आणिल : तें हीं म्हणीतलें : आम्हीं आणुं नेदुं : हो कां : कूपी अभिमंत्रुनि परिहरिली : गेली : अमृत घेउनि येत होती : अदंडीनाथीं डावीये पाईची पाउ भिड भिड म्हणौनि परिहरिली : अमृत कुंडीहुनि अमृत घेउनि येत होतीं : पाउ लीसि ठुस ठुस करि लागली : आणि कुपी फुटली : तिन कोरें जालीं : तें तीं ठाइं पडलीं : तें तीन तीर्थें जालीं :”**

आव्हानाचा स्वीकार, अटीतटीचे वातावरण, कुपीचे आरोहण-अवतरण, 'ठुस् ठुस्, भिड् भिड्' हे ध्वन्युच्चार आणि कुपीचा भंग यामुळे नेत्र आणि कर्ण दोन्हीही तृप्त होतात; कथनाला दृश्यमूल्य आणि श्रव्यमूल्य लाभते.

## ४. *प्रसंगवर्णन (गतिमानता)*

**उदा०**—एका गावी श्रीचक्रधर उकिरड्यावर झोपले; पहाटे एका बाईने तेथे राख ओतली; नंतर कोणी चिपाडे-शेण ओतले; तेव्हा चक्रधर उठून चालू लागले. पहाटेच्या अर्ध प्रकाशात हे एकाने पाहिले व तो आणि त्याबरोबर इतर लोक म्हणू लागले, "**आरे, उकरडा व्याला : माणूस जाले : हे गावा अरिष्ट जाले : आतां शांति करा : खीच पुरीया रंधन केले : उकरडां जोगीया देसातरीयां वाढिलें :**" यांतील प्रत्येक वाक्य नवा आशय, नवा अभिप्राय, नवी कृती घेऊन येणारे आहे. त्यामुळे दिवसभराची घटना क्षणार्धात मनश्चक्षूंपुढे उभी होते. अशी गतिमूल्य असणारी चित्रमय निवेदने लीळाचरित्राचे खास वैशिष्ट्य ठरतील.

## ५. *प्रसंगवर्णन (तपशीलवार)*

(अ) *श्रीचक्रधरांना स्नान घातले, आरोगणा दिधली ते वर्णन*– '**उतरीले पटीसाळेवरि आसन : चरणक्षाळण केले : चरणोदक घेतलें : वोळणीं तेल : चिकसा : आणिला : सर्वज्ञें म्हणीतलें : कपीला स्नान वर्तैना : हो कां जी : मग उपरीएवरि : बीजें केलें : चौरंगावरि आसन : दोनि गंगाळें उदकां भरिलीं : एके गंगाळीं आंगवसा : तीमीती : श्रीमूर्ति प्रमार्जीति : दुसरीये गंगाळीं आंगवसा धुति : पंसे मार्जने जालें : मग तीयेंचि पटिसाळे चौरंगावरि आसन : सर्वांगी चदन वोळगविलें : पुजा केली : धुपार्ति मंगळार्ति केली : मग उमाइसा करवीं ताट करवीलें : मोकानंदें देव्हार चौकीये घेउनि आले : आरोगणा जाली : सारंगपंडीतीं प्रसादु घेतला :**'

(आ) *श्रीचक्रधरांच्या स्वागतसोहळ्याचे वर्णन :* '**सडे संमार्जन : गुढीया उभिलिया : मखर मांडळि करूनि भागवत मेळविले : गात : वात: नाचत : मोहो उच्छायासीं साउमे आले : गोसावीयांसि**

**भेटले : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले :...हरिखैजति : खेद-खीन्न होति : श्रीचरणा मोमे देति : ऐसे गात वात नाचत आपुलिया घरा घेउनि आले :**

### ६. *दीर्घ प्रसंगचित्रण*

'उत्तरार्ध'मध्ये दोन दोन शब्दांच्या लीळा जशा आढळतात, तशा दोन-दोन तीन-तीन, चार-चार पानांच्या लीळाही पण आढळतात. शिष्य सारे 'सन्निधानी' म्हणजे श्रीचक्रधरांच्या बरोबरच राहत व भ्रमण करीत; त्यामुळे एखादी विशेष हकिकत ते मोठ्या तपशिलाने आणि समरसून सांगताना दिसतात. 'उत्तरार्ध, ली० १०५' या दृष्टीने पहाण्यासारखी आहे. भटोबास आणि नाथोबा रेइ-नायकाच्या घरी श्राद्धाचे जेवावयास गेले. श्रीचक्रधरांना ते असम्मत होते. '**हां गा : तुम्ही गुरव : ना ब्राह्मण : लोकींचेया श्राधा : काइ म्हणौनि जेवावेया जा:**" हा त्यांनी प्रश्न केला. भटोबास आणि नाथोबा यांना मठप्रवेश मना केला. पुढे बाइसाच्या विनंतीवरून त्यांना आत घेतले, पण उड्या घालण्याची शिक्षा केली. अडीचशे 'दंडवतांचा व्यायाम' घडविला; ते अन्न जिरविले आणि मग वर 'पाणीभातु जेववीले.'

उत्तरार्ध ली० १०७ मध्ये तर अनेक बारीक बारीक घटनांचे मिळून एक दीर्घ वृत्तान्त कथन झाले आहे. भटोबास 'हाटा'स जातात; श्रीचक्रधरांना निरूपणाची प्रवृत्ती होते, मग प्रार्थबाईसच ते निरूपण करतात; पुढे शिष्य जेवण करू लागतात; भटोबास 'साधे'ची थट्टा करतो, श्रीचक्रधरांस 'पूजे'ची प्रवृत्ती होते, पूजेची तयारी आणि पूजा, 'दुधातुपाची आरोगणा' होते...लहान लहान घटनांची आणि विविध व्यक्तींच्या बदलत्या मनोभावनांची यथातथ्य चित्रणे या लीळेत असल्याने ती वैचित्र्याचे आणि त्याचबरोबर 'श्रीचक्रधर आणि त्यांचा शिष्यपरिवार' यांच्या एकत्र जीवनाचे मनोहर चित्र रंगविते. उत्तरार्धातील अशा दीर्घ वृत्तांतातून सामान्यपणे या 'सन्निधानी'च्या काळातले काव्यशास्त्र-विनोदाचे, आणि ऐहिकतेच्या पातळीवरील सुखदु:खाचे प्रसंग आलेले दिसतात. (उत्तरार्ध–ली० ११, १०४, १०५, १०६, १११, २७३, २८३, २८६, ३४२, ४१९ ४७१ इ०...)

येथे 'अनतिदीर्घ प्रसंगचित्रण' आणि 'दीर्घ प्रसंगचित्रण' असे दोन भेद

करता येतील. यांपैकी पहिल्या प्रकारात एकाच व्यक्तीसंबंधीची एकाच घटने-भोवती असलेली हकिकत येते. उदा० वर आलेली प्रारंभीची 'भटोबास श्राद्धाच्या भोजनास जातात...' ही लीळा; आणि दुसऱ्या प्रकारात अनेक व्यक्तींची, अनेक घटनांभोवती असलेल्या हकिकतींची एकत्रितपणे येणारी लीळाही येते. उदा० वर दिलेली दुसरी लीळा. (उत्त० ली. १०७) हा भेद निवेदनाच्या कमी-अधिक लांबीवर आधारलेला नाही; ते एक त्याचे लक्षण आहे, पण लीळेतील वृत्तांता-मधील प्रसंगांची अथवा घटनांची विविधता आणि वैचित्र्य यांना या विचारात महत्त्व आहे. किंबहुना (१) वृत्ताची केवळ नोंद (२) केवळ वृत्तकथन (३) वृत्तकथन (४) प्रसंगचित्रण (५) दीर्घ प्रसंगचित्रण हे भेद त्या त्या घटनेकडे पाहण्याच्या आणि तिच्या आविष्काराच्या पद्धतीवरूनच पडलेले आढळतील.

'पूर्वार्ध', खं० १ मध्ये श्रीचक्रधर आणि त्यांचे शिष्य वेरूळच्या लेण्यांतून विहार करताना दिसतात, त्यासंबंधीच्या 'लीळा' आल्या आहेत. (पृ. २६ ते २८) त्या सर्व मिळून वस्तुतः एक सलग वृत्तान्तकथनच होते. अशा दृष्टीने लीळाचरित्रात पुष्कळ ठिकाणी दोन-दोन, तीन-तीन, चार-चार लीळा एका क्रमाने येतात, त्या एकत्रितपणे घेत गेल्यास दीर्घवृत्तांतकथनाची सुंदर उदाहरणे ठरतील.

'पूर्वार्ध,' खंड १ मध्ये 'सारंगपंडिता भेटी' (पृ. २९) 'अदंडीनाथा सामर्थ्य कथन' (पृ. ३२) 'शांतिबाइसा भेटी' (पृ. ३९) 'चतुर्वीद्यांचा मठीं अव-स्थान' (पृ. २३)या लीळा; तसेच पूर्वार्ध खंड० २ मधील 'साधे'ची गोष्ट (पृ. ३६) किंवा 'पानुनाएका'ची हकिकत (पृ. ७६) ही सारी सुंदर दीर्घकथनेच आहेत. 'पूर्वार्ध' खं० ३ मध्ये शेवटी शेवटी आउसाला आणि भटोबासाला दीक्षा दिल्याचे प्रसंग (पृ. ४९ ते ५२; ५८ ते ६०) तर विशेष अभ्यसनीय आहेत. 'एकांक'मध्ये मात्र असे लांबलचक प्रसंगनिवेदन अथवा प्रसंगचित्रण येत नाही; त्यांचे वाङ्मयीन स्वरूप वेगळे आहे.

### (ग) *कथाकथन–विविध प्रकार*

### १. *कथारूप लीळा*

लीळाचरित्रातील लेखनाचे वाङ्मयीन स्वरूप मुख्यतः संवादप्रधान वृत्तकथ-नाचे आहे, हे आपण पाहिले. पण कधी कधी या वृत्तकथनाला गोष्टीचे, एका

छोट्या कथेचे (Tale चे) स्वरूप येते. 'एकांक' मधील लीळा बहुधा वृत्तनिवेदनापेक्षा छोट्या कथेचा आकार घेताना दिसतात. 'द्यूतक्रीडा' (ली. ६), 'श्रीप्रभुदर्शन' (ली. ७), 'आंध्रदेशीं तैल्यकारा भेटि' (ली. ११), 'चर्मकारा भेटि' (ली. १२), 'भक्ता भेटि' (ली. १४), 'वीन्हावो स्वीकारू' (ली. १६) 'पंचकौळीचार्य ग्रहोनिवृत्ती.' (ली. १९), 'ससीक रक्षण' (ली. २३), गोपाळांतु खेळु (ली. ३३), 'द्विजगोरक्षण' (ली. ४०), इ० लीळा यासाठी पाहाव्या. वानगीदाखल 'एकांक' मधील 'द्विजगोरक्षण' ही लीळा घेऊ—

**गांवीं एकीं पाणिपात्रासि बीजें केलें: ब्राह्मणा एकाचेया घरासि: तेणे म्हणितलें: कोण्हाचीं गोरुवें राखा कां: सर्वज्ञें म्हणितलें: यासि कव्हणी राखों नेदी: तेणें म्हणितलें: आम्ही देऊनि: आमची राखा: सर्वज्ञें म्हणितलें: हें राखैल: परि दोहे ना: सोडील परि बांधे ना: तेणें म्हणितलें: आम्ही बांधौनि: आम्ही दोहौनि: मग गोसावीं मानीले: उदीयांचि तिये गोसावीयासि मोट घालीति: गोसावी गाइ सोडीति: राना चरावेया नेति: गोसावी मोटेचें अन्न आरोगण करीति: सुडा धुति: श्रीमुकुटावरि घालीति: सीळातळावरि बैसति: गाई श्रीमूर्ति अवलोकीत बैसलिया असति: आनंदु रोंवतीति: वीळीचां गोसावी गाई घेउनि बीजें करीति: तिया गाईसि बहुत दुध होए; मग: तेणें ब्राह्मणें म्हणितलें: आपुलियें ब्राह्मणीतें: पैं: आजि दूध बहुत जालें: गाई निकेया चारीलिया: यासि न्हावेया लोणी घालावें: याचीयें मोटे दही घालावे: यापरि निचाचेयापासि निच अधिक गाईसि दुध होए: मग तो ब्राह्मणु राखो गेला: गाई कव्हणा राना नेतु असे पा: तवं गोसावीयांसि एका सीळातळासि आसन: गाई श्रीमूर्ती आनंदु रोंवतीति देखिलिया: वीळवेन्हीं चारु नाहीं: पाणी नाहीं: ऐसें देखोनि थोर विस्मो जाला: मग: घरीं ब्राह्मणीपुढां सांघों लागला: पैं: आमचेया गाई राखते तो साक्षात् श्रीकृष्णु: मग: तेथींचे वृत्तांतु सांगितलें: तिये दीसीं गाई गावामध्यें घातलिया: मग: बीजें केलें ॥ (एकांक–ली० ४०)**

या लीळेत एकूण तीन ठळक प्रसंग आहेत आणि ते नाट्यपूर्ण रीतीने आपल्या मनश्चक्षूंपुढे उभे केले आहेत. गोष्टीचा प्रारंभ होतो संवादाने, आणि तेथेच

चक्रधर व ब्राह्मण यांचे व्यक्तिमत्त्व ध्यानी येते; व उत्तरोत्तर त्यास अधिक स्पष्टता येते. भिक्षेसाठी आलेला एक सामान्य माणूस साक्षात भगवान श्रीकृष्ण आहे, या रहस्याचा उलगडा होतो न होतो तोच गोष्ट संपते, ती आणखी एका नव्या चमत्काराची भर घालून—श्रीचक्रधरांच्या एकाएकी गमनाच्या घटनेने ! सारे चित्रण धावते आहे. सुरुवातीलाच येणाऱ्या संवादाने या चित्रणाला एकदम वेग येतो, आणि त्या पार्श्वभूमीवर शांत, स्थिर, निश्चल बसलेल्या गाईंच्या कळपाचे रानातले चित्र एकदम उठावदार वाटते. ब्राह्मणगृहस्थाचा सद्‌भाव आणि त्याने पत्नीस केलेली मायाळू सूचना, तसेच स्वतः वस्तुस्थिती काय आहे ते पाहून आल्यावर विलक्षण भारावून जाऊन, तो पत्नीपुढे जे उद्‌गार काढतो ते, या कथेतील व्यक्तिदर्शनात गर्द रंग भरतात. गोष्ट विकास पावत जाते; आणि अखेर अनेक छोट्या प्रसंगांतून एक संस्कारात्मक चित्र काढून पुरे होताच, ती थांबते.

प्रत्ययकारक निवेदनाची अवस्था ओलांडून प्रत्यक्ष कथाप्रांतात लीळा उतरल्याचे सुंदर दृश्य अशा ठिकाणी जाणवते. तरी पण या ‘आठवणी’च होत.

## २. *कथारूप ‘दृष्टान्त’ :*

‘दृष्टान्तपाठा’मध्ये अनेकदा तर प्रत्यक्ष ‘गोष्टी’च दृष्टान्तादाखल दिल्या जातात; तेथे गोष्टी–वाङ्मयाचे शुद्ध स्वरूप आपणास पाहावयास मिळते, कारण ‘एकांक’मधील या गोष्टीसदृश लीळांना, नाही म्हटले तरी, पूर्ववृत्तकथनातूनच विकास पावावे लागले आहे. दृष्टान्तपाठातील कथानिर्मिती स्वतंत्र आहे. त्यातून विशद होणारे तत्त्व त्यांच्या गोष्टीरूपाला कसलाच बाध आणणारे नाही. ‘मालेकाराचा दृष्टान्त’ (दृ. १३), ‘बांदकरीचा दृष्टान्त’ (दृ. १६), ‘सुरीयेचा दृष्टान्त’ (दृ. ४०), ‘हत्तीचा दृष्टान्त’ (दृ. ४३), ‘कुष्टीयाचा दृष्टान्त’ (दृ. ५३), ‘आधारीचेया परीसाचा दृष्टान्त’ (दृ. ५४), ‘सींदेराणेयाचा दृष्टान्त’ (दृ. ७२) ‘अहीरदेशीचीए म्हातारीएचा दृष्टान्त’ (दृ. ९१), ‘कठियाचा दृष्टान्त’ (दृ. ९४), या साऱ्या गोष्टीच आहेत. त्यांना एक छोटेसे कथानक आहे. ते तेवढ्यातल्या तेवढ्यात वाढत जाते, एका विशिष्ट अवस्थेस येताच ते पूर्ण होते; मानवी जीवनाचा एक अर्थपूर्ण अनुभव गोष्टीरूपाने त्यात चित्रित केलेला दिसतो. ह्या गोष्टी म्हणजे कोणाच्या आयुष्यातील प्रत्यक्ष हकिकती म्हणून मांडल्या

गेलेल्या नाहीत. लोकमानसात अशाच पिढ्यापिढ्यातून चालत आलेल्या त्या कथा असाव्यात. नाहीतरी श्रीचक्रधरांच्या अगोदरपासून कावळा-चिमणीच्या शेणाच्या-मेणाच्या घरट्याची गोष्ट लोकात रूढ होतीच. स्वतः श्रीचक्रधरांनीच ही गोष्ट सारंग पंडिताच्या मुलीला-धानाइसाला–सांगून तिचा हट्ट घालविला. (पूर्वार्ध : खं. १ ली० २५) लीळाचरित्राने मराठीतील कथावाङ्मयाला मुख-परंपरेतून लेखनस्वरूपात आणले, काही नवीन कथा निर्माण केल्या. लीळाचरित्र हे मराठी कथावाङ्मयाचे उगमस्थान आहे.

यादवकालीन मराठी कथेचे सर्वांत सुंदर परिणतरूप 'आधारीचेया परीसाचा दृष्टान्त' मध्ये पाहावयास मिळते. त्यातील कथाप्रसंग, व्यक्तिदर्शन, भावचित्रण, संवादलेखन यांतून एक पूर्ण गोष्ट विकसित पावते. यादवकालीन मराठी गद्याच्या निवेदनशैलीचे सर्व विशेषही या एका कथेत एकत्रित झालेले आढळतात. शब्दयोजना आणि वाक्यरचना यांचीही मनोहर वैशिष्ट्ये या कथेच्या गद्यरूपात दृष्टीस पडतात. (या सर्व तपशिलांचा विचार अन्य लीळांच्या आधारे पुढे स्पष्ट केला आहे.)

### ३. *वास्तव जीवनचित्रण* :

ज्या काळात मराठी आख्यान–काव्य संस्कृत विदग्ध महाकाव्याच्या अनुरणात दंग झाले होते, विषय आणि आविष्कारपद्धतीचे सांकेतिक जीवन जगत होते, त्या काळात लीळाचरित्राने कितीतरी वास्तव जीवनचित्रे आणि कथा लिहून ठेवल्या. समाजाच्या अठरापगड जातींच्या, सर्व थरांच्या आणि स्थितींच्या मानवी जीवनाचे चित्रण या लीळाग्रंथात करण्यात आले आहे. लीळाचरित्राच्या 'उत्तरार्धा'त 'शुद्र सुखानुवाद' (ली. ४०४), मोळिकार सुखानुवाद (ली. ४०५), 'ग्रामेश्वरा' गर्वानुवाद' (ली. ४०६), 'चक्रवाकां अनुवादें 'गुरू सीख्या अज्ञान' : (ली. ४०९) 'गोलडी सींग भेडवणें (ली. ४११) 'वसीष्ट लवणाख्या कथन' (ली. ४१३) 'जोगी ब्रह्म उपदेशुकथन' (ली. ४१७) इत्यादी कितीतरी कथा, आख्यायिका, पुराण–गोष्टी श्रीचक्रधर सांगताना दिसतात.

एक वास्तव चित्रण या दृष्टीने 'मोळिकार सुखानुवाद' ही लीळा पाहावी. '**सर्वज्ञें म्हणीतलें : कऱ्हणी एकु मोळिकार असे : तयाचीए पाइं :**

तुटकीया वाहाणा : तया वाखाचे वाद् : फाटके कांवळः रगटेंः तयासि दोरे घातले असतिः तें पांगुरैन तरि फाटैलः म्हणौनि गोळा करूनि काखे सुयेः उदियांचि मोळिए जाएः मग तेयाची चुभळि करिः मग मोळी घेः घेउनि एः ते कहीं दामा विकेः कहीं रूका विकेः तेयाचे जोहनळे घे : ते कांबुळे पसरी : तेथ घेः मोठ बांधों न पूरे : तथा लोण बांधो न पूरे : चाऱ्ही पालव पोटेसीं धरूनि घेउनि ए : तीयेचां हातीं देः आपण अवकाशा जाएः ते तयाचा घाटा करीः रांधीः तो अवकाशा बैसोनि ए : ते फुटकीए नरवटी पाणी घालुनि दे : ते परूसा जाए : तवं तें पाणी गळौनी जाए : शौच्य करी तव अमैध्या हातु भरे : ते घाटा रांधीं : काष्ठपात्रीं घाटा नीवतु घाली : तो सरकाळवरि नीववी : दोघी सेंबूडीया कुमारी : सवें जेउं बैसवी : ते आणिकु वाढुं बैसे : तो म्हणे : पूरे पूरे : आपणयालागि ठेवी : जेवि : मग तुटकी ऐसी बाज : तयावरि फाटुकी ऐसी वाकळ : आंथरी : तेया वरि नीजे : तोंडावरि कूहिट पडे : मग वीखए वासना : तीची वास पाहे : मग ते म्हणे : चाला का : जावो माझेया माहेरा : तेथ लेंकूरवां दुभतें होईल : आम्हां खावेया होईल : तो म्हणे : माया मानिली भुमि : सांडु न शकों : साहावासु : सर्वज्ञें म्हणीतलें : ऐसी कुहिली अविद्या : परि तेही न संडवे : ...(उत्तरार्ध, ली० ४०५)

भाषेचे जुनेपण सोडले तर ही कथा सरळ आजच्या झोपडपट्टी–साहित्यात समाविष्ट होईल. या परिच्छेदात उल्लेखिलेल्या उत्तरार्धातील सर्वच लीळा अशा वास्तववादी चित्रण करणाऱ्या आहेत. त्या कथांतून एक एक जीवनप्रवृत्ती स्पष्टपणे उमटलेली आहे. प्रवृत्तिनिदर्शक अशा कथा उत्तरार्धात भरपूर प्रमाणात मिळतात.

येथवर लीळाचरित्रातील वृत्तांतकथनप्रकारा'च्या लेखनाचा विचार झाला. 'दोन अक्षरी' वृत्तनोंदीपासून ते पूर्णरूप पावलेल्या गोष्टीपर्यंत त्यात पुन्हा स्वरूपभेद जे दिसून आले, त्यांची थोडी वाङ्मयीन प्रकृती पाहिली. आणि प्रसंगचित्रण, व्यक्तिदर्शन व संवादलेखन या त्रिविध गुणांमुळे लीळाचरित्रातील जीवननाट्याला जिवंतपणा आणि प्रत्ययकारिता कशी आली आहे, ते पाहिले

### (घ) *'तत्त्वनिरूपण' विविध प्रकार*

*सूत्रलक्षण—*

श्रीचक्रधरांचे तत्त्वज्ञान आपल्या शिष्यांशी सहज वार्तालाप करीत असताना आणि कधी कधी विशेष प्रवृत्ती झाल्याने, प्रकट झाले आहे. ते सारे सूत्रात्मक आहे. 'अल्पाक्षररमणीयत्व' हे सूत्राचे एक प्रधान लक्षण होय. अर्धमात्रा जरी वाचविता आली तरी सूत्रकाराला पुत्रजन्मोत्सवाचा हर्ष होतो. सूत्र हे 'अल्पाक्षर' असूनही 'असंदिग्ध' असावे लागते. विश्वव्यापक अनुभव त्यामध्ये साररूपाने ग्रथित व्हावा लागतो. ते अकृत्रिम, केवळ सत्यरूप असावे लागते. निर्दोषता हा त्याचा आवश्यक गुण आहे. शिवाय बालबोधिनी' शैलीत ते मांडावे लागते.[1]

*श्रीचक्रधरांची काही सूत्रे—*

**कोमळ ज्ञानीं विरवो विघ्न ॥—जीवासि वैराग्य मिरउं आवडे हाही एकु विकारुचि कीं गा ॥—मुक्तीची चाड तेणें मुंगिये वीरु न चिंतावे ॥—धड तुटलेयांही जीवें परमेश्वरानें न सोडावें ॥—प्राणासि आहारु देआवा इंद्रियासि नेदावा ॥ —पुरुषप्रयत्नीं दैवाचें साह्य ॥ —अन्यवार्तेपसि निद्रा चांग ॥ —क्रियेसि अनुतापु पुरश्चरण ॥ —अहंतेचें मूळ सकंदी उपडावे : एऱ्हवी अंकुर निगति : मग शांतीचें रोप लावावें ॥—महात्मेनि प्रियवक्तेया होआवें : महात्मेनि सत्यार्जवा होआवें ॥—जीवाचा वागारा नावेक ढिला करों नये ॥ —खरूज खाजवीना तो विरक्त ॥—स्वातंत्र्य हा मोक्ष : पारतंत्र्य हा बंध ॥ कर्मचांडाळापसि जातिचांडाळु तो चांग ॥ —आचारें योग्यता : विचारें दृढता ॥—ओठांतरा निगालें तें देशांतरा जाए ॥—**

*सूत्रांचे वाङ्मयीन स्वरूप :—*

ही सूत्रे मोजक्या शब्दात निश्चितार्थ देणारी आहेत. बचकेएवढे सूर्यबिंब पण विश्वाला प्रकाशित करण्याचे तेज त्यामध्ये सामावलेले; तसे या चिमुकल्या शब्दसंहतीत मूलभूत, विश्वात्मक जीवनदर्शन ठासून भरलेले दिसते. अमूर्त

---

१ स्वल्पाक्षरं असंदिग्धं सारवत् विश्वतोमुखम् ।
अस्तोभं अनवद्यं च सूत्रं सूत्रविदो विदुः ॥

विचारांचे मूर्तीकरण यांतील कित्येक सूत्रांत झालेले आढळते. अशी सूत्रे रूपकात्मक आहेत. त्यांतील काही तर परंपरित रूपके असून, मूळ सिद्धान्त मनावर बिंबविण्याची त्यांची शक्ती अमर्याद आहे. काही ठिकाणी अन्वयव्यतिरेक पद्धतीने सिद्धान्ताची एक अर्थनिश्चिती करण्यात आली आहे. क्वचित् विरोधदर्शनाने, तर क्वचित तरतमभावाने मूळ विचार सुस्पष्ट केला आहे. जे आहे ते स्पष्ट, निःसंदिग्ध, ठाशीव, भरीव, कसदार आहे. केवळ लघुता किंवा अल्पाक्षररमणीयता एवढाच याचा रचनाविशेष आहे असे नव्हे; तर या रचनेत शब्दबंधाची एक विशिष्ट लय आहे. सूत्रांतर्गत वाक्यात पुष्कळ ठिकाणी यमक आणि अनुप्रास उत्स्फूर्तपण आलेले आहेत. पुनरावृत्त शब्दांची, ईषत् पुनरावृत्त अक्षरांची, समपदस्थ वाक्यांशांनी मिळून ही 'लय' निर्माण होते. दोन वाक्यखंडांतील संतुलित विचारांशातही ही लयबद्धता दृग्गोचर होते.

या सूत्रांना परतत्त्वस्पर्शही झालेला आहे; नव्हे ते अस्सल 'परतत्त्व'च आहे; पण ज्या संदर्भात ते अवतरते, तो संदर्भ लौकिक असल्याने हे 'परतत्त्व'ही आपल्यातलेच, लौकिक असल्याचे भासमान होते. हेही या सूत्रांचे एक आस्वाद्यमानतेच्या दृष्टीने महत्त्वाचे कारण होय. यामुळे ही सूत्रे म्हणजे केवळ 'विचारमालिका' नव्हत, तर ती 'आचारमालिका' ही आहेत. श्रीचक्रधरोक्त सूत्रवाङ्मयाचे हे वाङ्मयीन सौंदर्य खरोखरी मराठीत अगदी अपूर्व होय.[1] आध्यात्मिक आणि नैतिक क्षेत्रात मराठीत सूत्रवाङ्मय पुढे निर्माणच झाले नाही; ते 'आज्ञापत्रा'तून किंवा 'ऐतिहासिक कागदपत्रा'तून राजसरूपात प्रकट झालेले आढळते; आणि अगदी अलीकडे आपल्या सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक नेतृत्व करणाऱ्या विचारवंतांच्या पत्रातून, भाषणातून ते विखुरलेले दिसून येते; विशेषतः विवेकानंद, महात्मा गांधी, आचार्य विनोबा यांच्या दैनंदिन वाङ्मय-व्यापारातून ते हमखास आढळतेच !

ही सूत्रे जेव्हा एखाद्या प्रसंगातून निर्माण होतात तेव्हा ती जणू अर्थान्तरन्यासासारखी वाटतात; पण ती अर्थांतरन्यासात्मकच असतातच असे नाही; कारण येथे 'समर्थ्य-समर्थकभाव' नाही; तर प्रसंगोत्स्फूर्त आध्यात्मिक किंवा

---

१ श्रीचक्रधरोक्त सिद्धान्तसूत्रांचे विषयदृष्ट्या वर्गीकरण करून त्यांचे पुन्हा रचनासौंदर्य पृथक्पणे पाहणे मनोरंजक आहे. 'सूत्रपाठा'चा वाङ्मयविमर्श प्रकरणशः येथे अभिप्रेत नाही.

लौकिक विचारकथन आहे. 'अर्थांतरन्यास' म्हणजे केवळ 'तात्पर्य' असा अर्थ घेतला तर, मग ही 'सूत्रे आणि तत्संबंधीचे प्रसंग' मिळून गद्यातील अर्थांतरन्यासाची बरीच उदाहरणे लीळाचरित्रात मिळू शकतात.

लीळाचरित्रातील प्रसंगदर्शनातून येणारी सूत्रे ही उत्स्फूर्तपणे आलेली आहेत, मुद्दाम 'सूत्र' सांगण्यासाठी प्रसंगनिर्मिती किंवा प्रसंगाच्या महत्त्व-दर्शनासाठी सूत्रनिर्मिती असा येथे सहेतुक, वेगळा, जाणीवपूर्वक अलंकार-निर्मितीचा प्रकार नाही. लीळाचरित्रांतर्गत जे दृष्टान्त येतात ते 'दृष्टान्त'च आहेत; म्हणजे एका विशेष गोष्टीवरून दुसरी विशेष गोष्ट अधिक स्पष्ट करण्या-साठी ते तेथे सांगितलेले आहेत. त्यामध्ये बिंब-प्रतिबिंब-भाव असतो. घडले त्याचे 'सार' काढून दाखविण्यापेक्षा, त्या घडलेल्या प्रसंगातून खरे शुद्ध मूलस्वरूप असे विचारसूत्र किंवा असा आचारधर्म स्पष्ट करण्याकडे श्रीच क्रधरांची प्रवृत्ती आहे. काही प्रसंग यासाठी पाहू.

**प्रसंग** (१) : एके दिवशी सारंगपंडितांनी श्रीचक्रधरांस उपाहारासाठी विनंती केली. वेळ दुपारची. श्रीचक्रधर गेले; रामनाथाच्या चौकी आसन केले. तयारी झाली की नाही हे पाहण्यास सारंगपंडित गेले. तेवढ्यात महादाइसाने पाहिले की '**गोसावीयांचे चरण रजें भरले असेति : आणि उन्हाचे दीस :**' ती आत गेली. रामनाथाच्या पिंडीवर 'गळती' टांगली होती, ती तिने आणली आणि गोसावीयांचे श्रीचरण प्रक्षाळण केले. '**मग सर्वज्ञें म्हणीतलें : स्नेहाचां ठाइं उचित स्फुरे :**'

**प्रसंग** (२) : दुर्लभा नावाची एक बाई तिला श्रीचक्रधरांचे दर्शन घ्यावयाचे होते. पण तिचे अंग घामाने ओले झाले होते. घामेजल्या अंगाने गोसावियांकडे कसे जावे, असे वाटून समोरच एक ओढा होता, त्यात तिने हातपाय, दंड, काखा धुतल्या. तिच्या 'अवघिया बाहिया काखा उघडिया' पाहून बाईसाला बरे वाटले नाही; ते तिने गोसावियांना सांगितले. दुर्लभा आली, तिने दर्शन घेतले, तेव्हा गोसावी तिला म्हणाले, "**हे काइ बाइ : एथौनि हे देखताए : हा लोकू देखताए : ऐसें न कीजे कीं : बाई :** '*लज्जारूप धर्म तो स्त्रीयांसि रक्षण*' :

**प्रसंग** (३) : एकदा आउसा 'अवकाशा वैसोनि' परत येत होती. वाटेत तिने गोसावियांना पाहिले, आणि त्यांना टाळून नमस्कार न करताच ती पुढे

सटकली. तेव्हा 'का? नमस्कार का नाही?' असे गोसावियांनी विचारताच ती म्हणाली 'अशुचि आहे'. लगेच गोसावी उद्‌गारतात की, "**मनिचे अभिलाष नीवर्तलेः तरिः शुचि अशुचि यें दोन्हीं नाहीं कीं:**"

**प्रसंग (४)** : एकदा एका बाईच्या स्वप्नात एक ब्राह्मण आला आणि त्याने सांगितले की, 'माझ्या हातून काही पाप झाल्यामुळे मी बैल होऊन एका गरदाडात पडलो आहे; गोसावियांचे दर्शन मला घडवा, म्हणजे मी शापमुक्त होईन'. त्या बाईने दुसऱ्या दिवशी सकाळी गरदाडाजवळ जाऊन तेथे एक बैल पडलेला प्रत्यक्ष पाहिले, आणि झालेली हकिकत श्रीचक्रधरांना सांगितली. तेव्हा '**गोसावी पूसिलें : बाइ : तुम्हीं काइ दीधलें : ना : जी : आमचें जाए ना : सर्वज्ञें म्हणीयलें : बाइ : जावेयासि काइ कारण : सतसंभवीं अधिकाचि होइल : पुण्य देतां पुण्यचि वाढे : सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ : दीवेया पासौनि दीवा लाविजे : तरि दीवा काइ उणा होतु असे :**'...

**प्रसंग (५)** : एकदा महदाइसाने गोसावियांस विचारले की आपल्या प्रसादाचे दोन अर्धे अर्धे वाटे करून त्यांतला एक नागदेवाचार्यांस आणि एक इतर सर्वांस, असे दिले तर त्याने पाप लागेल काय? तेव्हा '**सर्वज्ञें म्हणीतलें: बाइः पाप तरि नव्हे : परि अविधी होए : मग अवधीतें प्रसवेः अविधी तवं पुरुषु धर्मापासौनि जाएः**' यावर श्रीचक्रधरांनी 'कठियाचा दृष्टान्त' सांगितला, (असावा.) (दृष्टान्तपाठ–दृष्टान्त ९४.)

या पाच प्रसंगचित्रणाचा तुलनेने विचार करता असे दिसून येते की,

पहिल्या प्रसंगात जे घडले त्या **कृतीचा भावार्थ** सूत्ररूपाने श्रीचक्रधरांनी सांगितला आहे. दुसऱ्या प्रसंगात घडलेल्या कृतीचा इत्यर्थ सांगण्याऐवजी त्यातून **स्फुरणारा स्त्रीधर्म** सांगून तो आचरण्याचा उपदेश करण्यात आला आहे. तिसऱ्या प्रसंगांत एकदम **शुद्ध धर्मतत्त्वच** श्रीचक्रधरांनी प्रकट केले आहे. चवथ्या प्रसंगातही हेच आहे, पण धर्मतत्त्व किंवा आचरतत्त्व सांगून, ते पुन्हा एका **छोट्या दृष्टान्ताने विशद केले** आहे. पाचव्या प्रसंगात वरीलप्रमाणेच सारे आहे, पण येथे **एक पूर्ण गोष्ट** दृष्टान्तादाखल घेऊन मूळ तत्त्व स्पष्ट केले आहे. यावरून हे दिसून येते की प्रसंगातून सूत्रे संभवतात आणि दृष्टान्ताने ती विशद केली जातात. प्रसंग, सूत्र आणि दृष्टान्त यांमध्ये असा उद्‌गम–विकास–विस्तारात्मक संबंध आहे.

### सूत्रस्पष्टीकरणाच्या पद्धती

प्रत्येक सूत्राचे स्पष्टीकरण लीळाचरित्रात केले आहे असे नाही. पण जेथे स्पष्टीकरण केले जाते, तेथे **दोन** पद्धतींपैकी कोणत्या तरी एकीचा, अथवा दोन्हींचाही अवलंब केल्याचे दिसून येते. एक पद्धती केवळ **अर्थविवरणाची**, तर दुसरी केवळ **दृष्टान्तकथनाची**. प्रथम अर्थविवरणपद्धतीची काही उदाहरणे पाहू :—

*अर्थविवरणपद्धती*

(१) एकदा गोसावियांस निरूपणाची प्रवृत्ती अनावर झाली, आणि बाइसा किंवा नागदेवाचार्य समोर नसल्याने ते प्रार्थबाइसाला उद्देशून '**देवो कैसा असे :**' असे म्हणून निरूपण करू लागले. '**देवो नव्हे : पाखाणाचा नव्हे : देओ काष्ठाचा नव्हे : देओ मातीएचा चीत्रीचा नव्हे : देवो पटीचा नव्हे : देओ वासनाभेदे देवो धातुचां नव्हे : पाखाणाचा तो फुटैल : लाकुडाचा तो मोडैल। मातीचा चीत्रीचा तो पुसैल : पटीचा तो फाटैल : धातुचा तो भीजैल : देवो तो : अछेद : अभेद : अकल्पित : अलेखु :**" (उत्त० ली० १०७.)

(२) एकदा गदोनायकाने श्रीचक्रधरांची रत्नखचित पदार्थांनी पूजा केली; आणि नंतर म्हटले की, "**जी जी : मातें अपार द्रव्य असे : आणि आणिकही असे : तरि एणें मज ईश्वरू होइल :**" तेव्हा श्रीचक्रधरांनी सांगितले की द्रव्याने जर ईश्वर मिळणार असेल तर राजे आणि मांडलिक तसे का राहिले असते ? (परमेश्वरू पाविजे ऐसी) बुद्धी असली पाहिजे. याचे स्पष्टीकरण गोसावी करतात ते असे—"**द्रव्यसंपत्ति ईश्वर न पविजे : पुत्रसंपति ईश्वर न पविजे : भृत्य संपति ईश्वरू न पविजे : भ्रातृ संपति ईश्वरू न पविजे : सुहृद्संपति ईश्वरू न पविजे : विद्यासंपति ईश्वर न पविजे : वासनाभेदें हें सकळै परित्यजुनि अनन्यगति ईश्वरा शरण रिगे तैचि कीं होइल : आणिकें काइसेनहीं नव्हे : देवो तो देवोंचि होए :**" (उत्त० ली० २५०).

(३) एकदा आउसाने श्रीचक्रधरांची '**गोसावी कामधेनुः गोसावी कल्पतरूः गोसावी चिंतामणिः**' अशा शब्दांनी स्तुती केली; ती ऐकून

भटोबासास संतोष झाला. पण कामधेनू, कल्पतरू किंवा चिंतामणी ही उपमाने अपुरी आहेत, चुकीची आहेत हे स्पष्ट करण्यासाठी श्रीचक्रधर म्हणतात, '**कामधेनु तें एकाचिए दारींचें दोरः तैसा काई परमेश्वरूः तैसें काई हे कल्पतरू : ते एकाचीए दारींचें झाड : तैसा काइ परमेश्वरू : परमेश्वरू चींतामणि : तो एकाचीए गळींचा मणि : तैसा काई परमेश्वरूः...के अचिंत्यानंतशक्ति परमेश्वरू : आणि के चींतामणि : कामधेनु :**'

वरील तीन उदाहरणांपैकी पहिल्या उदाहरणात मूर्तिरूपातच देवत्व पाहणे ही जी रूढ पारंपारिक देवविषयक समजूत आहे, ती कशी चुकीची आहे, हे प्रथम सांगितले; नंतर त्याची कारणे दिली आणि शेवटी खरे परमेश्वरस्वरूप कसे असते ते मोजक्या विशेषणांनी कथन केले. लोकप्रिय व ज्ञात कल्पनांपासून प्रारंभ करून नंतर त्यांचे निराकरण करणे आणि मग अज्ञात पण सत्य कल्पनांकडे जाणे, अशी ही सुयोग्य विवरणपद्धती आहे. अन्वयव्यतिरेकाने त्याची मांडणी होते. दुसऱ्या उदाहरणात केवळ तात्त्विक विचाराऐवजी आचारधर्मासंबंधीचा विचार येतो, विवरणपद्धती मात्र हीच आहे. तिसऱ्या उदाहरणात रूढ उपमानाचा फोलपणा सिद्ध करताना एक सुंदर व्यतिरेक अलंकार सहजपणे निर्माण झाला आहे. शेवटच्या वाक्यात तर एकाच वेळी प्रश्नालंकार आणि विरोधालंकार साधल्याने फार मोठी परिणामकारकता आली आहे. या तिन्हीही पद्धतींच्या विवरणक्रियांनी विचारातील सांकेतिकता आणि आंधळेपणा पार पुसला जातो आणि त्याचे मूळ **शुद्ध रूप** जिवंतपणे मनावर ठसते.

आता दृष्टान्तपद्धती पाहू.

## दृष्टान्तपद्धती

सूत्रस्पष्टीकरणाची दुसरी रीती म्हणजे दृष्टान्तपद्धती; ही दृष्टान्तपाठातून तर दिसून येतेच, पण त्याव्यतिरिक्तही लीळाचरित्रात अन्यत्र ती पाहावयास मिळते. शांतिबाईसाचा मुलगा इकडे मेला. तिकडे मुलीला सासरच्यांनी टाकून दिले. विधवा सून आणि टाकलेली मुलगी—'**एकी पाठीसी बांधैन : एकी पोटेसीं बांधैन : मा : रिगैन गोमतीए मध्यें :**' अशा निर्धाराने शांतिबाइसा निघाली. गोसावियांचे दर्शन झाले. "**सर्वज्ञ म्हणतीलें : दुःख**

**न करा : दुःख म्हणजे पाप : दुख तवं नरक : होति : सोनेयाची फळी : तथा : प्रतीमां पोटीं वांधौनि पुरांतु रीगों नथे कीं : जन्हीं झाली सोनेयांची : तन्हीं बुडळील कीं : बाइ दुख न करा :”** असे सर्पमक दृष्टान्त लीळाचरित्रात अनेक ठिकाणी येतात.

‘दृष्टान्तपाठ’ हा लीळाचरित्राचाच वस्तुतः अंगभूत असा भाग होय. यातील दृष्टान्त मुख्यत्वे तीन प्रकारचे आहेत. (१) सरळ साधे दृष्टान्त (२) छोटा प्रसंग कल्पून स्पष्टीकरण देणारे दृष्टान्त. (३) आणि संपूर्ण गोष्टीतून सूत्राचा अर्थ विशद करणारे दृष्टान्त म्हणजेच कथारूप दृष्टान्त. त्यांची प्रत्येकी उदाहरणे—

*प्रकार पहिला* : **‘राहाट घडीएचा दृष्टान्त’.**

*सूत्र* : **मायाचक्र भ्रमण न्यायें पर्यायवशे जीवु सकळही पावे एकत्रांचौनि ॥**

*दृष्टान्त* : **राहाटीं घडी वांधली असे : ते ये : जाए : भरे : रीचवे :**

*प्रकार दुसरा* : ‘फुटाणेकाराचा दृष्टान्त’ (द० २६), ‘गुळहारियाचा दृष्टान्त’ (द० ६७), ‘खेड्या खुचटेयाचा दृष्टान्त’ (द० १५), ‘चांदोवैयाचा दृष्टान्त’ (द० ४२) इ०...या दृष्टान्तांमध्ये पहिल्या प्रकारातील प्रमाणे (राहाटघडीएच्या दृष्टान्ताप्रमाणे) केवळ प्रतिबिंबभाव नमूद केलेला नाही. तर एक प्रसंग किंवा छोटी घटना कल्पून एखाद्या प्रत्यक्ष हकिकतीद्वारा मूळ विचार मनावर ठसविण्यात आला आहे. मात्र ह्या दृष्टान्तांना संपूर्ण गोष्टीचे रूप लाभलेले नाही.

*प्रकार तिसरा* : ‘माळेकाराचा दृष्टान्त’ (द० १३), हत्तीचा दृष्टान्त’ (द० ४३), ‘आधारीचेया परीसाचा दृष्टान्त’ (द० ५४) ‘सींदेराणेयाचा दृष्टान्त (द० ७२), ‘कठियाचा दृष्टान्त’(द० ९४) इ०...

येथे संपूर्ण गोष्टीच दृष्टान्त म्हणून येतात. या तिसऱ्या प्रकारचे दृष्टान्त दहा–बाराच आहेत. बहुसंख्य दृष्टांत पहिल्या आणि दुसऱ्या प्रकारचेच आहेत आणि ते संख्येने जवळजवळ समान असे आहेत. पण एकंदरीत असे दिसते की हकिकतीच्या किंवा गोष्टीच्या रूपाने दृष्टान्त देण्याकडे श्रीचक्रधरांची विशेष प्रवृत्ती दिसते. दुसऱ्या प्रकारात हकिकतीला गोष्टीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न

कितीतरी ठिकाणी केलेला आहे. दृष्टान्त–८,११,३८, ७४,७७,५४,६० यादृष्टीने अभ्यास करण्यासारखे आहेत.

*दृष्टान्तसमूह :—*

श्रीचक्रधरांची अर्थाची फोड करून दाखविण्याची हातोटी, दोन किंवा अधिक विचारांतील सूक्ष्म भेद विशद करण्याचे कौशल्य दृष्टान्तपाठात कितीतरी ठिकाणी दिसून येते. 'सोमकान्ताचा दृष्टान्त' (दृ० ९) मधील सूत्र 'हे शास्त्र दृष्टाप्रति कारण होए कां अदृष्टाप्रति कारण होए' हे आहे. यावर 'सोमकांता'चा दृष्टांत श्रीचक्रधरांनी दिला असून सोमकांत पाषाण आणि इतर पाषाण यांतील भेद पुढीलप्रमाणे दाखविला आहे. **"चंद्राचां रश्मी करूनि सीळापाषाण** (लतागुल्में–रामेश्वरबास) **नीवति : परि द्रवति ना : तैसा सोमकांतु नव्हे : तो द्रवे ॥"**

पण याहीपेक्षा एकच उपमान घेऊन त्याच्या वेगवेगळ्या अवस्था, त्याची वेगवेगळी रूपे यांच्या योगाने अनुभवातील आणि ज्ञानातील भेद सूक्ष्मतर रीतीने श्रीचक्रधर स्पष्ट कसे करतात, ते पाहाणे मनोरंजक आहे. एकाच उपमानातून विविध दृष्टान्त कल्पून एक 'दृष्टान्त-समूह' येथे तयार होतो. 'माता' ह्या उपमानावर सात दृष्टान्त सिद्ध झालेले आहेत. या सात दृष्टान्तांचा जो एक समूह होतो त्यांतून, कोणत्याही आणि कसल्याही अवस्थेत माता आपल्या लेकराला विसरत नाही, त्याची काळजी घेते, हे स्पष्ट केले आहे. आणि परमेश्वर आणि भक्त यांच्यांतील हेच दृढ नाते या दृष्टांतांतून मनावर ठसविले आहे (दृ. २५, ३८, ३९, ४४, ६८, ९८, ९९) मातेचे हे दृष्टान्त सलगपणे दृष्टान्तपाठात आलेले नाहीत. पण 'विरहिणीचे दृष्टान्त' (दृ. ८७, ८८, ८९) 'वालुकाचे दृष्टान्त' (दृ. ३१, ३२, ३३, ३४) 'वेधशक्तीचे दृष्टान्त' (दृ. ४, ५, ६, ७), त्रिविधावताराचे दृष्टान्त (दृ. १, २, ३), स्वर्गादी कल्पनेचे दृष्टान्त (दृ. २१, २२, २३) क्रमाने येतात; त्यामुळे दोन कल्पनांतील भेद चटकन नजरेत भरतो. एकच उपमान विविध संदर्भात उपयोजिण्याची ही कल्पना तुलनेने साम्यभेद दाखविण्याच्या दृष्टीने नेहमीच उपयुक्त आणि परिणामकारक असते.

याशिवाय सामान्य स्त्री, दासी आणि पतिव्रता (दृ. ६१, ६२, ६३), द्विभार्या,

दुर्भगा आणि शय्यापालना (दृ. ८३, ८४, ८५) तसेच बालविधवा (दृ. ९७) यांच्या दृष्टान्तांनी स्त्री-पुरुष, पतिपत्नी यांच्यांतील विविध भावबंध आणि परमेश्वर-भक्त यांच्यांतील भावबंध यांत बिंब-प्रतिबिंब-भाव व्यक्त केला आहे. तुरंगम, अग्नी, 'कठिया', 'विषयी पुरुष', 'इसाळू', 'दगड-गुंडा' या उपमानांचाही अनेकवार वापर केला गेला आहे. पण यात पुनरावृत्ती नाही; वेगवेगळ्या संदर्भात आणि भिन्न अर्थच्छटादर्शनामुळे त्यांमध्ये अभिनवता आणि समर्पकता जाणवते.

## ३

## *स्थल-काल-व्यक्ति-वर्णने.*

### (अ) *स्थलकालवर्णने—*

लीळाचरित्रात स्थलवर्णने, कालवर्णने अशी स्वतंत्रपणे कोठेही करण्यात आलेली नाहीत; आणि जी आहेत तीही अगदी त्रोटक एक दोन वाक्यात आटोपलेली. लीळाचरित्राचे स्वरूप मूलतः निवेदनाचे आणि कथनाचे आहे. त्या ओघात जेवढे बसेल तेवढेच स्थलकाल-वर्णन लीळाचरित्रात येऊन जाते. संस्कृत महाकाव्यासारखी ही एक आदर्शानुसारी कलानिर्मिती नाही; की ज्यामुळे उत्प्रेक्षामय अशी खास स्थल-काल-चित्रण करणे आवश्यक वाटावे. रात्रीचे जेवण झाले होते; सुपारी-विडा खात खात '**गोसावी आंगणीं वेढें करिताति : तवं पीठ ऐसें चांदिणें पडलें असे : सर्वज्ञें म्हणीतलें : चांदणें नीके ना गा : सर्वज्ञें म्हणीतलें : ऐसां चांदिणां ग्रामांतर कीजे तरि काइ :**'—असे सहजपणे चांदण्याचे वर्णन(!) येऊन जाते. 'पूर्वार्ध' खं. २ मध्ये द्राक्षमांडवातील चांदण्याची शोभा अशीच अभिप्राय-स्वरूपाने व्यक्त झाली आहे. (पृ. ३२) शुक्राची चांदणी पाहून 'शुक्रकथे'चे कथन 'पूर्वार्ध' खं. ३ मध्ये येते. (पृ. ३२) नदीच्या पुराचे वर्णन 'एकि धार आकाशीं : एकि पाताळी' असे अतिशयोक्त रूपात आले आहे. (उत्त० ली० ४१९) (हे वर्णन दुसऱ्या एकाच्या तोंडचे म्हणून म्हाइंभटांनी उद्धृत केले आहे, हे ध्यानी घ्यावे.)

स्थलवर्णने तर कालवर्णनापेक्षाही केवळ नोंदीच्या स्वरूपाची आहेत. एखाद-दुसरी ठळक चित्ररेषा ओढलेली असायची; पण खरे म्हणजे त्यांना चित्ररेषा

म्हणणेही अयोग्यच! केवळ ठळक माहितीच येथे दिलेली असते—मठाची, पडक्या मंदिराची, लेण्यांची, गुंफांची इ० उदा०—

'**आदित्याचेया देउळासि : पूर्वामुख जगतीचा दारवठा : आड-दांडिए वरि लोंवता श्रीचरणीं गोसावीयांसि आसनः**' (उत्त० ली० २१२) लेण्यांचे कलादृष्ट्या वर्णन लीळाचरित्रात नाही; मात्र काही लेण्यांचे एखादे ऐतिहासिक वैशिष्ट्य नमूद केलेले दिसते. उदा० शंकरलेण्यासंबंधी बाइसाने विचारले, "**बाबा : हें केसना दारवठा : हें केसणें लेणें : सर्वज्ञें म्हणीतलें : या देउळासिः तथा : देवतेसि : हातिवरि वोलें येः**' (पूर्वार्ध, पृ० ४६)

(आ) *व्यक्तिरूपवर्णने :*

लीळाचरित्रात व्यक्तिरूपवर्णनें अत्यल्प आहेत. पण जी आहेत ती मात्र ठसठशीत, जिवंत ठळक पण त्रोटक! यातही श्रीगोविंदप्रभू आणि श्रीचक्रधर यांचीच मूर्तिवर्णने आपणांस अधिक मिळतात. लीळाचरित्रात इतर असंख्य व्यक्ती आणि व्यक्तिमत्त्वे येतात आणि जातात; पण मूर्तिरूपाने त्यांतील कोणीच आपल्या मनःचक्षूंपुढे उभी राहात नाहीत. 'कोथळोबा', 'वानर' अशा विशेष संज्ञांनी काही व्यक्तिगुणांची कल्पना येते तेवढीच. 'लीळाचरित्र'कारांना या व्यक्तींमध्ये स्वतंत्र अशी गोडी नाही; कारण या व्यक्तींना महत्त्व जे आहे ते श्रीचक्रधर आणि श्रीगोविंदप्रभू यांच्याच संदर्भात. महानुभावियांच्या या दोन कृष्णांच्या मूर्तींचे शब्दरूप मात्र लीळाचरित्रात अनेकदा पाहावयास मिळते.

*श्रीचक्रधरमूर्तिवर्णन :*

**गौर श्रीमुर्ति : लांब कान : विसाळ नेत्रः** त्यांच्या शरिरावर काट्यांचे ओरखडे निघून जेव्हा रक्ताचे थेंब आले तेव्हा त्या '**चांपेगौर**' मूर्तीवर '**असुधाचे बिंदु······पन्हरेयावरि मानकुली मिरवति**' तैसे शोभले.

*श्रीगोविंदप्रभूंचे मूर्तिदर्शन :*

'**नाभिचुंबित खाड : मोकळे केस कळाप : मोकळा कासोटा : उतरासंगीं धोत्र : हास्य करीत टाळी वात : गगन अवलोकित : खाडवी चुरीत : श्याम श्रीमूर्ति असे श्रीप्रभु...**'

*मंदिरातील महालसेचे नेटके वर्णन :*

**'पाटाउं साउला नेसली असे : पाटाउं चोळी : काकणें : कळावियां : सोनयांचीं तानवडें : भवंरिया भांगु : टीळा : नाकीं मोतीं :'**
(हा वस्तुतः वस्त्रालंकारांचाच तपशील होय;)

क्वचित अद्भुत-भयानक अशा व्यक्तीचे किंवा भूतपिशाचाचे वर्णन येते.

*जमदूतांचे (=यमदूताचे) वर्णन :*

**गुंजावर्ण डोळे : वावर झोंटि : हातीं मुद्गलु :' (पूर्वार्ध-ली. ५)**

*विरक्त मुक्ताबाईचे वर्णन :*

**'पाहाळीं गेलीं लोंव : चुंभळीं वळीलीं नखें : भुइं काढती जटै : मूक्ताबाई असें नांव :'**

छर्दोबा हा विरक्त पुरुष होता. पुढे तो परत प्रपंचात पडला. संसारी 'छर्दोबा'चे ध्यान नेमके उभे केले आहे—

**'छर्दोबा : डोइंए पाळणा : कडिए लेंकरू : पासि सेळी : तैसीये परीची स्त्री : ऐसे वाटा जाताति :'**

लीळाचरित्रात व्यक्तिरूपचित्रणे ही अशी आणि एवढीच; आणखी क्वचित कोठे आढळतात ती यांहूनही त्रोटक. या वर्णनातही भयानक पुरुषाचे वर्णन दोन-तीनदा आलेले दिसते; त्यांतील शब्दयोजनेत ही तोच-तो-पणा आहे. तेव्हा यादवकालीन मराठी बोलीभाषेत काही वर्णनसंकेत रूढ झालेले असावेत असे अनुमान काढता येते.[१]

(इ) *स्थिति-गति-कृति-चित्रे :*

लीळाचरित्रकार म्हाइंभट ह्यांना व्यक्तींच्या शरीरव्यापारांचे, हालचालींचे, त्यांच्या कृतींचे हुबेहूब चित्रण करण्याची मात्र खरी हौस आहे. हौस म्हणण्यापेक्षा ती त्यांच्या लेखणीची सहजशक्ती आहे, प्रकृती आहे, हे म्हणणेच अधिक योग्य होईल. कितीतरी छोटी छोटी **क्षणचित्रे** (snap-shots) ते आपल्या शब्दग्राहकाने (word-camera ने) प्रतिमित करून घेतात.

---

१ 'तुटकीं ऐसी वाज : फाटकी ऐसी वाकळ' हा वाक्प्रयोगही लीळाचरित्रात पुनरावृत्त झालेला आहे.

अशी शेकडो कृतिचित्रे, गतिचित्रे, स्थितिचित्रे लीळाचरित्रातील लीळालीळांतून दिसून येतात. श्रीचक्रधर दिसतात, ते '**श्रीकंठी गळदंडा : आंगिएचे मोकळे केस : भोग नारायणाचियें आश्रयें कोनीं वोतपली** (=उन्हाची तिरीप) **घेत उभे असती :**' अशा अवस्थेत. हरिभट येतात ते '**गंगेकडौनि : हातीं तांबवटी : तांबुवटीये उदक : तुळसी**' असे शुचिर्भूत होऊन.

(ई) *कृतिचित्रे :*

कमालीचा दृश्य-गुण असणारे एक कृतिचित्र पाहू—गोसावियांनी श्रीपरमेश्वरपुराहून आणलेल्या वस्त्राचा प्रसाद कसा नमस्करून घेतला त्याचे वर्णन—

'**(गोसावी) म्हणीतलें : बाई परमेश्वरपुरूनि वस्त्र आणिलें असे : तें आणा आरूतें : बाइसीं वस्त्र आणिलें : गोसावीयाचां श्रीकरीं वोळगवीलें : गोसावी दोहीं श्रीकरीं घेतलें : नमस्करिलें : श्रीमुकुटावर ठेविलें : उकलिलें : उजवी वृथि घातली : यरीवानी करूनि डावी वृथि घातली : उजवी पालखती घातली : डावि पालखती घातली : मग दुणें केलें : चौगुणें केलें : मग या श्रीचरणावरि ठेविलें : या श्रीचरणावरि ठेविलें : डावेया गुडघेया खालि घातलें : उजवेया गुडघेया खालि घातलें : डाविए जानुवरी ठेविलें : उजविए जानुवरी ठेविलें : या कोपराचिए सांदीं घातलें : या कोपराचिए सांदीं घातलें : ये कर्णयुगुळीं धरिलें : ये कर्णयुगुळीं धरिलें : मग नमस्करिलें : एक एका अवयेवाचा संबंधु देति तेवीचि तेयाची वास पाहाति :**'

हे एका व्यक्तीच्या कृतीचे प्रतिबिंबात्मक चित्रण झाले. जलद गतीच्या छायाग्राहकानें घेतलेली ही धावती, बदलती चित्रांची मालिकाच आहे.

(उ) *शरीरविकारचित्र :*

विषप्रयोगाने शरीरावर झालेल्या विकारांचे वर्णन—श्रीचक्रधरांचा उत्कर्ष सहन न होऊन त्यांना विषारी सुपारी देण्यात आली. '**तिसरेया तांबुळाची फोडी भागवतां दीधली : तथा चांगदेवो भटीं तेंही तोंडीं घातलीं : तेयांसी हटाट्टुनि जरू आला : बाइसीं एकांतीं पुसीलें : तें इषित कपोळीं स्वेदबींदु आले : श्रीमूर्ती घामैली : नेत्र आलोहीत झाले : वांति स्वीकरिली : श्रीमूर्तीवरि अणियां अणियां पेसीया**

**आलिया : सर्वेंं म्हणीतले : बाइ : एथ वीषप्रळो जाला.'** किती जसेच्या तसे (Graphic) चित्र आहे हे!

(ऊ) *व्यक्तिसमूहाचे चित्रण*

वेरूळच्या लेण्यात चांगदेव भटास दिसलेल्या एका दृश्याचे चित्रणः—
**'चांगदेवो भटाते : काटबसिये पाठवीले : लेणेयांकडे जा : गेले : तवं आडवी तिडवी पडलीं देखिलीं : एकीकडे एकाचे पाय : एकीकडे एकाचीया डोईया : ऐसी पासली पडलीं असति : डोले मिलमिलवीत : वोठ फुलफुलवीत : आणि भीयाले :'**[1]

लीळाचरित्रात जी स्थल–काल वर्णने, व्यक्तिदर्शने आणि त्यांची शारीरिक कृतींची चित्रे येतात, त्यांचे थोडेसे दिग्दर्शन वर केले आहे. हे सारे येते ते सहजगत्या निवेदनाच्या ओघाने. लीळाचरित्रात प्रसंगचित्रण आणि व्यक्तिचित्रण असे अलग प्रकार नाहीतच. प्रसंग आणि व्यक्ती एकदमच अभिन्नपणे येतात. स्थल-कालाचाही असा वेगळा थाट नाही. व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक दर्शनाचाही सहेतुक खटाटोप नाही. हे सारे एकजीव होऊन येते; अनतिविस्ताराने! जी घटना घडते अथवा कृती घडते त्याच्या चित्रणाकडे सर्व लक्ष. त्यांतून तत्त्वनिष्कर्ष निघाला तर तो मुद्दाम काढण्याकडे प्रवृत्ती नाही. श्रीचक्रधरांची 'स्मृती' सांगणे हेच खरे प्रयोजन, आणि ती 'शुद्ध' रूपात ग्रथित करणे, हीच खरी एकमेव दक्षता!

## ४

## *लीळाचरित्र लेखनातील 'संवादरचना'*

'संवाद' हेच प्रारंभीच्या गद्याचे जणू प्रधान माध्यम बनलेले दिसते. कोणीतरी कोणास भेटतो, बोलतो, चर्चा करतो, हास्यविनोद होतो. कथा पुढे

---

१ 'पूर्वार्ध' भा० ३ मध्ये 'नगरशृंगार' (पृ. २३), शंकरदर्शन (पृ. १५), अनंतदेववर्णन–(पृ. २८), देवतावर्णन (पृ. ३९, ५७), गोपाळभोजन (पृ. ४३), गोविंदप्रभूंचे पोट शेकणे, (पृ. ५५), रंगमालिका (पृ. ६०-६१) जोमाईचे नृत्य (पृ. २६) हे भाग या संदर्भात पाहावेत.

जाते; व्यक्तिमनोदर्शन होते. उपनिषदात अशाच संवाद-कथा आहेत. जातक-कथा, हितोपदेश, पंचतंत्र ही संवादाच्याच प्रधान माध्यमातून आपला आशय आकारीत जातात. संथ निवेदनापेक्षा पात्रांच्या झपाटेदार संवादाने, भावना आणि विचार, यांसह प्रसंग एकदम सजीव होतो. लीळाचरित्राच्या लेखन-शैलीत या संवादांमुळे 'कथानाट्य' अवतरते. या एकेका लीळेला पूर्ण संवादरूप देणे अगदी शक्य आहे; आणि असे संपूर्ण 'संवादरूप–लीळाचरित्र' म्हणजे एक चलच्चित्रपट–संवादच होईल. लीळाचरित्राचे बरेचसे मनोहारित्व या संवादशैलीत असल्याचे आढळेल.

'संवाद' हे लीळाचरित्रात व्यक्तिस्वभावदर्शनाचे एक सुंदर माध्यम झालेले आहे. व्यक्तींचे स्वभावदर्शन बालबोध निवेदनपद्धतीने येथे घडत नाही; तर ते संवादातून प्रतिबिंबित होते. ज्या दोन व्यक्तींमध्ये हा संवाद चालतो त्यांच्या-तील भावबंध, तसेच ज्या मनःस्थितीत (Mood मध्ये) आणि ज्या विषया-संबंधी हा संवाद चालतो, त्यास अनुसरून त्या त्या ठिकाणी त्यांना शब्द, वाक्ये आणि त्यांची गती लाभलेली दिसते. श्रीचक्रधरांचे, त्यांच्या गुरूंचे, त्यांच्या शिष्यमंडळाचे आणि भक्तजनांचे मनोविकार अतिसूक्ष्मपणे या संवादात जणू मुद्रित झाले आहेत. श्रीचक्रधरांच्या 'जीवननाट्या'चा त्यात सुंदर विलास झाला आहे. हे संवाद इतके विविध आणि वैचित्र्यपूर्ण आहेत की त्यांची उदाहरणे देणे म्हणजे बहुतेक सारे 'लीळाचरित्र'च उतरवून काढणे होय. अगदी अलीकडील मराठी कादंबरीत, विशेषतः श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबरीत 'संवादरचने'ला जे स्थान प्राप्त झाले आहे, आणि त्यामुळे कादंबरीतील प्रसंग, घटना, व्यक्ति-दर्शन, भावचित्रण यांना जो जिवंतपणा आणि वास्तव नाट्यसौंदर्य लाभले आहे त्याची येथे आठवण होते. लीळाचरित्रांतील संवाद हे अधिक सहज, अकृत्रिम (un-articulate) आणि बहुसंख्य आहेत. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृति-चित्रां'शी 'लीळाचरित्रा'ची याबाबत तुलना करता येण्यासारखी आहे. 'लीळाचरित्र' म्हणजे श्रीचक्रधरांच्या अनेकांच्यांशी गाठी–भेटी, वार्ता–चर्चा, थट्टा–विनोद! यामुळे 'संवाद' हेच याच्या चित्रणाला अगदी अनुरूप, स्वाभाविक असे माध्यम होय, यात शंका नाही!

'लीळां'मधून येणाऱ्या संवादात भाग घेणाऱ्या व्यक्तींत श्रीचक्रधर ही एक जणू कायमची व्यक्ती आहे. पूर्ववृत्तकथनाच्या आणि तत्त्वनिरूपणाच्या वेळी

श्रीचक्रधर थोडे विस्ताराने बोलतात, एरव्ही ते एखाददुसरे वाक्य उद्गारतात. त्यांचे बोलणे चतुर, मार्मिक आणि नेमके असते; त्यात कधी विनोदवृत्ती चमकून जाते. शिष्याशिष्यांतील संवादात भाषेची, आणि मनोवृत्तीची ही उंची टिकलेली दिसत नाही. त्यांचे सात्त्विक (?) हेवेदावे, राग–लोभ काही संवादांतून प्रकट होतात. त्यावेळी त्यात 'सिवियां'ना (शिव्यांना) सहज प्रवेश मिळू शकतो. या संवादांतून येणारी संबोधनार्थी अव्यये आणि नामरूपे, यामुळे संवाद 'प्रवाही' वाटतो; त्यात 'आपुलकी', 'जिव्हाळा', 'जवळीक' जाणवते. काही उद्गारके आणि उद्गारवाचक वाक्ये त्यांतील 'नाट्याभिनया'ला केवढा वाव आहे, हे दर्शवितात. **'हो कां जी :', 'जी जी :', 'ना : जी :', 'बाइ आतां तें न ये हो : । तथा तें आतां गेलें हो : ।', 'हें घेया डखले या :'** इ०...प्रश्नार्थक, संमतिदर्शक, नकारार्थी, उद्गारार्थी, संबोधनार्थी अशी कितीतरी उद्गारके येतात, आणि संवादाला जिवंतपणा आणतात. यामुळे संवादाला 'संवादरूप' तर येतेच, पण तो 'गतिमान' होतो. अस्सल, स्वाभाविक, गतिमान, वास्तव, सरळ संवाद हे ह्या गद्यशैलीचे फार मोठे सामर्थ्य आहे.

या प्रकरणात आलेल्या विविध वाङ्मय–रूपांचे वर्गीकरण आणि पृथक्करपुढीलप्रमाणे करता येईल.

**(१) वृत्तलेखन**

(१) केवळ नोंद (२) वैशिष्ट्यहीन घटनेचे वृत्त (३) वैशिष्ट्यपूर्ण घटनेचे वृत्त

**(२) प्रसंगचित्रण**

लघुप्रसंगचित्रण

दीर्घप्रसंगचित्रण

अनतिदीर्घ

सुदीर्घ

(१) दृष्टिगोचर (२) श्रवणगोचर (३) दृष्टि-श्रवण-गोचर (४) गतिमान

(५) तपशीलरूप

### (३) कथाकथन

(१) कथारूप लीळा (२) कथारूप दृष्टान्त (३) वास्तवदर्शी कथा

[या कथांचे वर्गीकरण (१) सत्यकथा आणि (२) कल्पित कथा असेही करता येईल; तसेच नीतिकथा (बोधकथा, तात्पर्यकथा), अद्‌भुतरम्य कथा, परंपरागत कथा असेही करणे शक्य होईल. असा विचार स्वतंत्रपणे 'आद्य मराठी गद्य–कथा' या पुस्तकात करण्यात येत आहे.]

### (४) तत्त्वनिरूपण

प्रस्तुत पुस्तकात या विषयाच्या विवेचनात पुढील गोष्टींचा विचार करण्यात आला आहे—

(१) 'सूत्र'लक्षण—ली० च० मधील काही सूत्रे—त्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन.

(२) ली० च० मधील सूत्रांचा उगम—प्रसंग. सूत्र आणि दृष्टान्त यांतील परस्पर संबंध.

(३) **सूत्र स्पष्टीकरणाच्या पद्धती.**

केवळ अर्थविवरणात्मक — केवळ दृष्टान्तकथनात्मक

केवळ दृष्टान्तकथनात्मक:

(१) सरळ, साधे दृष्टान्त (२) प्रसंग कल्पून आलेले दृष्टान्त
(३) संपूर्ण गोष्टीरूपाने येणारे दृष्टान्त (४) दृष्टान्तसमूह

(४) सूत्रे आणि दृष्टान्त यांतील भाषाभेद

['येन दृष्टःप्रमेयस्यान्तः तं दृष्टान्तं प्रचक्षते' या सूत्रानुरूप दृष्टान्तांचे 'प्रमेयदृष्ट्या वर्गीकरण' करून अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. पण येथे वाङ्मय-रूप-दृष्ट्या अभ्यास अभिप्रेत असल्याने तसे वर्गीकरण-विवेचन केलेले नाही.]

प्रकरण चवथे

# लीळाचरित्र–वाक्यविचार आणि भाषाशैली

**वाक्यविचार–**

- ली० च० लेखनात मुख्यत्वे ‘शुद्ध’ वाक्यांचा वापर–शुद्ध वाक्यातील पदक्रम आजच्याचप्रमाणे–मिश्र व संयुक्त वाक्यांचा आढळ–त्यांचे स्वरूप आणि उपयोजना.

**लेखनातील पुनरावृत्तीचा विचार–**

- पुनरावृत्ती आशयात नव्हे, तर ‘शब्द’, ‘वाक्ये’ यांत–निवेदनातील ‘संवाद’रूपात–
- उपयोजना–महत्त्वाच्या गोष्टीवर भर देणे–भिन्न संदर्भात–निवेदनातील विशिष्ट गती आणि ताल यांचा सांभाळ–प्रवाहित्व–
- पुनरावृत्तीचे स्वरूप–अनेक समानार्थक शब्द–‘सर्वज्ञा’संबंधी सर्वनाम न योजणे–शुद्ध वाक्यरचनेचाच प्रायः अवलंब–दामयमकसदृश रचना–अनुवादात्मक रचना–विशेषत्व दर्शविण्यासाठी द्विरुक्ती–प्रत्यक्षाभिनयपद्धती–दैनंदिन नित्य आचारांचीही नोंद करण्याचा कटाक्ष–

**आणखी काही वैशिष्ट्ये–**

–क्रियापदांची चढतीश्रेणी; त्यातील सयमकत्व–अमूर्ताचे मूर्तीकरण–ध्वन्यनुसारी शब्दयोजना–प्रश्नार्थक, संक्षिप्त आणि संकुचित वाक्यांचा परिणामकारक उपयोग–

- श्रीचक्रधरांची भाषा–

  –रूपकात्मक–टोपणनावे देतानाही हीच रूपकातिशयोक्ती–धातुरूपके (Verb-Metaphors)–म्हणी–सूत्रे–विचाराची स्पष्टता, स्वच्छता–संस्कृत, हिंदी, गुजराती यांचा वापर–काही पदे–व्यक्तित्वदर्शन–

- ली० च० मधील काही विशेष ‘शब्द’संपत्ति–

# लीळाचरित्र–वाक्यविचार आणि भाषाशैली

## १

## *लीळाचरित्रातील वाक्यरचना : प्रकार आणि पद्धती*

लीळाचरित्र हे मराठीतील आद्य ग्रंथरूप गद्य होय. हे गद्य मूलतः 'शुद्ध' अथवा 'केवल' अशा वाक्यांचे आहे. ही वाक्येही अगदी आखूड अशीच आहेत. उदा०–'**देव व्हो : एथ न वचा : न वचाः एथ वाघु असे**' : **गोसावी आइकौनि बीजें केलें : तवं तेथ वाघु आला होता : तेणें हाक दीधली : गोसावी सींहनादु केला : मग तो वाघु पळाला : वाघु तेथौनि गेला : गोसावी तेथ पहुडले**' (ए० ली० १७) या वाक्यांतून कर्ता आणि क्रियापद, क्वचित कर्म, तर क्वचित स्थल वा काळदर्शक क्रियाविशेषणअव्यय अशी दोन किंवा तीन पदे येतात. अशा वाक्यांच्या मालिकांच्या मालिका लीळाचरित्राच्या गद्यरचनेत आढळतात. ही छोटी धावती वाक्ये ही या गद्याची मूळ प्रकृती.

या शुद्ध वाक्यात मधून मधून दीर्घ वाक्ये येतात. उदा०–'**डांकग्रामीं पाणीपात्र करूनि पहुडावेया भिवेश्वराचेया देउळा बीजें करीत होतें :** (ए० ली० १७)

'**मग अवघा भक्तजनीं चौरंगावरि बरवें गोसावीयांसि आसन घातलेंः**' (उत्त० ली० ३०२) '**लोकांसी आश्चर्यें दाखवावें म्हणौनि घुटिका तोंडी घालुनि उत्पवन केलेंः**' (ए० ली० ४७)

'**पुत्राचेया चाडा आपुली वडील स्त्री सेवा करावेया (ठाकुरें) पाठविलीः**' (ए० ली० ४४)

**'गोसावी श्रीकरीं गहुवाचिया काडीया दोणि घेउनि निश्चळ बैसले असति :** (ए० ली० ३९)

**'भांडारेकाराचेया पासि उचें बरवीं पुजाद्रव्यें आणौनि पुजा करूं आदरीली:'** (ए० ली० ३०)

**'तवं अवधूत एकू नगरामध्यें भिक्षेसि रीगाला:'** (ए० ली० १६)

**'तो वेऱ्हारा गोसावीयांतें गोत्रां कुटुंबातें दाखवावेया घेउनि गेला:'** (ए० ली०१६)

**'अंध्रदेशीं एकाकी असता एकी गावीं तेलीया एकाचेया घरा : पाहानपटीं बीजें केलें:'** (ए० ली० ११)

**'आपणेया आपण बोलत रांधवणाची घरीं तिहीं पदार्थांसीं खेळ करीत असति :'** (ए० ली० ८)

**'तिए समई गुजरातेचेया प्रधानाचेया कूमराचें देह गेलें:'** (ए० ली० ४)

**'फलेठाणी कऱ्हाडेया ब्राह्मणाचां घरीं अवतारू स्वीकरिला:'** (ए० ली० १)

या वाक्यांतून आपणांस असे दिसून येते की, त्यांतील पदयोजनेला काही एक विशिष्ट क्रम आहे. स्थल–काल–दर्शक पदे (म्हणजे सप्तम्यन्त पदे) ही वाक्यारंभी येतात; नंतर कर्ता (प्रथमान्त पद), मग असल्यास करणदर्शक पद (तृतीयान्त), पुढे अनुक्रमे गौणकर्म (चतुर्थ्यंत) आणि प्रधानकर्म (द्वितीयान्त) असा पदक्रम दिसतो; वाक्यान्ती क्रियापद येते. पंचमीचे रूप क्रियापदाच्या आधी येते. [उदा.–**साधीतें एथौनिचि नेहजैल कीं**: (ए. ली. २९–३०)]. सामान्यतः आजच्या मराठीतील शुद्ध वाक्याची मूळ रचना (Standard construction and syntax) अशीच आहे. प्रसंगपरत्वे या पदक्रमात थोडाफार फरक पडतो, पण ते आजही होतेच. संबोधने प्रायः वाक्यारंभी आलेली दिसतात. कधी विशेष्याआधी, तर कधी विशेष्यानंतर विशेषणपद येते. पण विशेषणपदसमूह मात्र बव्हंशी विशेष्याआधी येतो. उदा. '**कऱ्हाडेया ब्राह्मणाचां घरीं**'; '**गुजरातेचेया प्रधानाचेया कूमराचें...**'

पण अशी ही दीर्घ शुद्ध वाक्ये लीळाचरित्रामध्ये एखाद्या ओळींत क्वचितच आलेली दिसतात. पण दृष्टांतपाठातील कथारूप दृष्टान्त, तसेच एकांकमधील

कथारूप निवेदन आणि उत्तरार्धामधील काही दीर्घ निवेदने यात या अशा दीर्घ केवल वाक्यांचा अधिक आढळ होतो. कारण तेथे संथ कथनाला योग्य असाच मूळ आशय असतो.

लीळाचरित्रातील गद्याचे स्वरूप बोलीचे असल्याने त्यातील वाक्यातील पदक्रम पुष्कळदा बोली–पद्धतीचे आढळतात. उदा० '**हा घोडा अमुकीये जातीचा : अमूका गुण : अमूकें लक्षण :**' किंवा, '**गोसावी तयाचे गुणधर्म स्वीकरीलें: गोपाळमंत्री दीक्षा : गोपाळण्ही आण : जोआंचें व्यसन : राणियेचा पढीयावो : हरिपाळ नांव :**' म्हणजे मुख्य वाक्य (कर्ता कर्म क्रियापद) आधी झटकन सांगायचे आणि नंतर कर्माचा तपशील एकेक, एकेक, असा देत राहायचे; ह्याने सुटेपणाने तपशील समजतो व तो मनात भरतो.

## *वाक्यरचना आणि वाक्यप्रकार*

लीळाचरित्रांतील गद्य मुख्यत्वे 'शुद्ध' वाक्यात्मक आहे; ही शुद्ध वाक्ये कर्ता, कर्म आणि क्रियापद या तीन पदांनी नेहमीच युक्त असतात असेही नाही; ती संक्षिप्तरूपातही आढळतात.

'**तो देसू पारका**' '**गावी एकी वीहीरीसि आसन :**' अशासारखी संक्षिप्त वाक्ये मधून मधून येतात; पण संक्षिप्त वाक्ये खरी येतात ती 'सूत्र'-वाङ्मयात; कारण अल्पाक्षरत्व हेच त्याचे मूळ लक्षण. '**स्वदेश संबंधु त्याज्य : संबंधियांचा संबंधु तो विशेषता त्याज्य :**', इत्यादी सूत्रांचे रूप असे संक्षिप्त वाक्यात्मक आहे.

ही शुद्ध वाक्ये कधी कधी 'संकुचित' स्वरूपातही येतात. उदा० '**नावडतीएचा ठाइं अन्न वस्त्र अलंकार न्हाणें जेवणें हासणें खेळणें असें :**' येथे अनेक कर्मे (वस्तुतः पूरके) आहेत. याच वाक्यापुढे 'परि आपणपें नेदी' असे दुसरे वाक्य जोडून येते, आणि मग ही दोन्ही वाक्ये मिळून एक 'संयुक्त वाक्य' होते. लीळाचरित्रात संयुक्तवाक्ये येतात, पण ती अत्यल्पसंख्य आहेत. '**स्त्रीएचेनि दर्शनें स्पर्शनें संभापणें पोरू धर्मापासौनि गेला**' हे वाक्य 'संकुचित' असून 'संयुक्त' ही आहे. '**बाइ, पाप तरि नव्हे परि अविधी होए;**' किंवा '**साकर होइजे तें नीकें कीं साकर अनुभवीजे**

**ते नीकें'** हे प्रश्नार्थक वाक्य जातीने 'संयुक्त' आहे. जी 'संयुक्तवाक्ये आढळतात त्यांतील दोन वाक्यांत बहुधा विकल्प' किंवा 'न्यूनाधिक्य भाव' असतो. क्वचित् '**लोकांसी आश्चर्यें दाखवावें म्हणौनि घुटिका तोंडी घालुनि उत्पवन केलें,**' अशा वाक्यात उद्देशबोधकता येते.

'मिश्र' वाक्येही लीळाचरित्रातील गद्यलेखनात आहेत. संयुक्तवाक्यांच्याहून मिश्रवाक्यांची संख्या बरीच अधिक आहे. अर्थात् शुद्ध किंवा केवल वाक्यांच्या मानाने ती काहीच नाही. मिश्रवाक्ये जी येतात ती 'भणीतलें', 'म्हणीतलें" 'पुसीलें', 'सांघीतलें', अशा तऱ्हेच्या मुख्यवाक्यातील क्रियापदाची 'कर्मे', म्हणून येणाऱ्या गौणवाक्यांनी सिद्ध झालेलीच बहुशः आढळतात. पण या व्यतिरिक्तही मिश्रवाक्ये पाहावयास मिळतात. '**जवं जवं स्तुति करीति तवं तवं व्यथा काढली :**' '**तो जेयाचिए पाठीवरि बैसे तेयासि सूख होए:**' '**लपवीले होते ते आवघेही निघाले**' : '**आगा या वाटा जासी तरि चोरीं नागवीजसि :**' **विखो न सेवी तरि जीउ काइ गा मरत असे:**' या मिश्रवाक्यांतून कोठे विशेषणगौणवाक्ये तर कोठे क्रियाविशेषण-गौण-वाक्ये आली आहेत आणि त्यांची प्रयोजनेही विविध (संकेतदर्शी, परिणामदर्शी इ०) अशी आहेत. मिश्रवाक्यांचे प्रमाण अगदी कमी असले तरी पहिल्या लीळालेखनापासून त्यांचा आढळ होतो. '**जवं लोकू द्वारावतीए जाए तवं गोसावी तेथ होते**' (ए० ली० १) '**तुमचे दीधलेया विण : हे आरोगण करी : तरी गोपाळणही आन**' (ए० ली० ६)...येथपासून ते अगदी उपान्त्य आणि अन्त्य 'लीळे' पर्यंत 'मिश्र' आणि 'संयुक्त' वाक्ये पाहावयास मिळतात. '**आइकिलें तें साच : कीं देखिलें तें साच :**' (उत्त०—उपान्त्य ली० ५०५) "**आतां असंनिधानीं सर्वज्ञें म्हणीतलें तें करावें : आणि षड्विध दुख जो करिल तेयासि गोसावी भेटि देतील :**" हें लीळाचरित्राचे अगदी शेवटचे वाक्य आहे, आणि ते तर 'संमिश्र' (mixed) आहे, कारण यात दोन प्रधानवाक्ये समुच्चयबोधक 'आणि' या उभयान्वयी अव्ययाने जोडली आहेत, आणि ही दोन प्रधानवाक्ये अलगपणे 'मिश्र' वाक्ये (प्रत्येकी एक प्रधान आणि एक विशेषगौणवाक्ययुक्त) आहेत. अर्थात या गद्यातील ही मिश्र किंवा संयुक्तवाक्ये आजच्यासारखी दीर्घ, डौलदार, पल्लेदार नाहीत. त्यांचे रूप मुख्यतः छोट्याछोट्या, साध्या वाक्यांचें असेच जाणवते.

लीळाचरित्रातील गद्य ज्या वाक्यांचे मिळून बनले आहे, त्यांची येथे व्याकरण-दृष्ट्या चिकित्सा केली तरी त्यामागील हेतू वाङ्मयीन आहे; आणि तो म्हणजे हा की, भाषेचे प्रगल्भ आणि परिणत साधन हाताशी नसतानाही, प्राधान्याने शुद्ध आणि प्राथमिक स्वरूपाच्या वाक्यांच्या साहाय्याने लेखनाला किती चित्रात्मकता येऊ शकते, ते स्पष्ट व्हावे. मराठीतील उपलब्ध अशा प्रारंभीच्या गद्यग्रंथातील वाक्यरचना ही प्राथमिक वाटली, तरी ती कच्ची नाही. हा हात गद्यलेखनाला 'नवखा' नसून अगदी 'तयार,' 'कसलेला' असा वाटतो. जे जे तिला सांगावयाचे होते–मग तो विचार असो, वा विकार असो, व्यक्तिदर्शन असो वा प्रसंगचित्रण असो, केवळ नोंद असो अथवा कथा असो, ही वाक्य-रचना कोठेच अपुरी पडल्याचे दिसत नाही; अडखळल्यासारखी किंवा बुजल्या-सारखी जाणवत नाही. उलट अतिशय सहजपणे ती बोलत जाते आणि इकडे चित्र उमटू लागते. साऱ्या रंगानिशी जिवंत आणि ठसठशीत असे चित्र निर्माण होते. लीळाचरित्रात एकामागून एक सारखी किती शब्दचित्रे, किती स्वभावो-क्तीची स्थळे येऊन जातात, ते सांगवत नाही. 'लीळाचरित्रा'ला 'लीळाचित्रे' म्हणावे, असेच वाटते. 'स्वभावोक्ती' अलंकाराचा अर्थ थोडा सैल आणि व्यापक केला तर सर्वच्या सर्व लीळाचरित्र हे त्याचे एक व्यापक, विस्तृत, सलग, सुंदर उदाहरण ठरेल; आणि त्यातील छोटी, धावती गद्यवाक्ये (शुद्ध, मिश्र किंवा संयुक्त असली तरीही) आपल्या मूळ शुद्ध रूपामुळे (Primitive Purity) आणि अनलंकृततेमुळेच 'स्वभावोक्ती' अलंकार अधिक आकर्षक आणि परिणामकारक करीत आहेत, असे प्रत्ययास येते.

## १

## शैलीतील 'पुनरावृत्ती'चे स्वरूप आणि कारणे

प्राथमिक अवस्थेतील गद्यलेखनात वाक्यांची पुनरावृत्ती–एकेका वाक्याची किंवा वाक्यसमूहाची पुनरावृत्ती–होत असल्याचे नेहमीच पाहावयास मिळते. बालवाचनाच्या प्राथमिक पुस्तकातील गद्यामध्ये अशी वाक्यपुनरुक्ती जी आढळते ती पुनरुच्चाराने (Drilling) ती वाक्यरचना मुलांच्या तोंडी सहज बसावी, या हेतूने. लीळाचरित्रातील या पुनरुक्तीमागे हा हेतू नाही, हे उघडच आहे. जे जे घडले ते ते सर्व, ओळीने, आहे तसे सांगण्याच्या, पद्धतीमुळे ही

पुनरुक्ती होते. कोठे कोठे ही पुनरावृत्ती कंटाळवाणीही वाटते. पण 'पराजित–मठ–प्रतिष्ठा' (ए०–ली. ५२) या लीळेतील '**मठापत्यें : पूस्तक : भांडार : तयासि जाले : मळा : वाडु : वृत्ति : हे हे अवघे तेयासि जाले :**' येथे वाक्याची पुनरुक्ती होते ती 'त्याचे सर्वस्वापहरण झाले,' या गोष्टीवर वाचकाचे चित्त वेधून घेण्यासाठी! ध्रुवपदासारखे हे वाक्य जणू कार्य याच दृष्टीने 'डुळकैलेया बाळकाचा' दृष्टान्त (द०पा०–४४) मधील पुनरावृत्त करते. वाक्यांकडे पाहता येईल. पण हे क्वचितच. बहुधा प्रसंग, व्यक्ती आणि त्यातील जीवनांश यांच्या वेगळेपणामुळे आणि जिवंतपणामुळे ही पुनरावृत्त वाक्ये त्या त्या कथेत, लीळेत अथवा प्रसंगचित्रणात एक विशिष्ट गती किंवा लय (Periodic rhythm) निर्माण करतात. उपनिषदे किंवा जातककथा यात अशीच पुनरावृत्त वाक्ये येतात, आणि ती त्या गद्याचा प्रभाव वाढवितात. ज्या लेखनाला 'वक्तृत्वगुण' आहे, त्या लेखनात अशी वाक्ये हटकून येतात. प्रवाहीपणा आणि वक्त्याचा रोख (emphasis) त्याने दृष्टोत्पत्तीस येतो. 'न वाऽरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति। आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति। इ०......' या वाक्ययोजनेच्या रीतीचा या संदर्भात विचार करून पाहणे उपकारक ठरेल.

लीळाचरित्रांतील भाषा प्रवाही आहे; कारण तिचे स्वरूप ग्रांथिक नाही, बोलीचे आहे. बोलताना समानार्थी शब्द एकत्र, एकदम येऊन जातात; त्याने परिणाम साधतो, ओघ येतो. श्रीचक्रधर बोणेबाईंना सांगतात की ओझे काही घेऊ नका; कारण '**मार्गी** काइ मिळैल : **वाटे** मीळैल.' या पुनरावृत्तीने मनातील अभिप्रायही दृढपणे व्यक्त होतो. पाईकपरिवार, पालापाणी, हिरडा-बेहडा यांसारखे सामासिक शब्द; आंगी–टोपरे, गोरा-गोमटा, पुड-वाटवा यांसारखे जोडशब्द; किंवा खडे-खूबटे, वाडो-वाडी यांसारखे द्विरुक्तिवाचक शब्द, निवेदनाचे बोलीरूप, म्हणजे बोलीचे प्रवाहित्वच स्पष्ट करतात. अशा शब्दांचा भरपूर वापर 'लीळाचरित्रा'तील गद्याने केला आहे.

'लीळाचरित्रा'तील गद्याचा, एकदा नाम येऊन गेल्यावर त्याच्या जागी सर्वनाम वापरण्याकडे नित्य कल दिसत नाही; त्यामुळेही पुनरावृत्ती जाणवते. श्रीचक्रधरांचा उल्लेख तर क्वचितच सर्वनामाने केला जातो. 'गोसावी,' 'सर्वज्ञ' अशी नामेच उपयोगिली जातात ...'**पिंपळातळिं गोसाविया आसन.. येकू**

**ब्राह्मणु...तेणें येतां गोसावीयांतें देखिलें :...आरोगणे गोसावींयांतें वीनवीलें : गोसावी तेयाचेया घरा बीजें केलें :**'...मात्र प्रत्येक वाक्यात येणारी 'गोसावी' या शब्दाची पुनरावृत्ती 'गाईला चार पाय असतात. गाईला दोन डोळे असतात. गाईला दोन कान असतात...' अशा तऱ्हेची लेखन-प्रयत्नाची प्रारंभावस्था दाखविणारी नाही. श्रीचक्रधरांसंबंधीच्या परमभक्तीच्या पोटी हे येत असावे. (इंग्रजी लेखनात God शब्दातील 'G' कॅपिटल का, या विचारात याचे उत्तर येऊन जाते.)

लीळाचरित्रातील वाक्ये रचनादृष्ट्या शुद्ध (Simple) आहेत, हे मागे येऊन गेलेच आहे! 'गोविंदस्वामी स्नान, देवपूजा, विष्णुस्वामीस नमस्कार किंवा कोणतेच असले कर्म करीत नाही' असे प्रदीर्घ, अनेक कर्मयुक्त, शुद्ध वाक्य या गद्यात येत नाहीं. '**गोविंदस्वामी स्नान न करीति : देवपुजा न करीति : विष्णुस्वामीसि नमस्कारू न करीति : ऐसें कर्म कांहींचि न करीति :**' अशा सुट्या सुट्या शुद्ध वाक्यांच्या स्वरूपात हे मांडले जाते. यामुळे 'न करीति' या अकरणात्मक क्रियेवर भर दिला जातो; त्याला महत्त्व लाभते. आणि गोविंदस्वामीचे नैष्कर्म्य वाचकांच्या मनावर ठसते. क्वचित् एखादे वेळी अपवाद म्हणूनच, '**देमाइसीं पानें पोफळें केळें नारिएळें दर्शन केलीं**' असे अनेक कर्मयुक्त साधे वाक्य येऊन जाते. कधी कर्ते अनेक असतात, पण कर्म आणि 'क्रियापद' एकच असते; अशावेळी त्या त्या कर्त्याप्रमाणे एकेक वाक्य, सुटे सुटे केले जाते. या पुनरुक्तीने मूळ विषय मनावर ठसविण्याची क्रिया घडू शकते. अर्थात या हेतूने, म्हणजे असा परिणाम साधावा म्हणून जाणीवपूर्वक अशी रचना केली जाते, असे नव्हे. 'शुद्धवाक्यरचना' हीच तत्कालीन गद्याची प्रकृती होती.

'एथचि नीद्रा **कीजे : कीजे** सुखें संतोखें' यासारख्या वाक्यात क्रियापदाची पुनरुक्ती रमणीय वाटते, तीत जणू दाम–यमकाचा आनंद लाभतो. आणि 'कीजे सुखें संतोखें' ही मुक्त वाक्यरचना (रूढ Syntax सोडून केलेली) ही 'सुख–संतोष' यावर भर देणारी, म्हणून साभिप्राय वाटते. शिवाय 'सुख–संतोष' या जोडशब्दातील अनुप्रासात्मक अक्षरयोजना ही कर्णसंतर्पण करणारी आहे, हे वेगळेच!

अनेक ठिकाणी, जिला 'अनुवादात्मक रचना' (Translative Con-

struction) असे म्हटले गेले आहे, अशाही रचनेची वाक्ये लीळाचरित्र-गद्यात आढळतात. उदा० '**वायू तथा वारा** म्हणौनि बोखदे करिति' अशा ठिकाणी प्रायः संस्कृत शब्दांचा' प्राकृतात (=मराठीत) अनुवाद केलेला दिसतो. कचित् याउलट '**भूक** न वचे : तथा **तृप्ति** नव्हे' असेही उदाहरण सांपडते.

एखाद्या गोष्टीचे वैशिष्ट्य किंवा क्रियेचे सातत्य दर्शविण्यासाठी शब्दांची पुनरावृत्ती करण्यात येते, हे लक्षण या गद्यातही पहावयास मिळते. 'एकी बाइया **कढती कढती** आंबील हातीं घातलीं,' किंवा 'ते चाटसिएते **व्यापारवीति व्यापारवीति** पाकनिष्पत्ति करी' पण '**वीवरें वीवरें** गोसावी बीजें करिताति' या ठिकाणी 'प्रत्येक विवरांत' अशा अर्थी ही द्विरुक्ती झाली आहे.

वर्णन करताना 'प्रत्यक्षाभिनयपद्धती'चा अवलंब केलेला दिसतो, आणि तेथे शब्दांची पुनरावृत्ती होते. श्रीचक्रधरांच्या छातीवर रात्री दोन साप पडले; तेव्हा त्यांनी '**एणे हातें हा फेडिला : एणें हातें हा फेडीला.**' ही पुनरावृत्ती भिन्नार्थ दर्शविणारी आहे. या एका (समजा, डाव्या) हाताने हा एक साप 'एकडे (डावीकडे) फेकला, आणि या एका (उजव्या) हाताने हा दुसरा साप इकडे (उजवीकडे) फेकला' असा या क्रियेचा अर्थ होतो. झुंजणाऱ्या दोन रेड्यांच्या मध्ये श्रीचक्रधर जाऊन उभे राहाताच '**एकू एसा नीगाला : एकू एसा नीगला :**' याचा अर्थ वरीलप्रमाणेच घ्यावा लागतो.

श्रीचक्रधरांचे 'लीळाचरित्र' 'म्हणजे अगदी नित्यदिनी लीळा' नसले तरी त्यात त्यांच्या 'नित्यदिनीलीळा' वरचेवर येतातच; त्यांचे स्नान, पूजा, आरती, विहरण, जेवण, तांबूलभक्षण, वामकुक्षी इत्यादी गोष्टींची सारखी नोंद या गद्यात येते. अशा वेळी म्हाइंभटांनी दरवेळी मुद्दाम काही वेगवेगळे शब्दप्रयोग किंवा आविष्काराचे नावीन्य स्वीकारलेले नाही; आणि तेच बरे झाले. कारण तसे धोरण शेवटपर्यंत सांभाळणे सर्वथैव अशक्य होते, इतक्या ह्या एकच एक स्वरूपाच्या नोंदी बहुसंख्य आहेत. उलट या आचारांचा तपशील, त्यांतील शब्दांची योजना आणि क्रम इतके ठरीव आहेत की, प्रसंग येताच क्षणार्धात वाचकांना तो सारा आचार नेत्रगोचर होतो. वाचकांच्या ते संवयीचे होऊन जाते. नित्य येणारा हा वर्णनाचा तपशील आहे तोच, साधा सरळ ठेवणे, यातही म्हाइंभटाची अकृत्रिम सत्यनिष्ठाच दिसून येते. नित्य येणारी घटना—'**तेथ गोसावी बीजें केलें : मर्दना दिधली : मादणें जालें : पुजा झाली :**

**धुपार्ति मंगळार्ति केली : ताट करविलें : आरोगणा जाली : गुळळा जाला : वीडा ओळगविला : मग बीढारा बीजें केलें :** ' कधी विड्या-ऐवजी '**पुड वाट्टुवा**' आणि आरोगणेनंतर '**पहुड**' '**उपहुड**' असा प्रकारही येतो. तसेच '**स्तीति झाली : भोगीली : भंगली :**' हाही नित्याचा प्रकार होय.

३. *लेखनशैलीचे आणखी काही विशेष :*

येथवर लीळाचरित्राच्या लेखनशैलीतील पुनरावृत्तीचे स्वरूप, तिच्यामागील कारणे आणि तिचे परिणाम यांचा विचार केला. या लेखनशैलीचे आणखी काही विशेष नजरेत भरतात. '**सर्वज्ञें म्हणीतलें : पाहीजे : पुसीजे : चर्चिजे :**' किंवा '**जि जि : हारविलें असे तें वेचिजो : दीजो : मग खेळिजो :**' अशा प्रकारची 'सार' अलंकारात्मक क्रियापदांची मालिका, चढती श्रेणी या वाक्यरचनेत पुष्कळदा आढळते; यातून आचाराचा क्रमच केवळ व्यक्त होतो असे नव्हे, तर त्या सर्वांनी मिळून होणारा एक पूर्ण–आचार क्षणार्धात ध्यानी येतो. ही क्रियापदे पुनरावृत्त नसली तरी त्यातील उपान्त्य स्वर आणि अन्त्याक्षर समान असल्याने ती सयमक आहेत, त्यामुळे त्याला एक वेगळे ध्वनिरूप लाभले आहे; उच्चारणातील यतिस्थानामुळे (pauses मुळे) त्याला एक ताल प्राप्त झाला आहे.

अमूर्ताचे मूर्तीकरण, अप्रत्यक्षाचे प्रत्यक्षीकरण करण्याचे सामर्थ्य या गद्यात आहे. यासाठी प्रतिमांचा वापर समर्पकतेने केलेला दिसतो. 'त्याच्या मोठया हाडांचे आणि लहान हाडांचे बारीक बारीक तुकडे करा,' हा आशय पुढील-प्रमाणे व्यक्त केला जातो. '**याचें लांब खांड तें मूहुरी एवढें करावें : तथा लाहान खांड तें मूहुरी एवढें करावें :** एका वाक्याची दोन वाक्ये, त्यांतून 'लांब' आणि 'लहान' खांड यातील विरोधदर्शन; पण अखेर क्रिया एकच; ('मुहुरी' ही प्रतिमा) यामुळे येथे आशयाला इंद्रियगोचारता आली आहे. आधी रोप होते, ते वाढले; त्याचा मोठा वृक्ष झाला. तो केवढा? तर '**थोरला वट्ठु होए : जरठु होए : एकु हस्ती वेंझ दीधलेयाही न वचे :**' असे सारे प्रत्यक्षीकरणात्मक वर्णन! ग्रामीण बोलीत आणि बखरगद्यात आपणांस वाणीचा हा गुण प्रकर्षाने आढळतो.

वाणीची ही प्रत्यक्षीकरणाची शक्ती ध्वन्यनुसारी शब्दांनी वाढते. '(गोसावी उकीरडीं) **घरघरा घोरे :**' '(बोणेबाई) **लवलव** करूनि भीक्षा घेउनि आली,' 'तवं (वीवरीं) एके ठाइं **भगकारि** उजेड पडिला,' यातील जाड ठशातील शब्दांची अर्थशक्ती स्पष्ट आहे. याच लेखात अन्यत्र अवतरणे म्हणून घेतलेल्या कित्येक वाक्यांत 'ध्वनिचित्रक शब्द' पाहावयास मिळतील. 'उरलीं वस्त्रें तेहीं (गोसावी) कांटीया सोकरीलिया : **फु : भोरडीए**' म्हणोनि :' अशा वाक्यात 'फु : भोरडीए' या उद्‌गारात अभिनय तर आहेच, पण सुंदर 'रूपक'च नव्हे तर रूपकातिशयोक्तीही आहे. वस्त्राच्या धांदोट्या फुंकरून उडविताना जणू त्या भोरड्याच (चिमणे पक्षी) आहेत, असे श्रीचक्रधरांना वाटते.

प्रश्नार्थक वाक्यांनी अभिव्यक्तीमध्ये एक प्रकारचा जोरदारपणा येतो. '**एथ सरण आलेया काइ मरण असे,**' '**बाइ, श्रीकृष्ण काइ मातीएचा : देवकी देवी काइ मातीएची :**' अशा प्रश्नालंकारांतून मूळ अर्थ व्यञ्जित होतो, व त्या व्यञ्जनक्रियेने तो श्रोत्यांच्या मनावर ठसतो.

संक्षित वाक्ये आपल्या आटोपशीरपणामुळे आणि नेमकेपणामुळे मोठी प्रभावी ठरतात. श्रीचक्रधरीय सूत्रांपैकी कितीतरी सूत्रांचे रचनास्वरूप संक्षिप्तवाक्यांचे आहेच. शिवाय '**साळैंचें घर मेणाचें : काउळेयाचें घर सेणाचें**' अशासारखी संक्षित वाक्ये कथानिवेदनातही येतात. '**गदोनायेक चहुंरायाचे भांडारी,** '**कान्हरदेवो आस्तिक : रामदेवो निरपवस**' '**आगा हे अक्षोभ्य उद्क :**' अशी रचनाही लीळाचरित्रकाराला स्वाभाविक आणि सुंदर वाटत असावी. ती परिणामकारक तर आहेच. '**तुटकी पेसी बाज : तियेवरी फाटकी पेसी वाकळ :**' यात 'तुटकी' आणि 'फाटकी' या विशेषण–पदांवर भर दिलेला आहे, वाक्यारंभीच त्यांची योजना करण्यात आल्याने हे स्पष्ट होते. वाक्याच्या संक्षिप्त स्वरूपामुळे आणि तुटकी–फाटकी यांतील नादसाधर्म्यामुळे आणि वाक्यरचनेतील पदांच्या समानक्रमामुळे ही अशी वाक्ये, त्या ब्राह्मणाचे अठराविश्वे दारिद्य्र वाचकांच्या पुढे साक्षात उभे करतात.

'लीळाचरित्र-**लेखन**' असा शब्दप्रयोग आतापर्यंत करण्यात आला आहे, पण वस्तुतः ते 'लीळाचरित्र-**कथन**' आहे. कहाणीचे स्वारस्य हे ती सांगण्यात जसे आहे, तसेच ह्या 'लीळा' सांगण्यातच त्यांची खरी गोडी आहे. छोटी सुटसुटीत वाक्ये, त्यांचे संक्षित रूप, त्यांची तडकगती आणि ठसठशीत रूप;

कथनातील संवादमयता, संवादातील अभिनयानुकूलता, प्रत्यक्ष अभिनयावलंबित वाक्यरचना, ध्वन्यनुसारी शब्दयोजना; सयमक, तालबद्ध अशी शब्दांची स्थापना, वाक्यांची व वाक्यांशांची पुनरावृत्ती हे रचनेचे गुण, लेखनापेक्षा **कथनाशी** अधिक स्वाभाविक वाटतात; आवश्यकही असतात. 'लीळाचरित्र' हा ग्रंथ **पठणा**साठी आहे, हे ध्यानी घेतल्यावर त्यातील पुनरावृत्ती आणि यमकरचना स्मरणास साहाय्यकच ठरते. लीळाचरित्र हा एक बंदिस्त असा ग्रंथ नाही; श्रीचक्रधरांच्या स्वच्छंद जीवनविहाराची घेतलेली ही छायाचित्रे आहेत–शब्द-माध्यमातून उतरलेली–ताजी, खरी आणि धावती!

ललितलेखनाची शैली मुख्यतः तीन गोष्टींनी निश्चित होते. (१) लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि त्याची संबंधित लेखनाविषयी भूमिका, (२) त्याचे वाचक आणि (३) त्याचा विषय.या वस्तुत्रयीवर शैलीचे अंतिम स्वरूप अवलंबून असते. 'श्रीचक्रधराची जीवनलीळा' हा लीळाचरित्राचा विषय असला, तरी या लीळांचे स्वरूप विविध प्रकारचे कसे आहे ते आपण पाहिलेच. पूर्वकथन, वृत्तांत निवेदन, दैनंदिनीलेखन, काहीसे टिपण, हकिकती, गोष्टी, दृष्टांत, संवादप्रसंग, सूत्रे, सूत्रांचे स्पष्टीकरण, हास्यविनोद, केवळ वार्तालाप, क्रीडा–कथन, असे लीळाचरित्रलेखनात वैचित्र्य आहे; आणि तो तो विषय, प्रसंग, आणि प्रवृत्ती यांस अनुरूप अशी शैली आकार घेत असलेली आपणांस पाहावयास मिळते. पण त्यात श्रीचक्रधरांची भाषा एकदम मनात ठसते नी वेगळीच वाटते. तिचाच थोडा तपशिलाने विचार करू.

## ४. *श्रीचक्रधरांची भाषा*

श्रीचक्रधरांचे उद्‌गार, त्यांचे संवाद किंवा हास्यविनोद, निरूपण–चर्चा यांतील भाषा जर आपण पाहिली, तर त्यात रूपकाचे सौंदर्य पुष्कळसे आढळून येते. ही रूपके कधी एखाद्याला प्रेमाने दिलेल्या नामाभिधानांतून दिसून येतात. ते नागदेवास '**वानर**' म्हणत, (कारण ते झाडावर सरसर चढले व गुंफेसाठी त्यानी फांद्या तोडल्या) मिष्टान्न देणाऱ्या स्त्रीला ते कामधेनू संबोधतात. आंबट आंब्यांना 'संसारमोचकू' हे विशेषण देतात. ही रूपके कधी 'क्रियापदातून' व्यक्त होतात—'विष्णुभट **भुंकले** : तो पंचमवेद' (पू०–खं. २, पृ. २५). एक स्त्री दर्शनाला आली असता श्रीचक्रधरांच्या डोक्याला 'दारवंठु' लागला, तेव्हा

त्या स्त्रीला म्हाइंसा शिव्या देऊ लागली. तेव्हा श्रीचक्रधर म्हणतात, '**बाइ : प्राणियें एथ आलेयां जळतां जावें तरि निवावें कोठें :** ” क्रियापदाप्रमाणे नामांनीहीं रूपके सिद्ध झालेली आढळतात. 'जीवाचा **वागारा** नावेक ढिला करों नये :' एकदा महदाइसाला वाराणशीला जावयाचे होते. दादोसनी परवानगी दिली, आणि श्रीचक्रधरांनी जाऊ नको, म्हणून सांगितले. असे दोन-तीनदा झाले. शेवटी तिने जावयाचे ठरविले, व ती दर्शनासाठी श्रीचक्रधरांकडे आली, तेव्हा ते 'श्रीकरू ऐसा भंवडीत' होते. महादाइसाने त्यांना विचारले, 'हे तुम्ही असे काय करता?' तेव्हा त्यांनी उत्तर केले; 'बाइः **ताकीची माशी ताका वेगळी जाताए :** ' (=म्हातारीला ईश्वर सन्निधानाबाहेर घालवीत आहे.) श्रीचक्रधरांच्या तोंडी क्वचित् म्हणीही येताना दिसतात. सर्वांची जेवणे झाली होती. आणि वाटीभर खीर उरली होती. ती काढून ठेवण्यास भांडे नव्हते. तेव्हा 'ठेवा : वानरेया (=नागदेवाचार्य) पूढां : ' असे श्रीचक्रधर म्हणाले. आता मला जाणार नाही, 'अशा अर्थाचे नागदेवाचार्य म्हणताच, गमतीने “ सर्वज्ञे म्हणीतले : घेया : **भरलेया गाडया काइ सूप जड** : घासु घेयां : ”

उपमेपेक्षा श्रीचक्रधरांना रूपकच अधिक प्रिय आहे. '**जीवु स्फटिका कारू**'! सूत्रे आणि सुभाषिते ही तर बहुतेक ठिकाणी रूपकात्मकच आहेत. '**संसारू हा दीर्घस्वप्न गाः,**' '**स्त्री भणिजे मत्तद्रव्याचा रावो गा :**' '**कोमळ ज्ञानीं विखो विघ्न** :;' '**भिक्षा म्हणिजे पारधि गा :**' कधी कधी परंपरित रूपकही येते ! “ **अहंतेचें मूळ सकंदी उपडावें नाएका : एऱ्हवी अंकुर निगति : मग शांतीचें रोप लावावें :** ” पुष्कळदा रूपकातिशयोक्तीही येते. 'गांवाच्यां कडिसरां खांड देउळी एकी पाहिजे : तेथ **श्वानकुंडली** घालीजे :' 'हाडांची **रांगवळीं** करावी नाएका :' किंवा 'मुक्तीची चाड आणि तेवीची **खुंटदावें** सांभाळणें :' श्रीचक्रधरांची वाणी ही कसलेली, अस्सल, वाक्प्रचार-समृद्ध जिवंत वाणी आहे. ते बोलतात म्हणजे साक्षात् चित्रच उभे करतात. '**मुक्तीची चाड तेणें मुंगिये वीरू न चिंतावें ॥,**' '**पोरु जीवु आपुलें मात्रागमन न देखे : परि पुढीलाचें वेश्यागमन्न देखे ॥;**' '**पोळलेया सुनेयांचेया परी असावें ॥**' '**खरूज खाजवीना तो विरक्त**' ॥ **ओठांतरा निगालें तें देशांतरां जाए;**' '**दोहीं ओठां टाळें घालावें.**' इ० इ०...

यामुळे श्रीचक्रधरांच्या भाषेला एक प्रकारचे दार्ढ्य आहे, कस आहे. श्रीचक्रधरांच्या वाणीत संस्कृत शब्द नेमकेपणाने येतात, पण त्याने मराठीचे मऱ्हाटपण झाकोळले जात नाही. श्रीचक्रधरांची वाणी पाहता 'यादवकालीन मराठी गद्य' वास्तवचित्रणाच्या बाबत 'प्रतिज्ञोत्तर' उघडपणे ऐकवू शकले असते, असे वाटते.

श्रीचक्रधरांच्या तोंडून मधूनच संस्कृत, हिंदी, गुजराती अशी वचने किंवा उद्‌गार येतात; विशेषतः संस्कृत, '**स्वयं दास्यं तपस्विनाम्**' '**स्वस्थे चित्ते बुद्धयः संभवन्ति,**' इ० क्वचित एखादाच नेटका संस्कृत निर्देशही मराठी वाक्यात येऊन जातो. 'दासोऽहं न पूरे की नाएका :' (उत्त० ली० २६) 'स्वयंनामगोपन' नावाची लीळा (पू० खं. १, पृ. ४९) सिन्नर येथे महादेवो राण्याचा एक माणूस, एका मठामध्ये श्रीचक्रधर आहेत का त्याची विचारपूस करण्यासाठी आला आणि त्याने खुद्द श्रीचक्रधरांनाच विचारले, "**श्रीचांगदेवो राऊळ : गोसावी : एथ असति की :**" तेव्हा "**सर्वज्ञें म्हणीतलें : माति : मा इहां कोइ नथी :......मातारी एकी छे : तें गावमां हें भिक्षामागन गैइ छे :**" इ०......आपली गुजराती मातृभाषा अशी गोपनकार्यासाठी श्रीचक्रधरांना उपयोगी पडली. 'उत्तरार्धा'मध्यें ली० ४११, ४१८, ४१९ मध्ये संवादांतून हिंदुस्थानी भाषा येते. श्रीचक्रधरांनी ह्या कथा सांगितल्या आहेत, हे ध्यानी असावे.

लीळाचरित्र या गद्यग्रंथांत काही अपवादात्मक पदेही येतात. पूर्वार्ध, खं. १., ली. १५ मध्ये काही पदांचे प्रथमचरण दिले आहेत, पाच पदे गायिली अशी नोंद आहे. ही पदे अभंगसदृश वाटतात, रचनादृष्ट्या आणि शब्दयोजनेच्या दृष्टीनेही! दुपारी कांडण करीत असता महदाइसेने गायिलेल्या ओव्या, उत्तरार्ध, ली. २७१ मध्ये येतात.

**गोमतीए तीरीं : नीळेया गूढरा : राजेया गुजरा : कृष्णराया : ॥ १ ॥**
**नीळा गुढरू : राजा गुजरू : माणीकी मंडपीं : श्रीचक्रधरू : ॥ २ ॥**
**गोमटें मांजीटें : आरव कुंडीचें : राजेया डौंडीचें : चक्रधरा : ॥ ३ ॥**
**गोरें अंग बाहीया : डवरीया चंदनें :**
**श्रीचक्रधरा झणें : दीठी होए : ॥ ४ ॥**

**बापु म्हणे कीं भाइया : माझेया साजणी :**
**गोत तो साजणी : चाही याके : ॥ ५ ॥**
(पूर्वार्ध खं० २, पृ. ७१–७२)

स्वतः श्रीचक्रधरांनी धनाश्री रागात गाइलेली एक चौपदी उत्त० ली० ३२१ मध्ये आलेली आहे. तिच्यातील आशय पातंजलयोगातला असून तो नाथसंप्रदायातून आलेला दिसतो. त्यात गोरक्षनाथांचा उल्लेख असून अखेर 'अलख निरंजन' हा शब्दप्रयोग येतो. मूलबंध, 'वोडियाणा' बंध, पंचप्राण, उन्मनी स्थिती, चंद्रमंडळ इत्यादी योगातील पारिभाषिक संज्ञा त्यात आल्या आहेत. यातील मराठी भाषेत मध्येच हिंदीची छटा येते, '**मूलस्थानीं भीड बांधो हो जोइ...**' किंवा '**अलख नीरंजनीं लो कर हो**...इ०

श्रीचक्रधरांची सूक्ते आणि त्यांनी दिलेले दृष्टान्त यांमधील भाषेत खूप फरक जाणवतो. दृष्टान्तातील भाषा नेहमीची व्यावहारिक अशी देशी–गद्यबोली वाटते; तीत संस्कृत शब्द अल्पसंख्येनेच येतात; संस्कृत सामासिक शब्द तर बहुधा नाहीतच; या उलट सूत्ररचनेत– म्हणजे अल्पाक्षरांच्या साहाय्याने तत्त्वज्ञान बंदिस्त स्वरूपात देण्यासाठी केलेल्या रचनेत–संस्कृत शब्द, संस्कृत सामासिक शब्द–संस्कृत धर्तीची रचना मुख्यत्वे आढळते.

(१) क्वचित **संस्कृत सूत्रेही** येऊन जातात. उदा० 'चातुर्वर्ण्ये चरेद्भैक्ष्यम्!' किंवा 'समर्थो धर्ममाचरेत्'।[1]

(२) **संस्कृतप्राय रचना**—स्वदेश संबंधु त्याज्य ॥ अटन तें निरूद्देशें करावें ॥ क्रियेसि अनुतापु पुरश्चरण ॥ सामान्य स्त्री-सदनस्थिता पासौनि संदेहत्रुटि करावी ॥ इ०......

(३) **संस्कृत-मराठी साधारण समप्रमाण**—उदा०–जीतेनि मृताचां धर्मी वर्तावें ॥ परस्परें मथन कीजे मग नूतन होए ॥ अल्पें अनिष्टें बहुत अनिष्ट परिहरे तरि परिहरिजे ॥

(४) **संस्कृत धातूंची मराठी क्रियापदरूपे**......जन्म **क्षेपावें** ॥ धर्मी **वर्तावे** ।......परमेश्वरू **आहांसिति** ॥

---

१ *'संवाद'च संस्कृतातून* केल्याची उदाहरणे मिळतात. उत्त० ली० १११

(५) **संस्कृत विशेषणे, कृदन्ते इ०......**

**अभोक्त्या** म्हातारीचेया परी असावें ॥

अल्पें **अनिग्रें** ॥ तो **सारस्वत** काळु ॥ एथीची सेवा ते भूतां **अविरोधें** करावी कीं गा'......मनोधर्मु **परित्यजौनि**...रिगावें ॥

(६) **विशेष संस्कृत सामासिक शब्द—**

श्रमनिवृत्ति, एषणात्रय, क्षुधानिवृत्ति, घृणात्याग, शीतोष्णपरिहार, कर्मजड, विधिकिंकर, प्रियवक्ता इ०......

तद्धित–तत्सम शब्दांचे समासही यात येतात. उदा० श्वानकुंडली, कर्म-चांडाळ. तसेच साम्याभासाने 'देशांतर' प्रमाणे 'ओठांतर' हा सामासिक शब्दही होऊन जातो.

प्रत्यक्ष दृष्टान्तामध्ये आलेल्या भाषेत ही संस्कृतप्रचुरता नाही. सूत्रवाङ्मया-मध्येही काही सूत्रे खास मराठी रूपच घेणारी आहेत. उदा० **कराल तर होइल कीं** ॥ (रामदासांच्या 'केल्याने होत आहे रे' ची येथे आठवण होते.) **पोळलेल्या सुनेयाचेया परी असावें :** फार काय, येथे मधून मधून देशी शब्दांचे समास झाल्याचेही दिसून येते. उदा०—झाडातळीं, कोपरदुटी, गोंडीबुंथी......

लीळाचरित्रातील एकूण शब्दसंपत्तीचा, त्याच्या स्वरूपाचा आणि विशेषांचा येथे वास्तविकपणे विचार व्हावयास हवा आहे. पण त्याचा विचार याआधी थोड्याफार तपशिलाने झालेला असल्याने येथे केलेला नाही. येथे फक्त वाङ्मयीन दृष्ट्या लीळाचरित्रामधील शब्दयोजनेतील औचित्यविचार कसा आहे ते दिग्दर्शित करण्याचा काहीसा प्रयत्न केला आहे. लीळाचरित्र, त्यातील दृष्टान्त आणि सूत्रे यांतील शब्दांचा शब्दसिद्धीच्या दृष्टीने विचार, तसेच वाक्प्रचार आणि काही वाक्यरचनाविशेष यांचे संकलन आणि चिकित्सा, महानुभावीय विविध गद्यग्रंथांच्या संपादित पाठ्यपुस्तकांच्या प्रस्तावनांमधून अनेक विद्वान संपा-दकांच्याकडून जी करण्यात आली आहे,[१] ती येथे समाविष्ट करून घेतल्यास,

-----

१ '*दृष्टान्तपाठ*'–सं० डॉ. शं. गो. तुळपुळे. कुमुदिनी घारपुरे, (प्रस्तावना) व '*दृष्टान्तपाठ*' आणि *लीळाचरित्र–एकांक* सं०–ह. ना. नेने, (प्रस्तावना) यांमध्ये याचा विचार झालेला आहे. वानगीदाखल एवढे पुरे!

हा विचार बराचसा पुरा होईल. कारण (अ) कूपकाटी, सांदीसवडी यांसारखे सामासिक शब्द; गोरागोमटा, घारेधाकुटा यांसारखे जोड शब्द; पहुडणे–उपहुडणे, वोखटें–गोमटें यांसारखे विरोधी शब्द; खडेखूबटे, दांडी–डोळी यांसारखे द्विरुक्तिवाचक शब्द; जाणिजे–नेणिजे, घे–नेघे यांसारखे अकरण वाचक शब्द; कटंकटीयमान, तीटत–तीटत यांसारखे नादानुकारी शब्द, तसेच (आ) समाजाच्या ज्या कोणत्या थरातून हे शब्द आले, त्यातून ध्वनित होणारे सामाजिक मन, किंवा प्रादेशिक वातावरण, खाद्यपदार्थ, वनस्पति-फळे इत्यादींची नावे, वाक्प्रचार आणि म्हणी यांतून दिसून येणाऱ्या तत्कालीन काही जाणिवा आणि चालीरीती, यांचा अभ्यास मूळ 'लीळां'च्या अर्थाच्या आकलनाच्या दृष्टीने तर आवश्यक आहेच, पण त्यातील 'रस' प्रत्यक्षपणे आस्वादण्याच्या दृष्टीने तर केवळ अपरिहार्य आहे.

प्रकरण पाचवे

# उपसंहार

- अनेकविध वाङ्मयरूपांचा एकाच ठायी आस्वाद
- म्हाइंभटाचे विशेष कर्तृत्व.
- ली० च० म्हणजे 'यथातथ्य चित्रण'
- 'लीळाचरित्र' आणि 'स्मृतिचित्रे' यांचा तौलनिक विचार.
  —लेखकांची भूमिका,—मूळ हेतू—वाङ्मयीन स्वरूप—कथामूल्य—
  —आस्वादक्रिया—
- उपसंहार.

# उपसंहार

लीळाचरित्र वाचताना आपणांस अनेकविध वाङ्मयीन रूपांचा आस्वाद घेता येतो. चरित्र,–आत्मचरित्र, वार्ता–वृत्तान्त, कथा–कहाणी, सूत्र–भाष्य, थोडक्यात म्हणजे कथा–शास्त्र–विनोद यांचा आनंद रसिकाला या एकाच ग्रंथाने मिळू शकतो. 'भक्ती' हा येथील मुख्य रस असून, 'स्मरण' हे तिचे व्यक्त रूप आहे. श्रीचक्रधररूपाने अवतरणारे श्रीकृष्ण हे या ग्रंथाचे विषय असल्याने त्यात लौकिक आणि अलौकिक घटनांना मुळातच वेधक रूप लाभले आहे. यात अधून–मधून अद्‌भुत, भयानक, बीभत्स, करुण इ० प्रसंग असले, तरी श्रीचक्रधर या सर्व भावनांच्या पलीकडे गेलेले असल्याने त्यांच्या दृष्टीने हे रस आणि रसप्रसंग, म्हणजे एक निर्मम क्रीडा, केवळ 'लीळा'च होत. श्रीचक्रधरांच्या या निरामय आनंदमयतेमुळे येथील कितीतरी महत्त्वपूर्व अनुभव–कथा काही वेगळे, असे अलौकिक भाव मनात निर्माण करतात. या जगात असून या जगाचा कोणीच नसलेला महात्मा हा साहित्याचा फार चांगला विषय होऊ शकतो. लीळाचरित्राच्या यशाचे निम्मे–अधिक श्रेय श्रीचक्रधरांच्या या व्यक्तिमत्त्वाकडे जावे.

लीळाचरित्र म्हणजे मराठीतील आद्य ललित-ललितेतर–गद्य–ग्रंथ होय. म्हाइंभटांपुढे या आधीचा दुसरा कोणताच गद्य–ग्रंथ नसल्याने कथनाची आणि चरित्र–ग्रथनाची वाट त्याची त्यालाच शोधून काढावी लागली. आद्य मराठी कवींच्यापुढे पूर्वसूरींचे भरपूर आदर्श होते. शिवाय निवेदनाच्या शैलीचे नमुने संस्कृत काव्यांतून हवे तितके त्यांना सिद्ध रूपात पाहता येत होते. कलादृष्ट्या तयार असलेल्या काव्यशैलीपुढे, कथनाच्या (Reportage च्या) प्राथमिक अवस्थेतील गद्य खरोखरी अगदीच साधे (Primary and simple) दिसते. पण या

साधेपणाच्या मागे वास्तवाचा जोमदार अनुभव आहे; मनोभावनांचे सूक्ष्म आकलन आहे, आणि चित्रणाची असीम तळमळ आहे. येथे सांकेतिक आणि परभृत असे काहीच नाही. त्यामुळे हे आद्य–गद्य एकदम रसरशीत आणि प्रभावी झाले आहे. त्यात कलेचा शृंगार नाही, पण प्रत्यक्ष चित्रणाचे सामर्थ्य आहे. विपुल वास्तव चित्रे, मानवी मनाची नवलपूर्ण दर्शने, बोली भाषेतील ताजे शब्दभांडार आणि चमकदार वाक्प्रचार यामुळे आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी हे लेखन प्राचीन मराठीत वेगळे उठून दिसते; आजही ताजे वाटते. एक विशिष्ट रस प्रधान मानून त्याच्या परिपोषासाठी केलेली कलात्मक बांधणी, असे येथे तंत्र नाही; व्यभिचारी भावच येथे अधिक चमकत राहतात आणि मूळ 'भक्ती'ला परिपुष्ट करतात. उत्कंठा, विस्मय, हर्ष, सुख, दुःख, असूया, घृणा, पश्चात्ताप, समाधान, दैन्य इ० संचारी भावांचीच येथे खाण आहे. प्रत्यक्षाचे (Facts) त्यांना तेज आहे. 'काव्यालंकार' येथे कथनप्रकारात अपवादानेच जाणवतात.[1] लीळाचरित्र म्हणजे 'यथातथ्यकथन' आणि 'यथातथ्यकथन' म्हणजे लीळाचरित्र! 'यथातथ्यकथना'चे अथवा 'यथातथ्यचित्रणा'चे इतके विस्तृत, एकसंध, अव्यभिचारी, प्रत्ययकारक उदाहरण मिळणे सहसा कठीण आहे.

लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रां'ची या संदर्भात आठवण होते. 'लीळा-चरित्रा'ला 'लीळाचित्रे' संबोधिताच 'स्मृतिचित्रे' हे नाव साहचर्यभावाने मनात जागे होते. लीळा म्हणजे स्मृतीच! म्हाइंभट आणि लक्ष्मीबाई 'स्मृतिचित्रे'च काढीत आहेत, आणि सत्यदर्शन–यथातथ्यचित्रण हाच दोघांच्याही लेखन-प्रकृतीचा मूळधर्म आहे. निर्मम वृत्तीने पण समरसतेने काढलेली चित्रे, या दृष्टीने पाहता 'लीळाचित्रे' आणि 'स्मृतिचित्रे', सारख्याच तोलाच्या स्वभावसुंदर साहित्यकृती ठरतील. दोन्ही साहित्यकृतीत वास्तवरूपता, शब्दचित्रमयता, संवाद-सुंदरता, बोलीभाषेची सजीवता आणि जीवनप्रवाहाची संततता मनोरम आहेत. ह्या दोन्ही कृती 'लेखनरूपात' बांधलेल्या असल्या तरी त्यांचे रूप वाहत्या पाण्यासारखे आहे,—गतिमान, निर्मळ, ताजे, नित्यनूतन, आणि प्रसन्न!

---

१ श्रीचक्रधरांच्या सूत्रांतील रूपकभाव, क्वचित उपमा, दृष्टान्तपाठ इ० अलंकार 'तत्त्व-निरूपण प्रसंगी' येतात. व्यक्तिदर्शनप्रसंगीं काही अलंकार येतात, ते पृ. ५४ वर पाहावेत.

'लीळाचरित्र' आणि 'स्मृतिचित्रे' यांमध्ये असे काही साधर्म्य असले तरी मूलतः त्यांमध्ये एक भेद आहे. लक्ष्मीबाई ह्या रे० टिळकांची जीवनकहाणी सांगत असल्या तरी त्या कहाणीतील त्या स्वतः एक अविभाज्य असा घटक आहेत; आणि हा घटक इतका जिवंत, चैतन्यशील, संवेदनाशील आहे की 'स्मृतिचित्रे' ही चरित्र-आत्मचरित्र-मय झाली आहेत. लक्ष्मीबाईंची 'स्मृतिचित्रे' ही वस्तुतः 'आत्मचित्रे'च होत. आत्मचरित्रलेखनात असणारा अंगभूत जिव्हाळा आणि गोडवा तर त्यात आहेच पण 'इदं न मम' अशा वृत्तीने ते लिहिले गेल्यामुळे त्याला एक वास्तव, विशुद्ध, निर्लेप कलारूप लाभले आहे. यामुळे लक्ष्मीबाईंची ही निर्मलता (detachment) मनात अधिक भरते. आपल्याच अनुभूतींशी अशी निर्हेतुक रम्य क्रीडा करण्याची प्रवृत्ती रसिकांना श्रेष्ठ प्रतीचा आनंद देते. 'लीळाचरित्रा'मध्ये श्रीचक्रधर स्वतःच्या गतायुष्यातील एकाकी जीवनातील, आठवणी सांगतात, तेव्हा त्यांची ही क्रीडावृत्ती प्रत्ययास येते. रामटेकच्या बाईस श्रीचक्रधर जुनी हकिकत सांगतात, **'बाई : पूर्वी हे' गामीं होतें : तें एथ पाणी भाताची आरोगणा देति : तैं हे दिगंबर : होतें : तैं एथ मौन्य होतें : तैं यातें नग्नदेव नग्नदेव ऐसें म्हणति : आतां सातापांची मीळौनी याचा देवो केला असे :'** श्रीचक्रधरांच्या या बोलण्यातील निर्ममता, विमुक्तता मनाला विशुद्ध आनंद देणारी आहे. 'स्मृतिचित्रां'च्या लेखनाला लाभलेली विनोदबुद्धीची जरीकिनारही या अशा श्रीचक्रधरांच्या कित्येक लीळांमध्ये दृष्टोत्पत्तीस येते.

लीळाचरित्रातील श्रीचक्रधरोक्त आत्मकथनाचा भाग सोडल्यास इतर भाग हा संकलनात्मक आणि निवेदनात्मक आहे. आपल्या पतीचे आणि आपले स्वतःचे व्यक्तिचित्र आणि जीवनचित्र रंगविताना आत्मगौरव किंवा आत्मसंकोच होण्याची जी भीती, धास्ती किंवा शक्यता असते त्यातून लक्ष्मीबाई जशा सुटल्या आहेत, तसाच म्हाइंभटही परमेश्वराचे चित्रण करताना, गौरव—माहात्म्य-कथनादी स्वाभाविकपणे येणाऱ्या व लेखनास गौणत्व आणणाऱ्या दोषवृत्तीतून मुक्त झाला आहे, हे खरे; पण येथे 'आत्मक्रीडे'चा, उच्चतर 'आत्मरती'चा आनंद 'स्मृतिचित्रा'तीलप्रमाणे या लीळाकथनात येऊ शकत नाही; आणि ते साहजिक आहे.

शिवाय 'स्मृतिचित्रां'चा घाट हा एकसंध 'कहाणी'चा आहे; त्यात

स्वाभाविकपणेच अर्थपूर्ण अनुभवांची, अनुभवच्छटांची लहान-मोठी रम्य चित्रे आहेत; ती एका व्यक्तीने आपल्या नजरेने टिपली आहेत; निवडून घेतली आहेत; या उलट 'लीळाचरित्र' हे रेषा न जोडलेल्या बिंदू-बिंदूच्या रांगोळीप्रमाणे आहे. बिंदू जोडल्याचा भास होतो, पण ते आहेत ते अगदी अलग असेच! शिवाय अनेक व्यक्तींनी सांगितलेल्या त्या अनेक आठवणी आहेत आणि त्या आठवणींचे लेखनस्वरूप किती विविध आणि प्रसंगी अललित आहे, तेही आपण पाहिले आहे. 'लीळाचरित्र' हे लहानमोठ्या, मंदोज्ज्वल, गजबजलेल्या नभोवितानासारखे वाटते; तर 'स्मृतिचित्रे' नक्षत्रांकित आकाशांतील गंगेसारखे भासते.

'स्मृतिचित्रां'ना अंगभूत कथामूल्य आहे; तर 'लीळाचरित्रा'चा बराचसा भाग निवेदनस्वरूपाचा आहे; यामुळेही या दोन साहित्यकृतींतील प्रसंगचित्रणातील भेद ध्यानी येण्यासारखा आहे. लक्ष्मीबाई आयुष्यातील एकेक अनुभव सांगताना त्यातील 'रस' नेमका निर्माण करतात; म्हाइंभट 'लीळा' सांगताना श्रीचक्रधरांची तत्तत्कालीन मनोवृत्ती (mood), एखादा स्वभावविशेष किंवा तत्त्वदर्शन प्रकट होण्यापुरतेच प्रसंगाचे निवेदन करतो. 'एकांक'ची तुलना मात्र बऱ्याच प्रमाणात 'स्मृतिचित्रा'शी करता येण्यासारखी आहे. कारण 'एकांक'ला लीळाचरित्रात सर्वाधिक कथामूल्य आहे. तेथे कित्येक लीळांना रसमयता लाभली आहे. दोन्ही साहित्यकृतींतील विषयांच्या स्वरूपभेदामुळेही परिणामकारितेत भेद जाणवतो. पण त्यातही श्रीचक्रधरांचे अवतारित्व आणि रे० टिळकांचे प्रेषितत्व यांनी दोन्ही ठिकाणी बरीच लोकविलक्षणता आली आहे, हे एक सहज दिसून येणारे थोडेसे साधर्म्य आहेच.

एकंदरीत पाहता 'स्मृतिचित्रे' आणि 'लीलाचरित्र' याबाबत लेखकांच्या लेखनपूर्व आणि लेखनगर्भ आत्मनिष्ठेबाबत (sincerity) आणि आविष्कारपद्धतीच्या भूमिकेबाबत (tone of the writer) साधर्म्य आहे. शिवाय 'लीळाचरित्रांती'ल 'उत्तरार्धा'त 'पूर्वार्धा'पेक्षा तपशिलाने अधिक जागा जशी अडविली आहे, तशी 'स्मृतिचित्रा'तही पुढेपुढे होत गेले आहे. (सर्वच आत्मचरित्रलेखनात किंवा तत्सदृशलेखनात नजीकचा काळ आणि दूरचा काळ यांच्या चित्रणाबाबत असेच झालेले दिसते. ते स्वाभाविक असले तरी कलादृष्ट्या अनिष्ट होय!) पण मूलतःच 'लीळाचरित्र' आणि 'स्मृतिचित्रे' यांचे

वाङ्मयीन स्वरूप बरेच भिन्न असल्याने, त्यांच्या अंतिम आस्वादात फरक पडतो. मर्ढेकरांना 'स्मृतिचित्रांतील भावना-गालिचाचे दिसलेले सौंदर्य आणि त्यांतील महात्मतेची आलेली अनुभूती, ही 'लीळाचरित्रा'सारख्या भक्तिप्रधान कथनपर साहित्यात (Reportage) परिणामी प्रत्ययास कशी येतील ?

× × ×

'लीळाचरित्र' म्हणजे स्मरणभक्तीचा 'आदर्श' होय, येथून या विचाराला प्रारंभ झाला; समाप्तीपूर्वी म्हणावेसे वाटते की महानुभवीयांना या स्मरणादर्शात श्रीचक्रधरांची अनंत रूपे प्रत्यक्ष दिसत असतील, आणि ते पठणानंतर स्वतःच्या मनाशी प्रसन्नतेने उद्‌गारत असतील की,

तं च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ।
विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

## परिशिष्ट

### मूर्तिवर्णन

श्रीगोविंदप्रभू आणि श्रीचक्रधरस्वामी या दोन परमेश्वरावतारांची मूर्तिवर्णने महानुभाव-वाङ्मयात सारखी येतात. उदा० '**मूर्तिज्ञान**' मध्ये आलेले श्रीचक्रधरांचे वर्णन :—

**'गुजरातेच्या प्रधानपुत्राचें पतीत उठउनि : श्री चांगदेवो राउळीं : गोसावी : अवतारू स्वीकारीला : ते चापेगौर राजस : तेजस वेल्हाळ श्रीमुर्ति : सुकुमार : ध्वज : वज्र : अंबुज : पद्म : अंकुशांकित : श्रीचरण : सुहरत : वोहरत : जंघायुगळ : घणी पीटिलीया जैसिया मांडीया : चौरसू घनवट्ट : वरवा जघन प्रदेशू : सखोल नाभिरंध्र : वळीत्रए शोभाएमान : सलक्षणीक समतट दोंद : मृदुतररोमराजी : सरळत ओहरत वरवे अजान बाहु : सुरंग कोमळ : सरळ नासापुट : सरेळ सुप्रसन्न : आकर्णवीशाळ : कृपालोचन : सुरेखा भवै : डावेए भवै वरि कांदि : उचे कपोळें : लंबकर्ण : नीतळ नीडळ : वरवा मनोहर श्रीमुगूट : वरीसा पंचवीसा : सतावीसा भीतरि दीसे वए : ऐसें सर्वांग सुंदरू : लावण्य : सौभाग्य : आथीली : श्रीमुर्ति :'**

'मूर्तिज्ञान' (पृ० १९-२०)
(सं० ह० ना० नेने)

प्रस्तुत 'ली० च०—एक अभ्यास' या पुस्तकात पृ. ५४-५५ वर आलेली लीळाचरित्रातील मूर्तिवर्णने, अथवा यादवकालीन इतर महानुभाव गद्यचरित्रांतून

आदळणारी मूर्तिवर्णने पाहिली तर ती ‘मूर्तिज्ञान’ मधील वर्ण[illegible] समग्र, साद्यन्त, आपादमस्तक मूर्तिदर्शन घडविणारी नाहीत. ‘ऋद्धिपु[illegible] —ओ० ५५० ते ६१० मध्ये येणारे श्रीगोविंदप्रभुवर्णन आणि ‘सह्या[illegible] ओ० २०९ ते २९७, ‘ज्ञानप्रबोध’—ओ० ३९६ ते ५०० आणि ‘[illegible] ओ० ५०३ ते ७४८; ओ० १७१४ ते १७३५; आणि [illegible] ते १९४८. यांमध्ये आलेली श्रीचक्रधरमूर्तिवर्णने विदग्ध, अभिजात, [illegible]-रूपचित्रणात्मक वाटतात. लीळाचरित्रातील वर्णनकलेत ही विदग्धता नाही पण तिच्यामध्ये वरील वर्णनकलेतील सांकेतिकता व कृत्रिमताही नाही. लीळाचरित्रामधील मूर्तिदर्शन त्रोटक असेल पण ते जिवंत, [illegible] आणि प्रत्ययोत्पादक आहे; तिच्या रेषा वास्तवदर्शी आणि तेजस्वी आहेत.

REFBK-0015593

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

१५९९३

# संदर्भ साहित्य


१. लीळाचरित्र–'एकांक' (आ० ३–१९५४) –सं० ह. ना. नेने

लीळाचरित्र–'पूर्वार्ध' (खं० १) –सं० ह. ना. नेने

३ ...रित्र–'पूर्वार्ध' (खं० २) –सं० ह. ना. नेने

४. ...रित्र–'पूर्वार्ध' (खं० ३) –सं० ह. ना. नेने

५. लीळाचरित्र–'उत्तरार्ध' –सं० ह. ना. नेने

६. '...ाला स्तोत्र' –केसोबास (ह. ना. नेने—प्रकाशित.)

७. '...विंदप्रभुचरित्र' –सं० वि० भि० कोलते

८ ...रचरित्र –वि. भि. कोलते

९ ...पाठ –सं० ह. ना. नेने

१० ...पाठ –सं० शं. गो. तुळपुळे, –कुमुदिनी घारपुरे

११ ... आणि ज्ञानदेव –वि. भि. कोलते

१२ ...ाक्त सूत्रपाठ –सं० ह. ना. नेने

१३ ...प्रर' (नित्यदीनीलीळा) –बाइदेव बास.

१४ ...वांचे तत्त्वज्ञान –वि. भि. कोलते

१५ ...त्रांचा आचारधर्म –वि. भि. कोलते.

१६. ...व वाङ्मयाचा इतिहास –य. खु. देशपांडे

१७. महाराष्ट्र-सारस्वत (आ० ४) –वि. ल. भावे